
म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ८८४
IRBK-0100884
मं. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
वा. नं. १०७
IRBK-0100884
IRBK-0100884

# आगरकालीन तरुण

पुष्प १०

म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
वा. नं. 9000



IRBK-0100884

। चार आणे.

लेखकः—धों. मु. देशपांडे.

# फयान्सी धोतर जोड्या

आपण

जेव्हां विलायती धोतरजोड्या खरेदी करता
त्यावेळीं

## त्यावर आमचें नांव वाचूनच खरेदी करा.

कारण

आमच्या धोतरजोड्या टिकाऊ, फॅन्सी किनारच्या आणि
स्वस्त आहेत त्या प्रत्येक कापडवाल्याच्या
दुकानीं मिळतात.

## फयान्सी धोतरांचे व्यापारी

# बाबू. बी. मोरलीधर

जथ्थाबंद विलायती धोतरांचे आयात करणार

——मुंबई——

# अमृतांजन च्या तोडीचें त्वरीत

कोणतीहि शारीरिक व्याधि
नाहींसें करणारें दुसरें
मलम (बाम) नाहीं
म्हणून




रजिस्टर्ड

## अमृतांजनच वापरा व घेताना

## अमृतांजन पाहून घ्या.

किंमत १० आणे, ट. ख. निराळा.
सर्वत्र मिळतो.

**गजकर्ण मलम**—फक्त तीन दिवस लावल्यानें गजकर्ण, कोरडी खरूज वगैरे त्वचारोग कायमचे बरे होऊन पुन्हा होण्याची भीति राहात नाहीं.
डबीची किंमत ६ आणे.

**दंत मंजन**—दाताचे सर्व रोग बरे करून दात स्वच्छ राहाण्यास व मजबूत करण्यास आमचे दंतमंजन नेहमी वापरणे आपल्या हिताचे आहे. किंमत २ आणे.

वि. सू.—वरील औषधें एकदां वापरून पहा. क्याटलाग फुकट

**अमृतांजन डेपो;**
**२४९ फ्रिअर रोड, मुंबई.**

# धों. मु. देशपांडे यांचीं पुस्तकें.

१ अहिंसा—शिल्लक नाहीं.

२ ब्रह्मचर्य दिग्दर्शन—शिल्लक नाहीं.

३ अवधानो—( गुजराथी ) शिल्लक नाहीं.

४ पृथ्वीवल्लभ—ऐतिहासिक कादंबरी, किं. १–४–० पोष्टेजसुद्धां

५ पावागडचा प्रलय अथवा भद्रकाली } ऐतिहासिक कादंबरी किं. ३–८–० ,,

६ आत्मबलिदान } साष्ठी सामाचारांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली ऐतिहासिक कादंबरी पुस्तक रूपांत लौकरच प्रसिद्ध होईल.

७ अनारकली आणि सलीम अथवा अपराधी अकबर } ऐतिहासिक कादंबरी किं. १–०–० पोष्टेजसुद्धां

८ साधु कीं सैतान अथवा संदिग्ध संसार } सामाजिक कादंबरी, सावधान पत्रांतून $\frac{1}{3}$ प्रसिद्ध झाली. सबंध पुस्तक रूपांत लौकरच प्रसिद्ध होईल.

९ शिवाजीचा मावळा—ऐतिहासिक नाटक किं. ०–३–० पो.सु.

१० वसंत माधव
११ स्वराज्य सूत्र
१२ श्रीमंत } सामाजिक नाटकें लौकरच रंगभूमीवर येऊन पुस्तक रूपांत प्रसिद्ध होतील.

मुकुंदमाला पुष्प १ लें—“ शिवकालीन तरुण ” किं. ०–४–० साडेचार आण्याची तिकिटे पाठविणाऱ्यास घरपोंच.

**निम्मे किंमत:—**

४, ५, ७ व ९ हीं पुस्तकें मुकुंदमालेची रु. ३ वार्षिक वर्गणी अगाऊ भरणारास निम्मे किंमतीला मिळतील. ट. हा. निराळे पडेल.

**टीप:**—व्यापाऱ्यांना भरपूर कमिशन. लायब्ररीज, व इतर संस्था यांना विशेष सवलत.

धों. मु. देशपांडे-मुकुंदमाला कचेरी,

७६ हनुमान बिल्डींग ६–७ चुनामलेन. ल्यामिंगटन रोड मुंबई नं. ७.

मुकुंद-माला

( पुष्प १ लें—नाटक. )

# शिवकालीन तरुण

लेखक व प्रकाशकः—धों. मु. देशपांडे.

अहिंसा, ब्रह्मचर्य दिग्दर्शन, अवधानो, पृथ्वीवल्लभ, पावागडचा प्रलय अथवा भद्रकाली, आत्मबलिदान, अनारकली आणि सलीम अथवा अपराधी अकबर, साधू कीं सैतान अथवा संदिग्ध संसार वगैरे ग्रंथांचे तसेच वसंत माधव, स्वराज्यसूत्र, शिवाजीचा मावळा, श्रीमंत इत्यादि नाटकांचे कर्ते.

७६ हनुमान बिल्डींग ६—७. चुनमलेन, ल्यामिंगटण रोड—मुंबई नं. ७.

आवृत्ति पहिली.

( सर्व हक्क लेखकानें स्वाधीन ठेवले आहेत. )

मुद्रकः—कृष्णाजी नारायण सापळे
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, गिरगांव ब्याकरोड, टोपीवाला लेन, मुंबई नं. ४.

सन १९२९

किंमत चार आणे.

# जाहिरातदारांना विनंति.

प्रकाशन कार्य जाहिरातदारांच्या आश्रयामुळेंच शक्य होत असतें. व्यापारी वर्गानें पहिल्याच पुष्पाला आपल्या जाहिराती देऊन आमच्या कार्याला प्रोत्साहन दिलें त्याबद्दल आह्मी त्यांचे ऋणी आहोंत. या मालेवर त्यांनीं यापुढेंही अशीच कृपा ठेवावी अशी आमची त्यांना विनंति आहे..

## जाहिरातीचे दर—

| | | |
|---|---|---|
| कव्हर शेवटचें बाहेरील बाजू | रु. १५ | दरवेळेला |
| कव्हर पहिलें व शेवटचें आंतील बाजू | रु. १२॥ | ,, |
| सबंध पान | रु. १० | ,, |
| अर्धें पान | रु. ५ | ,, |
| पाव पान | रु. २॥ | ,, |

संपादक व प्रकाशकः—धों. मु. देशपांडे.
मुकुंदमाला कचेरी—७६ हनुमान बिल्डींग ६—७ चुनामलेन,
ल्यामिंगटण रोड—मुंबई नं. ७.

# जनतेच्या चरणीं—

शके १८५१ च्या चैत्र शु॥ प्रतिपदेच्या ( टि. प. ) १२ मार्च १९२९ इसवीं मंगळवारच्या सुमंगल प्रभातकालीं मुकुंदमालेचें १ लें पुष्प जनतेच्या सेवेला सादर करतांना आह्मी या नवमालेच्या उद्देशाचें थोडक्यांत दिग्दर्शन करण्याची संधी घेतो. मालेचा उद्देश धार्मिक, सामाजिक, नैतिक, बौद्धिक, आर्थिक, औद्योगिक व राजकीय उन्नतीला पोषक असेंच वाङ्मय प्रकाशित करण्याचा आहे. वरील ध्येयाला धरून असणारीं नाटकें, कादंबऱ्या, प्रहसनें, गोष्टी, निबंध व काव्यें फारच अल्प किंमतींत-जेमतेम छपाई, कागद व इतर खर्च सुटेल इतकीच किंमत आकारून-देण्याचा आमचा मानस आहे. आमची जनतेची सेवा करण्याची आकांक्षा पूर्ण होणें हें सर्वस्वी आमच्या सहृदय वाचकवृंदांच्या आश्रयावर अवलंबून आहे, हें उघडच आहे.

या मालेचें पहिलें पुष्प " शिवकालीन तरुण " याची थोडक्यांत हकीकत अशी आहे. सन १९२७ सालीं त्रिशत सांवत्सरिक श्री शिवजयंत्युत्सवाचे प्रसंगीं आह्मी " शिवाजीचा मावळा " ह्मणून एक छोटेखानी नाटक रंगभूमीवर आणलें. त्याचे ठिकठिकाणीं श्री गणपत्युत्सवांत व ग्यादरिंगमध्यें प्रयोग झाले. नाटक १॥-१॥। तासाचे असल्यानें आमच्या बऱ्याच मित्र मंडळींनीं तें चार तासाचें करण्याबद्दल सूचना केल्या. सुबोधसंगीत नाटकमंडळीचे चालक आमचे मित्र श्री. बागवे व श्री. राणे यांनीं दिसेंबर १९२७ मध्यें आमच्यामागें सारखा तगादा लावला नसता तर " शिवाजी मावळा " हें " शिवकालीन तरुण " या स्वरूपांत जनतेच्या सेवेला आलें असतें कीं नाहीं याची शंकाच आहे. तदनंतर नाटक मंडळींतील अडचणीमुळें त्यांच्याच अनुमतीनें आह्मी हें नाटक श्रीभारतविजय नाट्यसमाजाला लोकमान्यांच्या चौपाटीवरील स्मारक फंडासाठीं बसविण्याला दिलें. तें त्यांनीं फार परिश्रमानें बसविलें. स्मारकफंडकमिटीनें खेळ घेण्याचें ठरवून श्रीमत्-जगद्गुरू शंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी ) यांच्या अध्यक्षतेखालीं मंगळवार ता. १२-२-२९ इसवीं रोजीं व्हिक्टोरिया थिएटरमध्यें प्रयोग करण्याचें ठरलें; पण मुंबईतील दंग्यामुळें खेळ तहकूब करावा लागला. लोकमान्यांचें नांव उच्चारतांच संकटाला धैर्यानें तोंड देऊन

कर्तव्य करणाऱ्या वंद्य विभूतीची यशस्वी मूर्ति डोळ्यासमोर उभी राहते. त्यांचें चरित्र म्हणजे संकटांची मालिका तेव्हां त्यांच्या स्मारकाच्या कार्यांत अनपेक्षित संकट उद्भवलें यांत नाविन्य कसलें ? या कामीं स्मारक कमेटीचे सेक्रेटरी लोकमान्य-भक्त श्री. सयाजीराव सीलम, बी. ए. एल एल. बी. वकील यांचे तसेच श्री भारत विजय नाट्यसमाजांतील मंडळींचे आम्ही प्रेमपुर्वक आभार मानतो.

मुखपृष्ठावरील श्री शिवछत्रपतीच्या ब्लाक सुप्रसिद्ध चित्रकार श्री. फडके यांनीं आम्हाला दिला त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. हा ब्लाक पुण्याच्या शिवाजीमंदिरांतील बस्टचा आहे व असेच बस्ट कोल्हापूर टाऊनहॉल व इंदूर या ठिकाणीं ठेवण्यांत आले आहेत.

छपाईचें काम अडचणीच्या वेळीं आणि तेंही खास सवलतीच्या दरानें करून दिल्याबद्दल रामकृष्ण प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. सापळे यांचे आभार मानल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं.

आमचे वाचकवृन्दही आम्हाला उदार अंतःकरणानें सहाय करतील अशी आशा आहे.

ज्या भावनेनें आम्ही हें नाटक लिहलें ती स्वराज्यप्रेमाची व कर्तव्याची भावना जगदंबा मातेच्या कृपेनें आजच्या कर्तव्य जागृतीच्या काळांत तरुणांच्या मनांत उत्पन्न होवो अशी आम्ही योगेश्वर भगवान् श्रीकृष्णाच्या चरणीं प्रार्थना करून मुकुंद-मालेचें प्रथम पुष्प " मुकुंद " चरणीं अर्पण करितो.

मुकुंदाश्रमः—
शिवजयंति, मंगळवार फाल्गुन वद्य ३
शके १८५० (टि. प.) २६ फेब्रुआरी १९२९

सर्वांचा नम्र-शिवसेवक,
यॉ. मु. देशपांडे.

पत्ताः—७६ हनुमान बिल्डींग ६।७, चुनमलेन, ल्यामिंटनरोड मुंबई नं. ७.

---

मुकुंदमालेचें दुसरें पुष्पः—

" स्वातंत्र्याच्या रणांगणांत "

ग्र. सं. क्र.
म. ... शा. ग्रंथालय ...
क्र. ८८५
दि. ... ८
८८००
२०३७

॥ श्रीमहाकालिमहालक्ष्मीमहासरस्वतिजगदंबादेव्यैनमः ॥

# " शिवकालीन तरुण "

## अंक १ ला.

### मंगलाचरण.

सूत्रधारः—

[ पद—हमीर—त्रिवट. ]

भावें वंदूं जननिपदा ॥
भावें वंदूं मातृपदा ॥
यश गुण गातां टळति आपदा ॥ धृ० ॥
महिषासुरमर्दिनी भवानी ॥
वनविहारिणी उग्ररूपिणी ॥
अवतरुनी हरिते विपदा ॥ १ ॥
सिंधुरवदनी दुरितनाशिनी ॥
विश्वमोहिनी यशोदायिनी ॥
रत चरणीं ' सौभद्र ' सदा ॥ २ ॥

मित्रांनो! आदिशक्तीच्या स्तवनांत किती काळ गेला हें कळलं सुद्धां नाहीं. आपण आतां पुढच्या कार्याची तयारी करूं. ( जातात ) देवी माते! या देशाची तुला अजून करुणा येत नाहीं ना? माते!

[ चाल—पांडवा सम्राटपदाला. ]

हाय दीना दशा कैशी मातृभूमि पावली ॥
सकल छाया निराशेची महाराष्ट्रीं पसरली ॥
आपदा या धर्म कर्मी अविंधांनीं आणिली ॥
गोवधाला छीछलाला नाहिं सीमा राहिला ॥ १ ॥
मोहुनीया धना माना मातृसेवा त्यागिली ॥
मोहुनीया धना माना देशसेवा त्यागिली ॥
मोहुनीया धना माना धर्मसेवा त्यागिली ॥
नाकळे कशी तरुणांची वीरवृत्ति लोपली ॥ २ ॥

( तरुण प्रवेश करतो )

तरुणः—काय? तरुणांना दोष? महाराज, तरुणांना उगाच दोष कां देतां? आपणांला प्रचलित परिस्थितीचें मुळींच ज्ञान नसावें असं मला वाटतं. मातृभूमीची अशी स्थिति पाहूनच तरुणांच्या अंगांत तेजाचा संचार झाला. शिवप्रभूच्या निशाणाखालीं तरुणांनीं जमून हिंदूपदपादशाही स्थापन करण्याचं ठरवलं; इतकं असूनसुद्धां आपण तरुणांना दोष देतां याला काय म्हणावं? खरं म्हटलं तर—

॥ विपत्कालीं मातृलज्जा शिवप्रभूंनीं राखिली ॥

तरी देखील तरुणांना दोष! महाराज यावेळीं तरुण शिवाजी, आपल्या सोबत्यांसह गडांत अडकला आहे तेव्हां—

सूत्रधारः—असं आहे, तर मातृसेवेसाठीं प्राणाची पर्वा न करणाऱ्या शिवरायाला यावेळीं मदत करणं मी माझं कर्तव्य समजतों. तेव्हां आतां वेळ न गमवतां—

॥ स्वरूप देवा मातृचरणीं चला अर्पूं आपुली ॥ ( जातात )

८८५ ७५९ नाटक



# अंक १ ला.

## प्रवेश १ ला.

( स्थळः-राणोजीचा दिवाणखाना )
( राणोजी व तारा )

**राणोजीः**-( पलंगावर निजलेल्या तारेकडे पाहून ) विधीची लीला किती अगाध आहे ह्याचा आज मला अनुभव आला. या सुंदरीला वनदेवता ह्मणावं कीं अप्सरा ह्मणावं हेंच कळत नाहीं. अशा सुंदरतेच्या साक्षात देवतेला, परमेश्वराच्या सर्व श्रेष्ठ कुसुमाला, मोही माणसाच्या माधुरी मोहनेला संकटांतून सोडविण्याचा मान मला मिळाला, यालाच मी माझं सद्भाग्य समजतो. संकटग्रस्तांना मदत करणं हेंच पुरुषाचं पवित्र कर्तव्य आहे. समाजांतील स्वास्थ्य आपल्या आडदांडपणानं नाहींसं करणाऱ्यांना शासन करणं हेंच आमच्या हिंदुत्वाचं खरं लक्षण आहे. संकटांत सांपडलेली व्यक्ति, स्त्री असो, पुरुष असो, स्वजातीची असो, परजातीची असो, स्वधर्माची असो, परधर्माची असो शत्रु असो किंवा मित्र असो, तिचं रक्षण करणं हाच खरा धर्म आहे. परमेश्वरा कर्तव्य पालनाची तूं मला सुबुद्धि दिलीस याचा मी कसा उतराई होऊं ? ( तारा हालचाल करते तारेकडे पहून ) सुंदरी तूं कोणीही अस. तुझ्या मुखकमलावरचा पदर सरकल्यानं तुझ्या चंद्राननाच्या दर्शनाचा मला संपूर्ण लाभ मिळावा ह्मणून कांहीं वेळ तरी अशीच पडून रहा. ( पुन्हा हालचाल करते व तोंडावर पदर घेते ) अरेरे ! मुखचंद्राच्या दर्शन सुखाचा पूर्ण लाभ देखील मला मिळूं नयेना !

**तारा**.-( अर्ध निद्रेंत ) सरू ! सरू ! ( डोळे उघडत, इकडे तिकडे पाहाते ) माझं स्वप्न, खरंच ! स्वप्नच तें ! मी स्वप्नांत तर नाहींना ! मी कुठं आहे ! सरू ! अग सरू ! हा महाल कुणाचा ! मला इथं कुणीं आणलं ! ( राणोजीकडे पाहून ) हो ! तुह्मी तेच कां ? स्वप्न खरं झालं ! मी इथं कशी ? ( राणोजीकडे पाहून ) आपण कोण ?

**राणोजीः**-सुंदरी, मला राणोजी ह्मणतात.

**तारा**:-राणोजी ! शिवाजी महाराजांचे शूर सरदार राणोजीराव ! आपणचना ? हो, तेंच तें सुंदर नांव, आतां मला आठवलं. स्वप्नच तें. अगदीं खरं झालं. म्हणतात स्वप्नं तीं स्वप्नं, पण माझं स्वप्नं मात्र खरं झालं. स्वप्नांत मला दिसलं तेंच मी पहातें. मी राणोजीरावांच्या महालांत कशी आलें, कीं मी हें स्वप्नंच पाहात आहे. ( घाबरते )

**राणोजी**: आपण स्वप्नात नाहीं पण खरोखरीच माझ्या झोंपडींत आहांत. आपणाला भिण्याचं किंवा घाबरण्याचं कांहीं कारण नाहीं. अविधांनीं आपणांवर आणलेल्या प्रसंगाची आठवण यावेळीं देणं बरं नाहीं, तरी मला आपणाला फार वेळ संशयांत ठेवतां येत नाहीं.

**तारा**:-माझी सरू इथं कुठं दिसत नाहीं ती ?

**राणोजी**:-आपणांवर प्रसंग ओढवला त्या झटापटींत सरू कुठं नाहिंशीं झाली. आपण कोण, कुठल्या याची मला कांहींच माहिती नसल्यानं मला आपणाला इथं आणल्याशिवाय गत्यंतरच नव्हतं.

**तारा**:-त्यावेळीं, आपणाला परमेश्वरानंच धाडलं, आपले उपकार मी कसे फेडूं ?

**राणोजी**:-आपल्या दर्शनानें मी कृतार्थ झालों, उपकार मानण्याचं कांहींच प्रयोजन नाहीं.

**तारा**:-माझ्या बाबाना ही गोष्ट कळली म्हणजे ते आपल्या उपकाराची फेड केल्याशिवाय राहाणार नाहींत

**राणोजी**:-आपलं व आपल्या वडिलांचं नांव कळविल्यास मजवर अनंत उपकार होतील,

**तारा**:-बाबांचं नांव 'मानाजीराव' मला पाहिल्याबरोबर त्यांना आनंद होईल. ते आपले उपकार जन्मभर विसरणार नाहींत. मला 'तारा' म्हणतात.

**राणोजी**:-किती मधुर नांव विधीच्या कृति इतकीच सुंदरता नांवांत देखील आहे, ताराबाई ! आपल्या मंजुळ वाणींतून आपलं गोड नांव—

**तारा**:-राणोजीराव, इथून माझं घर अगदीं जवळ आहे, माझे बाबा, माझी आई, काळजींत असतील ! आपल्या उपकाराची फेड—

**राणोजी:**–ताराबाई! आपल्या इच्छेप्रमाणं मी आपल्याला आपल्या घरीं पोहोंचवतों. मानाजीरावांचा परिचय व्हावा अशी माझी फार दिवसांची इच्छा होती. पण त्यांचा व आमचा मार्ग निराळा असल्यानें योगायोग आला नाहीं. या प्रसंगानं तरी परिचय होईल. ही ईश्वरी कृपाच म्हटली पाहिजे तारा-बाई, थोडा उपहार केल्यानंतर, माझ्या शिपायाला बरोबर देऊन मी आपणांस पोहोंचवीन. विनंतीचा अव्हेर खचित होणार नाहीं.

**तारा:**–उपकारकर्त्यांच्या इच्छेला मान न देण्या इतकी कृतघ्न कोणतीच हिंदु कुमारिका असणार नाहीं. कृतज्ञता हा हिंदुत्वाचा जीवात्मा आहे. आपणाला विनंती करण्याचें कारणच नाहीं. आपला शब्द म्हणजेच आज्ञा आपलं ऋण कसं फिटेल याचीच मला आतां सारखी काळजी लागली आहे. राणोजीराव माझी आपल्या चरणीं एक प्रार्थना आहे. कृपा करून मान्य कराल ना?

**राणोजी:**–ताराबाई! सांगा, आपली आज्ञा करूं या कीं त्याप्रमाणें क्षणार्धांत करीन. कुमारीकांच्या आज्ञा पालन करून त्यांना सदैव आनंदित करणं हेंच आम्हां तरुण शिपायांचं काम.

**तारा:**–शिवाजी महाराजांना पाहाण्याची माझी इच्छा आहे. मला गडा-वर न्याल का?

**राणोजी:**–ताराबाई महाराजांचा मी अनन्यसेवक असल्यानं मला त्यांच्या पुण्यपदांचं रोज दर्शन घडतं. पण महाराज सध्या गडांत अडकले असल्याकार-णानं, मीच सध्या त्यांच्या दर्शनसुखाला अंतरलों आहें. ताराबाई! पण तुम्हीं हें साहस करूं नये. शिवरायांचा मार्ग व तुमच्या बाबांचा मार्ग हे परस्पर विरोधी आहेत. वडिलांना जें आवडणार नाहीं तें कुमारिकांनीं करणं बरं नव्हे.

**तारा:**–गडांतून त्यांची कधीं सुटका होईल?

**राणोजी:**–त्यांचं आज काय सांगावं?

**तारा:**–मी बाबांची संमति मिळवीन. मगतर मला महाराजांच्या दर्श-नाला न्याल ना?

**राणोजी:**–जरूर नेईन, ताराबाई! उपहाराला चलताना?

तारा:-आपल्या अनुज्ञेचा अवमान कधींही होणार नाहीं. आपणांजवळ आणखी एक प्रार्थना आहे.

राणोजी:-प्रार्थना कशाला ? व ती एकच कां आपल्या हजारो आज्ञा मी ताबडतोब अमलांत आणिन. ताराबाई सांगा.

तारा: राणोजीराव, परवां माझ्या बाबाला भेटाल कां ! आपण आलां म्हणजे-

राणोजी:-आपली आज्ञा अमान्य होणंच शक्य नाहीं पण-

तारा:-मग पण कां ?

राणोजी:-मी ज्या कामांवर आहें त्या कामापुढं मला इतर कामं टाकावीं लागतात यावेळीं महाराज गडावर आहेत. इथून मला केव्हां कुठं जावं लागेल तें मी आतां कसं सांगू ! ताराबाई तुम्हांला कबूल केलं व मला महाराजांच्या सेवेला त्याच वेळीं जावयाचं असलं तर मी तुमच्याकडे कसा येऊं ? ताराबाई, तुमचा व तुमच्या बबांचा विरस करण्याला मी कारण होऊं इच्छित नाहीं.

तारा:-आपण नाहींना विनंति मान्य करीत ?

राणोजी:-कर्तव्यपालनांपुढं आनंदाच्या व प्रेमाच्या प्रसंगाला मला कसं बरं हजर राहातां येईल ?

तारा:-मग आपण नाहींच ना येणार ?

राणोजी: ताराबाई, आपल्यासारख्या सुंदरींनीं महाराजाच्या दर्शनाला उत्सुक असणाऱ्या तरुण कुमारकांनीं, तरुणाला कर्तव्य पालनाला जा म्हणण्यांत जास्त भूषण मानलं पाहिजे, असं तुम्हांला नाहीं का वाटत ?

तारा:-अगदीं असंच वाटतं.

राणोजी:-मग मला असं अडवितां कशाला ?

तारा:-आपल्या उपकारानं आपल्यासाठीं जें करावं म्हणून वाटतं, तें कर्तव्यच आपणांला अडवितं, त्याला मी काय करूं ?

राणोजी: शिवरायाच्या सेवेपुढं मध्यां सर्व गोष्टी बाजूला ठेवल्या पाहिजेत.

तारा: मग आपण असा हुकूम करा ना ! आपला हुकूम मी थोडाच मोडणार आहे करायचा हुकूम ! मग याल ना ?

राणोजी:-येईन पण—

**तारा**:–कामावर गेला नाहींतर! मग झालं ना! मी आपली देवासारखी वाट पाहीन. आपण आलांत म्हणजे मला आनंद होईल. यायचं बरं.

**राणोजी**:–थोडा फराळ करा मग आपल्याला पोहोंचवितों.

**तारा**:–जशी आपली आज्ञा. (जातात.)

---

## प्रवेश २ रा.

[ विशाळगडाच्या तळेटीचा प्रदेश. जंगलाचा देखावा–ओढ्याचा कांठ. ]

( सुभानराव व गणोजी )

**सुभानराव**:–दादा, आज सकाळपासून माझ्या मनाला कशी हुरहुर लागली आहे, काय होतं कांहीं कळत नाहीं!

**गणोजी**:–मलाही आज तुझ्यासारखंच होत आहे. असं आज कां बरं वाटावं! माझा डोळा सारखा फडफडतो आहे!

**सुभानराव**:–दादा, आज दोन दिवस माझ्या मनांत, तुला कांहीं सांगावं असं वाटतं पण–

**गणोजी**:–मग, तुझं मी ऐकणार नाहीं असं कां तुला वाटतं?

**सुभानराव**:–तसं नाहीं, पण माझे विचार तुला पटले म्हणून घरांतल्या वडील माणसांना ते पटतील काय?

**गणोजी**:–तुला काय सांगायचं तें सांग तर खरा, वडिलांच्या आवडी निवडीचा प्रश्न पुढचा आहे.

**सुभानराव**:–दादा, आज पन्हाळगडाला वेढा पडून किती दिवस झालेत. आपल्या आंतल्या लोकांची कशी दशा झाली असेल! सिद्दीजोहार व फाजलखान यांनीं किल्ला सर करण्याचा व अफझुलखानाच्या वधाचा सूड म्हणून शिवाजीला धरून जिवंत जाळण्याचा पण केला आहे.

**गणोजी**:–पण, आपल्याला यांत काय करतां येईल?

**सुभानराव**:–दादा, आपल्याला या जंगलाची, तसेंच चोर वाटांची जितकी माहिती आहे तितकी कुणालाच नाहीं. माझा विचार ऐकशील तर, आपण निदान शिवरायाला तरी गडांतून काढून आणलं पाहिजे.

**गणोजी:**–या बाबतींत बाबा खास रुकार देतील काकांच्या रुकाराविषयीं मला मुळींच काळजी नाहीं, कारण त्यांचा जीव यावेळीं वर खालीं होत आहे हें मला ठाऊक आहे. पण डोळ्यांनीं दिसत नसल्यानं, त्यांचा नाइलाज झाला आहे.

**सुभानराव:** दादा, या कामीं आपले देह खर्ची पडले तरी पर्वा नाहीं पण महाराजांची सुटका करण्याचा प्रयत्न आपण केलाच पाहिजे.

**गणोजी**–ज्याला काळीज आहे त्याला हें सांगायला कां पाहिजे ? एवढ्या लहान वयांत एवढी हिंमत धरून मोठमोठ्या सरदारांचा ज्यानं धुव्वा उडवून दिला विजापुरच्या दरबारांत ज्याचं नांव निघतांच दरबारातल्या सरदारांच्या अंगांत कापरं भरत, तो आमच्या मावळ्यांचा वाघ गडावर अडकून राहिला व दुर्दैवानं फाजलखानाच्या हातांत सांपडला तर आह्मा जिवंत असून काय उपयोग ! आह्मी मेल्याशिवाय शिवरायाचा एक केससुद्धां शत्रूला मिळणार नाहीं.

**सुभानराव:**–दादा, तीं पहा कोल्हीं आणि तीं रान मांजर ! आज कशी चल्लीं जातात तीं !

**गणोजी:** आणि तो 'त्या–नको–नांवसुद्धां नको ! ( घुबडाचा आवाज )

**सुभानराव**–अपशकुन आणि हुरहुर यानीं आज कसा पिच्छा पुरवला आहे.

**गणोजी:**–ही बऱ्याचीं लक्षणं नाहीत !!

**सुभानराव**–दादा, आतां शकुन अपशकुनाचा विचार करण्याचं आपल्याला कारण नाहीं. जिथं तुह्मी तिथं मी आणि शिवरायाची सेवा हा माझा धर्म. दादा, परक्यांच्या जुलमाची आठवण झाली ह्मणजे अंगावर कांटे उभे राहातात; संतापानं डोकं फिरायला लागतं आणि काय करूं नि काय नको असं होतं. दादा, या जुलमाचा प्रतिकार केलाच पाहिजे. शाब्दिक प्रतिकारांत कांहीं राम आहे असं मला वाटत नाहीं. या जुलमाचा खरोखर प्रतिकार करावयाचा असेल–त्याची पुनरावृत्ति टाळावयाची असेल–तर त्याला एकच उपाय आहे, आणि तो ह्मणजे आह्मीं आमच्या जिवावर उदक सोडलं पाहिजे. असं जर आह्मीं केलं नाहीं तर गुलामगिरीचा पायबंद कसा तुटेल ? आह्मा सर्वांना स्वातंत्र्य देण्यासाठीं महाराजांचा अवतार आहे. तेव्हां त्यांच्या मंगलकार्यांत हा देह खर्ची पडला तर त्यांत मला आनंद आहे.

**गणोजीः**–तुझ्यासारखे हजारों तरुण, आज शिवरायाच्या सेवेला तत्पर आहेत, म्हणूनच यशाच्या आशेला जागा आहे. काकांची बाबांची, व आईची परवानगी मी मिळवीन. चला आतां! आपल्याला अंधार पडण्यापूर्वीच घरीं पोहोंचलं पाहिजे.. ( जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

[ पन्हाळ गडावरील शिवाजीच्या महालांतील दीवाणखाना ]

( शिवाजी, तानाजी, बाजी व राघो बल्लाळ. )

**राघोबल्लाळः**–महाराजांच्या चरणीं एक विनंती आहे.

**शिवाजीः**--खुशाल बोला, थोडा देखील संकोच ठेऊं नका.

**राघोबल्लाळः**–तानाजी, आपलं बोलणं चालुं द्या.

**तानाजीः**-माझं आणि तुमचं अंतर यांत थोडंच आहे. दोघांचाही मार्ग एकच व उद्देशही एकच, तेव्हां यांत भिन्नता येणार कशी ?

**राघोबल्लाळः**–असं जरी आहे तरी बाजी प्रभू आणि तुम्ही असल्यानंतर आमच्यातर्फे महाराजांना विनंती करण्याचा मान तुम्हा दोघांकडेसच आहे.

**बाजीप्रभूः**–तानाजी म्हणजे आम्हां सर्वांचे मुख्य. ज्याचं काम त्यानंच केलं पाहिजे.

**तानाजीः**–महाराजांच्या चरणीं चार शब्द आपणां सर्वांतर्फे सांगण्याचा प्रसंग मला केव्हांही सुखाचाच वाटतो महाराज' आताच्या आपल्या लढाइच्या धोरणांत, कांहींतरी फरक केला पाहिजे, अशी सर्वांतर्फे मी विनंती करतों.

**शिवाजीः**–तानाजी आज दोन दिवस मी देखील याच चिंतेंत आहे, आणि तेवढ्यासाठींच, आज तुम्हाला मी बोलावलं आहे. शत्रूला अंगावर घेण्यात, मला वाटतं आपली चूक झाली. पण आतां गतगोष्टीबद्दल शोक न करतां पुढचा विचार केला पाहिजे. या बाबतींत आपण पुढं कसं धोरण ठेवावं व सध्यांची लढाईची दिशा कशी बदलावी या विषयीं आपला झालेला विचार मला कळल्यास बरं !

**तानाजीः** महाराजांची आज्ञा हाच आमचा विचार. महाराजांच्या इच्छेबाहेर एक पाऊलही आम्ही टाकणं शक्य नाहीं.

**बाजीप्रभू**:-आम्ही शिपायी लोक सेनापतीच्या हुकमाची बजावणी करण्याचं जाणतो. पाय मागें न घेतां शत्रूला तोंड देण्याचं आमचं काम. लढाईचं धोरण आखणं हें कार्य आमचं नाहीं.

**राघोबल्लाळ**: महाराजांनीं वाटेल ती आज्ञा करावी पण या लढाईचा शेवट आतां लवकर आणावा.

**शिवाजी**:-मला देखील आतां असंच वाटूं लागलं आहे. आपलीं कोठारं जरी अजून भरलेलीं आहेत व अशाच पद्धतीनं लढून जरी आपण या किल्ल्यांत आणखी चार महिने निभाव काढूं शकूं, तरी आतां असं कोंडून राहाण्यांत अर्थ नाहीं शत्रूंवर वेळीअवळीं छापे चालून नेताजी बाहेर त्यांना थोडाफार हात दाखवीत आहे तरी त्यानं शत्रू जरीला येणं शक्य दिसत नाहीं आपलं सैन्य व शत्रूचं सैन्य यांची तुलना करतां आपल्यापेक्षां शत्रूची संख्या कितीतरी पटीनें जास्त आहे, तेव्हां काय करावं हा खरोखरच फार बिकट प्रश्न आहे!

**राघोबल्लाळ**:-तरी पण त्यांत घाबरण्याचं कांहींच कारण नाहीं. कारण भाडोत्री वीसाला आमचा एक शिपायी खात्रीनं पुरा पडेल. शत्रूची संख्या फार झाली तर आपल्या दसपट असेल.

**तानाजी**:-आतां बाहेर पडल्याशिवाय दुसरा मार्ग दिसत नाहीं.

**बाजीप्रभू**: शत्रूवर एकदम तुटून पडून, यावेळीं आपण निकाल लावून घेतला पाहिजे कारण जसजसा काळ अधीक जाईल तसतसं शत्रूचं संख्याबळ जास्त होणार व आपल कमी होत जाणार. इतक्या उपर महाराजांची इच्छा!

**शिवाजी**:-शत्रूवर आपण तुटून पडलों तर यश मिळणारच नाहीं असं जरी नक्की सांगतां यत नाहीं तरी संख्याबलाचा तसाच इतर बाबतींचा विचार करतां यशाकडे कांटा झुकत नाहीं.

**तानाजी**:-आपण आज्ञा करा नि मग पहा! यश मिळणार नाहीं म्हणजे काय?

**बाजीप्रभू**:-अपयश! महाराज हा शब्द आपल्याकृपेनं आम्हाला ठाऊक नाहीं. शत्रूवर तुटून पडल्यानंतर मारुं किंवा मरुं हीच एक गोष्ट आम्हीं जाणतों रणांगणांतून शत्रूला पाठ दाखवून, अपयशाचं काळं तोंड दाखविणारा एकही इसम निदान आज तरी आपल्या पदरीं नाहीं हें मी खात्रीनें सांगू शकतों.

**राघोबल्लाळ:**–महाराजांनीं आतां चिंता करण्याचं कारण नाहीं. शत्रूवर तुटून पडण्याला आज्ञा करावी.

**शिवाजी:**–तानाजी, बाजी, राघोबा, आपला आमच्यावरील अढळ विश्वास पाहून, आमचं चित्त यावेळीं प्रसन्न झालं आहे. आपणा सर्वांची हिंमत व शत्रूवर तुटून पडण्याचा उत्साह पाहून आम्हांला मोठा अभिमान वाटत आहे. खात्री आहे कीं, या लढ्यांत नको ! नको ! तो भलतांच अमंगळ तरंग डोळ्यांसमोर नको ! हो ! आपणांला यश मिळेल पण त्याला फार किंमत पडेल.

**तानाजी:**–महाराज चांगली किंमत दिली तरच चांगला माल मिळतो ना.

**शिवाजी:**–असं जरी असल तरी उगीच अत्रा नी सवा किंमत देऊन माल घेतां कामा नये " आंथरुण पाहून पाय पसरावेत " असा वडिलांचा उपदेश आहे. आपलं कमीतकमी नुकसान होऊन या लढाईंत आपणांला जास्तींत जास्त फायदा कसा काढतां येईल, अशा पद्धतीवरच आपल धोरण आखलं पाहिजे.

**तानाजी:** महाराज ! ही वैश्यवृत्ति झाली. हा क्षत्रीयांचा मार्ग नव्हे.

**शिवाजी:**–क्षात्रवृत्तीला वैश्यवृत्तीची जोड नसली तर क्षात्रवृत्ति जिवंत राहाणंच शक्य नाहीं. ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य आणि शूद्र या सर्वांच्या वृत्तीचा एकमेकींशीं इतका निकट संबंध आहे कीं, कोणतीही एक वृत्ति स्वतंत्र तऱ्हेनं कांहींच करूं शकणार नाहीं. यशाला सर्वांच्या सहकार्याची खास जरुरी आहे.

**बाजीप्रभू:**–लढाईचं क्षत्रियांचं धोरण सोडून आपण व्यापारी धोरण स्वीकारल्यानं तरी यश मिळेल ना ?

**शिवाजी:**–माझा मतितार्थ इतकाच कीं साम, दाम, दंड, भेद यापैकीं प्रथमतः आपण सामाचा उपयोग करून पाहूं.

**तानाजी:**–महाराज ! सामाच्या गोष्टी, विजेते लोक बोलूं शकतात. जितांचा साम ह्मणजे रडगाणं ! त्याला कोण विचारणार ?

**शिवाजी:**–राजकारणांत अमकाच एक आग्रह धरून चालत नाहीं. आज जरी मातृभूमीच्या उद्धारासाठीं, स्वतांच्या जीवावर तिलांजली देणारे हजारों वीर तयार आहेत, तरी त्यांच्या जिवाचं शक्य तोंवर रक्षण करून जनतेचा शक्य तेवढा जास्त फायदा कसा करतां येईल हें आपण पाहिलं पाहिजे.

**राघो ल्लाळ**-शत्रूवर तुटून पडल्यानें हें यावेळीं साधणार नाहीं काय !

**शिवाजीः** मुळींच साधणार नाहीं असं मला वाटतं. शिवाय शत्रूंवर तुटून पडण्याला हा समय नाहीं.

**तानाजीः**-मग यावेळीं काय केलं पाहिजे ?

**शिवाजीः**-यावेळीं आपण तहाचं बोलणं लावलं पाहिजे.

**बाजीप्रभूः**-तहाचं बोलणं ! तह आणि त्याचं बोलणं आपण सुरू करावं ! महाराज ! नका ! ही तहाची आपत्ति नको. शिवाजी महाराज विजापुरकराला शरण गेले हे ऐकण्यापूर्वीच या जीवाची समाप्ति झाली पाहिजे. स्वातंत्र्याच्या श्रीगणेशाच्या सुरवातीला तहाचं बोलणं ! स्वातंत्र्यासाठीं लढत लढत महाराज आम्हीं धारातीर्थीं देह ठेऊं, पण तह नको ! तहाचं बोलणं शत्रूनं सुरू केलं पाहिजे शत्रू शरण आल्यानंतर सुडाची भावना न ठेवता आम्हीं त्याचं रक्षण करूं ! इतकंच नाहीं पण शत्रूभावाचा त्याग करून त्याला मित्र म्हणून लेखूं, पण दयेची याचना आम्ही प्राणांती करणार नाहीं. मातृभूमीच्या उद्धारासाठीं हें शीर लढत लढत मातेच्या वक्षस्थलीं पडेल; पण मातेला परावलंबी बनविणाऱ्या अविधांच्या चरणीं नमणार नाहीं.

**शिवाजीः**—बाजी, आपल्या पराक्रमाची तशीच आपल्या उज्वल देशाभिमानाची मला जाणीव आहे. आतांची तुमची नीति ही माझ्या रजपूत पूर्वजांच्या नीतीशीं तंतोतंत जुळते. ही महाराणा प्रतापसिंहाची नीति आहे; ही उत्तरेच्या रजपूतांची नीति आहे; आम्हीं दक्षिणेंतल्या रजपुतानीं ती नीति थोडी बाजूला ठेवून, सध्या चाणक्य नीतीचा स्वीकार केला पाहिजे. मातृभूमीला पारतंत्र्यातून दूर करण्यासाठीं सध्याच्या काळीं चाणक्य नीतीचाच उपयोग इष्ट आहे. यावेळीं तहाची हूल दाखवून आपण या किल्यांतून बाहेर पडण्यांतच आपला फायदा आहे. पुढें टाकलेले पाऊल यावेळीं मागें घेतलेंच पाहिजे. व म्हणूनच तहाची वाटाघाट आपण सुरू केली पाहिजे.

**तानाजीः** महाराज, यावेळीं आपण माघार घेतली, यावेळीं आपण पडती घेतली तर आपल्या लोकांतील उत्साह नाहींसा होईल. स्वदेश प्रेमाचं या घटकेला आपल्या लोकांच्या अंगांत इतकं वारं भरलं आहे कीं, ते यावेळीं मागं

पुढं न पहाता आत्मबलिदान करण्यास देखील तयार होतील, महाराज अशा तरुण देशसेवकांच्या उत्साहाचा भंग झाला तर आपल्या कार्यांत शिथिलता उत्पन्न होईल.

**शिवाजीः**–तानाजी, तुमचं म्हणणं युक्तिवादाला धरुन असलं तरी पण यावेळीं माघार घेणं यांतच मला भावी कल्याण दिसत आहे. स्वदेशप्रेमाचा तरुणांचा उत्साह विनाकारण खर्च होण्यापेक्षां, त्यांचा थोडाकालपावेतों झालेला उत्साह भंग कांहीं वाईट नाहीं. यावेळीं तहाची वाटाघाट इष्ट आहे.

**राघोबल्लाळः**–महाराज पण असं करण्यांत तरुणांचाच नुसता उत्साह भंग नसून, यांत आपणांस कमीपणा आहे; नुकत्याच उगवणाऱ्या महाराष्ट्राचा हा अपमान आहे.

**बाजीः**–स्वातंत्र्याच्या पवित्र वातावरणांत प्रवेश केल्यानंतर तहाची वाटाघाट सुरु करण्यांत, परतंत्रतेचा पुनः स्वीकार करावा लागेल. पारतंत्र्याच्या कलंकित प्रदेशांत शिरून जिवंत राहाण्यांत महाराज काय भूषण आहे ?

**तानाजीः**–स्वातंत्र्यांतील हालअपेष्टांपेक्षां पारतंत्र्यांतील ऐश्वर्याला भुलणाऱ्यांनां तहाची भाषा पत्करेल. महाराज असा अपमानाचा प्रसंग आपण ओढवून घेऊं नका.

**शिवाजीः**–मानापमानाच्या मोहाला बळीपडून मी कर्तव्य पराङ्मुख झालों तर त्यांत महाराष्ट्राचं नुकसान आहे.

**तानाजीः**–महाराज, आम्हीं आमचं अंतःकरण आपल्यापुढं खुलं केलं आहे.

**बाजीः**–महाराज, आपण कराल तें मातृभूमीच्या हितासाठींच कराल अशी आमची पूर्ण खातरी असल्यानंच आम्हीं आपल्या निशाणाखालीं जमलों आहोंत भारतमातेच्या उद्धारासाठीं जिथं प्राणर्पण करण्याची तरुणांची तयारी आहे तिथंआपल्या आज्ञेखातर कांहीं काळ आम्ही अपमान देखील सहन करूं पण आपला शब्द आम्ही खालीं पडूं देणार नाहीं. वरपांगीं आमचे विचार तरुणांना उत्साहवर्धक असले तरी ते कदाचित चूक असण्याचा संभव आहे.

**शिवाजीः**–तानाजी, बाजी, राघोबा, आपला व आमचा यावेळीं एक मनसुबा होत नाहीं. तरी वेळ ओळखून मी यावेळीं तहाची चर्चा सुरु करावयाचं ठरविलं

आहे, आणि मला खात्री आहे कीं, श्रीजगदंबा भवानीमातेच्या कृपेनें सर्व कांहीं सुरळीत होईल.

**बाजीः**–जशी महाराजांची इच्छा. आपल्या इच्छेबरहुकूम वागणं हेंच आमचं सध्याचं कर्तव्य आहे व हीच लढाईची खरी शिस्त आहे.

( सर्वजण जातात )

---

## प्रवेश ४ था.

( स्थळ—मानाजीरावांचें घर. )

( मानाजीराव )

**मानाजीरावः**–विधिघटनेच्या विलक्षण योगायोगानं आमचा हा विजोड जोडा जमून अवळजवळ अडीच तपं झालीं तरी देखील असा एकही दिवस जात नाहीं कीं त्या दिवशीं आमचा खटका उडत नाहीं. झोपेंतसुद्धां मला आमच्या कलहाचीं स्वप्नं पडतात. मला वाटतं आम्हां दोघानांहीं जन्माला घालण्याचे वेळीं त्या ब्रह्मदेवाचं कोणाशीं तरी भांडण जुंपलं असलं पाहिजे; व त्याचाच परिणाम आमच्या जन्मावर झाला. बरं कलहाला कांहीं कारण सुद्धां नको. उद्यां शेतांत जायचं ह्मटलं कीं, देवाच्या दर्शनाला जायचा हुकूम सुटलाच. कोठें बाहेर जाण्याची गोष्ट काढली कीं घरांतल्या हजार भानगडी पुढं यायच्या. बरं घरांतल्या कामकाजाविषयीं ह्मणावं तर घरांत जिथली वस्त तिथं ठेवलेली कधीं मिळायचीच नाहीं. राग तर जसा कांहीं नाकाच्या अग्रावर. एखाद्या नागिणीसारखीं सदोदीत फूं फूं करणाऱ्या अशा सर्वांग सुंदर सहचारिणीशीं माझी जन्मगांठ त्या ब्रह्मदेवानं घातली हे उपकारच समजले पाहिजेत. पण इतकं जरी असलं तरी प्रेमळपणांत तिचा हात कोणी धरूं शकणार नाहीं. माझं थोडं कुठं दुखलं कीं तिचा जीव कसा खालीवर होतो. पतीच्या सुखासाठीं तळमळणारी तिच्यासारखीं तीच. मी आजारी पडलों कीं तिनं घेतलंच देवीपुढं धरणं. या लुटारु शिवाजीच्या भानगडीमुळें मला माझ्या प्रेमळ पत्नीशीं बऱ्याच दिवसांत सुखाचा एक शब्द देखील बोलण्याला सवड झाली नाहीं. खरोखर तिला काय बरं वाटत असेल (येत असलेल्या सावित्रीकडे पाहून) सावित्री ! परमेश्वरानं तुला जरी अशी सर्व गुणसंपन्न केली असली तरी रंगांत मात्र परमेश्वर तुझ्यावर खचित रागाव-

लेला दिसतो. तुझा रंग म्हणजे कोळशानं देखील लाजून लपलं पाहिजे. पण तुझा हा सर्व काळा रंग, तुझा हा कोळशासारखा काळा कुळकुळीत पक्का काळा रंग—

( सावित्रीबाई प्रवेश करते )

**सावित्री**:–काय म्हटलं ! कोळशासारखा काळा कुळकुळीत पक्का काळा रंग– ऑं ! कोणाचा ? माझा कां ? आहे मी काळी कुळकुळीत. कोळशाहून काळी आहे. काजळासारखी पक्की काळी आहे. मग आतां काय त्याचं इतक्या वर्षांनं आज पश्चात्ताप झाला आहे वाटतं. लग्नाच्या अगोदर आपण स्वतः पाहिलं होतं ना मला मग त्यावेळीं मी गोरी होतें वाटतं कीं आतांच काळी झाल्यें. म्हातारपणीं असं करणं बरं दिसत नाहीं.

**मानाजी**:–मी तरी तेंच म्हणतों. म्हातारपणीं आपण दोघांनीं एक विचारानं चालण्यांतच मौज आहे आपला आतांपर्यंतचा संसार ही झाली पहिली मौज. नि आतां पुढं होईल ती नवी मौज.

**सावित्री**:-विनोदशास्त्र शिकण्यालाच मला वाटतं आपण हा महिना घालविलांत. आपण त्या विनोद शास्त्राच्या नादीं लागला आहांत, पण सध्यां आम्हा स्त्रियांच्या अब्रूवर ते अधम घाला घालीत आहेत. आणि पुरुषासारखे पुरुष असून तुम्हाला या प्रसंगाचं कांहींच वाटत नाहीं. देवा ! केवढी ही स्वार्थी पुरुष जात. स्वार्थापुढं त्यांना दुसऱ्यांच्या जिवाचं, अब्रूचं देखील कांहींच वाटत नाहीं. देवा, नारायणा ! कशाला बाबा अशांच्या पदरीं अजून मला ठेवलंस !

**मानाजी**: अगं ! झालं तरी काय असं. दुसऱ्याच्या भानगडींत आपण पडूं नये. ज्यानं त्यानं आपल्या पुरतं पाहावं. लोकांच्या घरच्या उठाठेवी आपल्याला कशाला ? आपल्याकडे वर डोळा करून पाहाण्याची कुणाची ताकद आहे ?

**सावित्री**: पाह्याचं ! पाह्याचं ! तें आणखीं काय राह्यलय ! प्रत्यक्ष माझ्या तारीच्या अंगावर त्या नीचानीं हात टाकला आणखी काय पाहिजे. ते राणोजीराव त्यावेळीं आले म्हणून बरं ! पोर आज हयात आहे. नाहीं तर नीचानीं तिचं काय केलं असतं कोणाला ठाऊक ! दरबारचे सरदार ना तुम्हीं ! अहो तुम्ही हिंदू ! तुम्हाला किंमत आहे कुठं !

**मानाजी**:–मला किंमत नाहीं ! आतांच्या आतां त्यांची खोड मोडतों. सुभेदार साहेबाला तुसतं कळविलं कीं बस्स !

**सावित्री**:-असे कांहीं सुभेदाराचे तुम्ही मालकच. त्या दिवसापासून माझ्या तारेनं रडून रडून भुई थोडी केली. असा प्रसंग वैऱ्यावरसुद्धां येऊं नये.

**मानाजी**:-प्रसंग येऊं नये हें खरं, पण आपण जर ओढवून घेऊं लागलों तर दोष कुणाचा?

**सावित्री**:-म्हणजे!!

**मानाजी**:-या धामधुमीच्या वेळीं, तारेला त्वां एकटं बाहेर कां जाऊं दिलंस? झाल्या गोष्टीबद्दल दुसऱ्यांना दोष देण्यांत काय होणार? बरं तें जाऊं दे म्हणा, तुला सांगणार सांगणार म्हणून रोज ठरवितों पण शेवटीं विसरतों म्हातारपणीं असंच चालायचं. हें पहा संपतराव किंवा खुशालराव यापैकीं कोणातरी एकाला तारा द्यावी असा मी बेत केला आहे. पण हा निश्चय कसा तडीला जाईल देव जाणे!

**सावित्री**:-कां बरं?

**मानाजी**:-कालच खानसाहेबांचा निरोप आला आहे कीं, आपल्या तारेसाठीं त्यांनीं एक ठिकाण पाहिलं आहे.

**सावित्री**:-खानसाहेबांना आपली मोठीच काळजी आहे म्हणायची?

**मानाजी**:-तसं नाहीं, पण आम्हां सरदारांच्या मुलींच्या लग्नाला त्यांनीं संमति दिली पाहिजे, तेव्हां साहाजिकच ते सांगतील तें ठिकाण पसंत करण्याशिवाय आपणाला गत्यंतर नाहीं.

**सावित्री**:-पण खानसाहेबाचं आपण नाहीं ऐकलं तर ते काय करणार?

**मानाजी**: आपली जहागीर ते जप्त करतील व मग मला अन्नाला मोताद व्हावं लागेल!

**सावित्री**:-मुलीच्या कल्याणापेक्षां जहागिरीची आपणाला जास्त किंमत वाटते नाहीं कां?

**मानाजी**:-मी जहागीदार म्हणून तर तुझ्या वडिलांनीं तुला इथं दिली. मी शिकारी किंवा भिकारी असतों तर तुझं लग्न त्यांनीं मजबरोबर खचित ठरवलं नसतं.

**सावित्री**:-मी तें नाहीं विचारीत, तो काळ निराळा होता, हा काळ निराळा आहे. "माझ्या मुलीच्या लग्नाबद्दल मी सर्व घरांत सोपवलं आहे" असं आपण पाहिजे तर खानांना कळवा. मुलीच्या लग्नाचं काय करायचं तें मी पाहून घेईन.

# दर्द-रोग क्षणांत पळून जातात.




नव्या चालू जमान्यांत विजेच्या मदतीनें दर्द-रोग बरे करण्याच्या पद्धतीचा खालील रोगावर यशस्वी रीतीनें उपयोग करण्यांत आला आहे:—

रक्त सुकत जाणें, श्वास, खोकला, कफ, सरदी, बद्धकोष्ट, रक्त न फिरल्यामुळें होणारे रोग, डोळे दुखणें, बहीरेपणा, गळ्याचे रोग, अजीर्ण चक्कर येणें, स्त्रियांचे सर्व रोग, पाय सरणें, डोकें दुखणें, फेफरें, हृदयाविकार, हिस्टेरिया नपूंसकत्व, अपचन, नजलो-वातरोग नेत्ररोग, रक्ताचे पाणी होणें, कोड, भूक न लागणें, पाय लुला पडणें, पाय जाडा होणें, चरबी वाढणें, रोड होणें, लकवा, गांठीचे रोग ,मूत्राशयाचे रोग, दातांत पू होणें,, संधिवात, कम्मर दुखणें, वगैरे प्रकारचे रोग बरे होऊं शकतात.

गरज पडल्यास आम्ही होमिओपॅथी आणि बायोकेमिक औषधांचा उपयोग करितो. जेव्हां ॲलोपॉथी ( कडू ) औषधें अजिबात निष्फळ ठरतात अशा वेळीं देखील या पासून जुनें रोग बरे होऊं शकतात.

याशिवाय आम्ही Health Culture & Breath we'l हेल्थकलचर व ब्रीदवेल या पद्धतीचा असाध्य रोग कावूंत आणण्यासाठीं उपयोग करितो. साधनें-हा. **फी. करन्ट. गा. करन्ट. व्हायब्रेशन ओझोन गरमी व प्रकाश** गरिबांची फुकट शुश्रुषा करण्यात येईल खालील पत्यावर लिहा अथवा भेटा.

**धी कुसुमगर फार्मसी.** पोष्ट बॉक्स २१५९ मुंबई,
**नरनारायणाचें मंदीर, काळबादेवी रोड; २२१**

बिघडत असलेली प्रकृती सुधारून शक्ति वाढविण्याचा

सर्वोत्तम उपाय म्हणजेच

विश्वविख्यात

# आतंकनिग्रह गोळ्या

अर्ध शतक होत आलें. आपल्या अंगच्या विलक्षण गुणांनीं सर्व जगाला अलभ्य लाभ देत आहेत. खाल्लेल्या अन्नाचे उत्तम पचन करणें, रक्तामध्यें आलेला फिकटपणा घालविणें आणि सर्व तऱ्हेचे धातुविकार बरे करणें, हें या गोळ्याच्या सेवनाचें मुख्य फल आहे.

किं. ३२ गोळ्यांच्या डबीला १ रु.

विशेष माहितीकरितां कॅटलाग मागवा.

पत्ता—वैद्य शास्त्री मणिशंकर गोविंदजी,
जामनगर (काठेवाड.)

मुंबई शाखा–कालबादेवी रोड.

पुणें शाखा –शुक्रवार पेठ.

**मानाजीः**-आपण जांवई शोधून ठेवलांत वाटतं! मग सांगा ना त्याचं ठाव ठिकाण, त्याला इतके आढे वेढे कशाला? मुलगी माझी एकट्याची थोडीच आहे. माझ्या इतकीच राणीसरकारला देखील तिच्या कल्याणाची काळजी आहे. मग सांगतां कां जांवयाचं नांव?

**सावित्रीः**-आपणा जवळ नाहीं सांगायचं तर सांगायचं तरी कुणा जवळ? पण मी म्हणतें मी सांगितलं आणि आपल्याला तें नाहीं आवडलं तर!

**मानाजीः**-असं कसं होईल, तुझ्या मर्जीप्रमाणें मी चाललों नसतों तर इतकीं वर्षे संसारच झाला नसता. पतीची इच्छा म्हणजेच आज्ञा हा हिंदू स्त्रियांचा धर्म तूं चांगला पाळलास. तेव्हां मला जें आवडणार नाहीं तें तूं कधींच सांगणार नाहींस.

**सावित्रीः**-आपण म्हणतां तसंच मी करीन! पतीच्या इच्छेप्रमाणें वागणं हाच हिंदू स्त्रिया धर्म समजतात. पण पतिदेवानं भलतं कांहीं सांगितलं तर त्यावेळीं पतिराजाला विरोध करणं ही देखील हिंदू धर्माची शिकवणूक आहे. संसार नौका मार्गावर आहे किंवा नाहीं हें दाखविण्याचं काम आम्हां स्त्रियांना करायचं असतं. नौका मार्गावर नसली व ती मार्गावर आणण्याची पतिदेवाची इच्छा नसली तर त्यांच्या इच्छेविरुद्ध संसार नौकेचें सुकाणूं स्त्रियांनीं हातीं घेऊन संसार नौका पैल तीरावर सुखरूप पोंहोचविण्याचं कार्य करण्याचं शिक्षण हिंदू धर्मच देत आहे.

**मानाजीः** पतिव्रतेचा खरा धर्म कोणता याविषयीं दुमत होणंच शक्य नाहीं. मग सांगतांना आपल्या निवडीचं जांवयाचं नांव?

**सावित्रीः**-माझी ना कुठं आहे-पण-

**मानाजीः**-मग पण कां?

**सावित्रीः**-मी सांगितलं नि तें आपणांला नाहीं पटलं तर!

**मानाजीः** हे आढे वेढे आतां आटपायचे. सांगा पाहूं?

**सावित्रीः**-परवांच्या प्रसंगाची आठवण झाली म्हणजे काळीज कसं चर्रर होतं, माझ्या तारेला ज्यानं जिवदान दिलं त्या-

**मानाजीः**-अस्सं-अस्सं-काय? तरी म्हटलं जांवई शोधायला तुम्हांला कसा वेळ मिळाला. बायका त्या बायकाच! बायकांना जर पुरुषासारखं व्यवहार चातुर्य असतं तर त्या बायका राहिल्याच नसत्या. एखाद्या शिपायानं आपल्यावर कोणी

दरोडा घातला व त्या दरोडेखोराची खोडकी जिरविली, तर त्या शिपायाला पांच पंचवीस रुपये बक्षीस द्यायचं. फार झालं तर एकादा मंदील त्याला बांधायचा का त्याला आपली मुलगी द्यायची ? अगदीं वेडी ! बायका भावड्या नि भोळ्या म्हणतात तेंच खरं. हें पहा तर ! त्या राणोजीला तूं म्हणशील तितकं इनाम देतों, मग झालं ना ?

**सावित्रीः**–मला राणोजीरावांना माझी तारा इनाम द्यायवाची आहे. त्यांच्या शौर्याला तारेशिवाव दुसरं कोणतंही बक्षीस अपुरंच होईल

**मानाजीः**-( स्वगत ) स्त्रिया किती भावनाप्रधान असतात याचं हें उदाहरण. यावेळीं आपण कितीही समजूत घातली तरी ती पटणं कांहीं शक्य नाहीं. तेव्हां सध्यां होस हो लावून वेळ मारून न्यावी झालं. ( उघड ) हें पहा तुझ्या मुलीचं हित मलाच कळतं आणि तुला कळत नाहीं असं थोडंच आहे पण लग्नाच्या बाबतींत आम्हा सरदारांना खानांची संमति घेतली पाहिजे. त्यांच्या कानावर दोन तीन स्थळं घालतों, त्यांत हेंही घालतों. पण राणोजीराव हा त्या पुंड शिवाजीचा शिपायी ! तेव्हां खान संमति देतील किंवा नाहीं हें कसं सांगावं ?

**सावित्रीः**–शिवाजी महाराज पुंड व खान साव ? खासा न्याय ! घरचा धनी चोर आणि पाहुणा मालक ? माझ्या मुलींच्या लग्नाच्या बाबतींत आपण कांहींच करूं नका. मी माझ्या तारेला कुवारी ठेवीन, पण त्या खानाच्या हुकमानं तिचं लग्न करणार नाहीं.

**मानाजीः**–अग तो हुकूम नाहीं. त्याला शिष्टाचार म्हणतात.

**सावित्रीः**–आपणाबरोबर या बाबतींत वाद घालण्याची माझी इच्छा नाहीं. आपल्या मनाप्रमाणंच मी आज पावेतों सर्व बाबतींत वागलें. या बाबतींत आपण माझ्या इच्छेप्रमाणं वागलं पाहिजे.

**मानाजीः**–( स्वगत ) या पिसाट स्त्रीला पिसाळुं देतां उपयोगी नाहीं (उघड) तूं सांगतेंस तसंच करूं. पण त्याला इतकी उतावळ कशाला. राणोजीच्या कुलशीलाची चौकशी तर केली पाहिजे ना ?

**सावित्रीः** जिथं क्षत्रियांच्या मुली मुसलमानांना देण्यांत कुलशीलाचा विचार करावा लागत नाहीं तिथं मराठे मराठे यांच्या सोयरिकींत कुलाचा विचार कशाला?

शिवाय शीलवानाचीच कूस शीलासाठीं बलीदानाला तयार असणारी संतति प्रसवते.

**मानाजी**:–तारेच्या लग्नांच्या बाबतींत राणी सरकारचा हुकूम चालेल. आतां आपलं आणखी काय फर्मान आहे?

**सावित्री**: तुम्हाला आपली सदा थट्टाच !

**मानाजी**:–अग त्याच्या साठींच तर तुझ्याशीं लग्न केलं.

**सावित्री**:-जा ! मी नाहीं आतां आपल्याशीं बोलणार. (जाते)

**मानाजी**:–तारेच्या लग्नाविषयीं आपण आतांपासून काळजी ठेवली नाहीं तर भलतंच कांहीं होईल. पाण्याच्या अगोदर पाळ बांधलीच पाहिजे. (जातो)

---

## प्रवेश ५ वा.

[ स्थळ–सुभान्याचें घर. ]

जिवाजी–( सुभानरावाचा बाप ) पार्वती ( गणोजीची आई ) सीताचें व विठूचें प्रेत व आणखीं एक मुसलमानाचं प्रेत पडलेलें असतें (सीता–सुभानरावाची बायको, विठोबा–गणोजीचा बाप ) असा पडदा उघडतो.

**पार्वती**:–देवा ! असं कसंरे केलंस, मागच्या जन्मीं असं आम्हीं कोणतं पाप केलं होतं कीं आज तूं आमच्यावर रागावलास. ( रडते )

**जिवाजी**–पार्वती ! रडण्यानं झाली गोष्ट परत कां आतां येणार आहे. माझा गणू नि सुभान्या यावेळीं असता तर रंग कांहीं निराळाच आला असता. म्हातारपणीं बंधुशोक व सुनेचा असा भयंकर खून ! देवा ! माझ्या आंधळेपणानं मला माझ्या सुनालेकींचं संरक्षणसुद्धा करतां येऊं नये ना ! मला आंधळे करण्यात देवा ! तुमचा असा हेतू खास नव्हता. यावेळीं मी डोळस असतों तर विठूबरोबर लढत लढत मीही नसतों का कामी आलों. ( पार्वतीच्या रडण्याचा हुंदका ऐकून ) पार्वती यावेळीं त्वा जिवाचा दगड केला पाहिजे. आता रघू आल्यावर तुझ्या शिवाय त्याची समजूत कोण बरं घालील ?

**पार्वतीः**–देवाला सर्वांची काळजी आहे. तो रघूला शहाणपण देईल. सुनबाईच्या ऐवजीं त्या मेल्यानीं मला मारलं असतं, तर नसतं का बरं झालं ! पण सौभाग्याचं वाण घेऊन जाण्याचं माझं पुण्य कुठलं. हें असं नशिबीं होतं म्हणूनच मी अमर झालें ना ! देवा तू असं उलटं कसंरे केलंस. ( रडते )

**जिवाजीः**–पार्वती ! निदान यावेळीं तूं जर असा धीर सोडलास तर मग मी काय बरें करावें . या जगांत दुःखाचे प्रसंग सर्वांवरच येतात. पण हीच वेळ आपल्या परीक्षेची आहे. यावेळींच आपण हिंमत धरून आलेल्या प्रसंगाला तोंड दिलं पाहिजे.

**पार्वतीः**–मला आतां जगून तरी काय करावयाचं आहे. ( रडते )

**जिवाजीः**–अशा स्थितींत तुला जिवंत ठेवण्यांत परमेश्वराचा तसाच कांहीं तरी हेतू असला पाहिजे. तुझ्याशिवाय मला आंधळयाला, तसंच त्या 'कोवळ्या रघूला कुणाचा बरं आधार आहे !

**पार्वती**–( विठूच्या प्रेताकडे पाहून ) मला एकटं टाकून जाणं आपल्याला कसं बरं वाटलं ? ( रडते )

( रघू प्रवेश करतो. आजीला रडतांना पाहून )

**रघूः**–आजी, तूं कां बरं रडतीस ? तुझं आणि आईचं भांडण कां झालं आहे; म्हणून आई तिथं रागानं निजली आहे नि तूं इथं रडतेस ?

**पार्वतीः**–बाळा, मी तुला कोणत्या तोंडानं सांगू ( रडते )

**रघूः**–मी आईला उठवितों नि विचारतों. आजोबा ! पहा हो आजी अजून रडतेच आहे. मी रडलों तर मला बागुलबोवा दाखविते आणि आतां ही रडते ती !

**जिवाजीः**–रघू ! ते शिपायी आपल्या घरांत घुमले व त्यानीं विठूचा व तुझ्या आईचा खून केला.

**रघूः**–आईचा खून, आजोबांचा खून ! त्या शिपायांनीं केला ( भ्रमांत ) कोठें आहेत ते शिपायी ? मी जीवंत असल्यावर माझ्या आईचा खून ! आई तुझा खून झालेला मी कसा पाहूं ? कोठें आहेत ते भ्याड शिपायी ? खून करून पळून गेले ? खुनाला खून घेतलाच पाहिजे, मुलांनींच आईचं रक्षण करायच ना ? मुलाच्या देखत आईचा खून झाल्यावर मग आईनं मुलं कशाला मागावीं ? आजोबा !

सांगा! कोठें ते भ्याड पळाले (इकडे तिकडे भ्रमिष्टासारखा फिरतो) खून, खून, खुनाला खून घेतलाच पाहिजे. (आईच्या शवाजवळ पडतो)

**पार्वती**:-(उठून रघूला सावरते) रघू, रघू,

**रघू**:-खून, आईचा खून!

**जिवाजी**:-पार्वती, त्याच्या डोक्यावर पाणी घाल आधीं. (पार्वती पाणी आणावयास जाते) देवा! म्हातारपणांत असा कहर शत्रूवर देखील आणूं नको बरं! (पार्वती येऊन रघूच्या डोक्यावर पाणी घालते)

**रघू**:-आई! आई! आलों बरं मी आतां! आलों तुझ्याकडे. त्या भ्याडांचा आधीं खून करतो. आणि मग तुझ्या भेटीला येतो (पुन्हा गुंगींत)

(सुभानराव व गणोजी प्रवेश करतात.)

**गणोजी**:-आई! (पार्वती रडते)

**सुभानराव**:-बाबा हा काय प्रकार आहे!

**जिवाजी**:-हा अत्याचार दिसूं नये ह्मणूनच देवानें मला आंधळं केलं. पार्वती!

**पार्वती**: सुभान्या आज दुपारीं ते नीच या घरांत घुसले त्यांनीं सुनबाईवर हात टाकला. सुनबाई ओरडली. तुझे काका व मी धांवलें. त्या झटापटींत त्यांनीं एका शिपायाला देवाच्या घरचा मार्ग दाखविला. ते पहा त्याचं प्रेत! आम्हीं तीन व ते दोन पुरुष. एक सुनबाईला ओढूं लागला व एक त्यांच्या अंगावर धांवला. शिपायानं त्यांचा खून केला व सुनबाईला ओढून नेणं जेव्हां त्यांना शक्य दिसलं नाहीं तेव्हां तिचाही खून करून ते मेले पळाले. गणू! आतां माझं कसं रे होईल! (रडतें)

(सुभानराव व गणोजी एकमेकांच्या तोंडाकडे पाहातात.)

**रघू**:-आईचा खून! आधीं त्या भ्याडाला मारीन! मग मरेन! खुनाला खून घेतलाच पाहिजे? (भ्रमांत)

**सुभान**:-दादा! आतां विचार करण्यालासुद्धां अवसर नाहीं खुनाचा मोबदला. त्या नीचांचे खून करुनच घेतला पाहिजे. दिवसा ढवळ्या घरांत येऊन स्त्रियांची जिथ अब्रू लुटली जाते, लोकांवर जुलूम होतो, तें जुलमाचं राज्य यापुढें टिकणं शक्य नाहीं मनुष्य एकवेळ जुलूम सहन करील पण आपल्या आया बहिणींच्या अब्रुवरील घाला सहन करणं शक्य नाहीं. दादा! ह्या घरांत हीं प्रेतं

अशीच पडूंद्या. ज्यांनीं हें नीच काम केलं त्यांचा तपास लावून, त्यांच्या रक्तानं मी काकाला आणि मझ्या अर्धांगीला स्नान घालून मग त्यांचं दहन करीन. बावा आपण मला आशिर्वाद द्या. या कृत्याचा सूड घेतलाच पाहिजे !

**गणोजीः**-अशा वेळीं जर सूडाची कल्पना आमच्या मनांत जागृत झाली नाहीं तर आमच्यांत आणि नामर्द माणसांत फरक कोणता ? सुभान्या वहीनीच्या एका खुनाला त्या निचाचे मी दहा खून पाडले तरी माझी तृप्ति होणार नाहीं.

**सुभानः**-बाबा !

**जिवाजीः**-सुभान्या ! गणू, यावेळीं जें तुह्माला वाटतं त्याच्या शिवाय दुसरं कांहीं जरी तुह्मांला सांगितलं तरी तें पटणार नाहीं. तुमच्या जागीं मी देखील आज असंच केलं असतं.

**रघूः**-खून, खून, माझ्या आईचा खून, मी कसा पाहूं ? (भ्रमांत)

**गणोजीः**-काका ! आम्हांला परवानगी द्या !

**सुभानः**-बाबा तुह्माला आणि काकीला अशा स्थितींत ठेवून जाणं माझ्या जिवावर येतं. पण माझ्या मायबहीणींची अब्रू लुटण्याची नुसती कल्पना देखील यापुढं त्या नीचांच्या मनांत येऊं नये म्हणून त्या नीचांना कायमची जरब बसेल अशा तऱ्हेनं मला सूड घ्यावयाचा आहे परस्त्रीकडे पापी नजरेनं पाहिलं कीं त्याला प्राणांताचं प्रायश्चित आहे, हें मला त्या नीचानां पटवून द्यायचं आहे. बाबा यावेळीं मोहाला बळी पडून जर मी कर्तव्य पराङ्मुख झालों तर माझी बेचाळीस कुळं—

**जिवाजीः**-सुभान्या ! सूडाच्या कल्पनेनं किंवा प्रत्यक्ष सूड घेतल्यानं क्षुब्ध झालेलं तुझं चित्त कदाचित शांत होईल व जरबेनं भित्रे लोक कदाचित परस्त्रीवर नजर टाकणार नाहींत. पण ज्यांच्या अंगांत ताकद आहे, ज्यांच्या जवळ सत्ता आणि सैन्य आहे त्यांच्यावर तुला एकट्याला जरब बसविता येणं शक्य नाहीं. ज्यानं सुनबाईचा व विठूचा खून केला, त्याला एकट्याला मारण्यानं असले अत्याचार कायमचे कसे बंद होणार ?

**गणोजीः**-मग आम्ही काय करावं असं तुमचं म्हणणं आहे ?

**जिवाजीः** आपण जों पावेतों परतंत्र आहोंत तों पावेतों सत्ताधिकाऱ्याच्या जातवाल्यांचा जुलूम प्रसंगोपात्त आपल्या पैकीं कोणाला ना कोणाला

तरी सहन करावा लागणारच. या जुलमाचा कायमचा प्रतिकार करावा म्हणून शाहाजीराजांच्या पदरीं मीं २२ वर्षे काढलीं. पण दुर्दैवानं त्यांना यश मिळालं नाहीं. राजांचे चिरंजीव आबासाहेब यानीं स्वतंत्र होण्याचा प्रयत्न चालविला आहे. तेव्हां व्यक्तिगत सूडाच्या भावनेला प्राधान्य न देतां तुम्ही तरुणानीं यावेळीं शिवकार्याला मदत केली तरच या कृत्याचा खरा सूड तुम्हाला घेतां येईल.

**सुभानः**--बाबा ! शिवाजी महाराज यावेळीं पन्हाळगडांत अडकले आहेत, गडाला त्या नीचांनीं गराडा दिला आहे. चोरवाटानींसुद्धां गडावर जाणं यावेळीं कठीण झालं आहे !

**जिवाजीः**--मग आबासाहेबांच्या उपयोगी पडण्याला हीच वेळ तर अतिशय उत्तम आहे. गणू, सुभान्या इकडे या. मला तुमच्या कानांत सांगु द्या ( दोघेजण येतात. दोघांच्या कानांत जिवाजी सांगतो ) हा मार्ग कठीण आहे पण आबासाहेबाच्या प्राणांसाठीं तुम्हीं हें काम आत्ताच्या आता करा. या मार्गानें तुम्ही गडावर जाल. कसंही करून आबासाहेबांना गडाच्या बाहेर काढलं कीं तुमच्या सूडाच्या कार्याला यश आलं असंच समजा !

**सुभानः**--बाबा ! या स्थितींत देखील आबासाहेबांविषयीं आपल्या मनांत इतकं प्रेम पाहून व आपली कर्तव्यनिष्ठा पाहून मला आपला हेवा वाटतो. अशीच कर्तव्यनिष्ठेची जाणीव माझ्या ठिकाणीं अखंड राहावी अशी माझी इच्छा आहे. वडिलांच्या आशीवादांनं आम्हीं दोघे खात्रीनं आबासाहेबांना गडावरून घेऊन येऊं.

**जिवाजीः**--व्यक्तीच्या मानापमानाच्या जाळ्यांत अडकून न राहतां मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं झगडत राहाण्यांत खरा पुरुषार्थ आहे. व या कार्यांत जे झगडत आहेत त्यांना साहाय करण्यानंच जुलमाच्या प्रतिकाराच्या कार्याला पाठबळ मिळतं. बाळांनो आतां एक क्षणभर देखील व्यर्थ गमावूं नका. ती भवानी माता तुमचं रक्षण करील.

**सुभानः**--काकी ! येतों मी.

**गणोजीः**--आई ! येतों मी.

**रघूः**--(भ्रमांत) खून, ज्यानं आईचा खून केला त्याचा मी खून करणार.


**सुभानः**–( भ्रमांत असलेल्या रघूच्या तोंडावर हात फिरवून ) बाळा ! तुझ्या आईच्या खुनाचा सूड घेण्यासाठींच नाहीं पण महाराष्ट्रांतील कोणाही स्त्रीकडे कुणीही वाकड्या नजरेनं पाहूं नये ह्मणूनच मी जात आहे. परमेश्वरा ! मी परत येई पावेतों, माझ्या पित्याचं, माझ्या काकीचं, आणि माझ्या आवडत्या बाळाचं रक्षण तूं कर !

**जिवाजीः**–आह्मा वृद्धांची काळजी करण्याचं मुळींच कारण नाहीं. बाळानों विजयी होऊन लवकर परत या.

( पार्वतीला व जिवाजीला नमस्कार करून सुभानराव गणोजी जातात )

**रघूः**–खुन, माझ्या आईचा खुन ! ( पडदा पडतो. )

## अंक पहिला समाप्त.



# अंक २ रा.

## प्रवेश १ ला

[ स्थळ–देवीचें देऊळ. ]

**जनता:**–भवानी माते यावेळीं तुझ्याशिवाय आमचा कोण वाली आहे. शिवाजी महाराजांवर आलेल्या संकटांतून त्यांची सुटका तुझ्याशिवाय कोण करूं शकेल! माते!

### पद.

[ चाल—आनंद कंद ऐसा ]

अडके गडांत प्यारा ॥
शिवराय वीर तारा ॥
स्वातंत्र्य वीर तारा ॥ ध्रु० ॥
सन्मार्ग दावणारा ॥
समतेत वागणारा ॥
कर्तव्य जाणणारा ॥ १ ॥
मोहा न भूलणारा ॥
स्त्रीलाज राखणारा ॥
गोमाय पाळणारा ॥ २ ॥
सुजनांस तारणारा ॥
पतितांस पाळणारा ॥
वीरांत शोभणारा ॥ ३ ॥
दुष्टांस मारणारा ॥
शास्त्यास शासणारा ॥
साम्राज्य स्थापणारा ॥ ४ ॥
देवास भावणारा ॥
संतांस वंदणारा ॥
धर्मास रक्षणारा ॥ ५ ॥

जय भवानानी माते की जय ! ( जातात. )

## प्रवेश २ रा.

[ स्थळ:—मानाजीरावाचा दिवाणखाना, मानाजी ]

**मानाजी**—या रानवट मावळ्यांच्या तसंच त्या शिवाजीच्या हालचालीकडे विजापुरकरांनीं दुर्लक्ष केल्यामुळं या आडदांड तरुणांना चांगलाच वाव मिळाला. या प्रांतात जिकडे तिकडे लुटालूट करून, त्यांनीं धुमाकूळ उडवून दिला. वाटेल त्या बाता ठोकून आम्हां राजभक्ताविरुद्ध तसेंच आदिलशाही आणि मोंगलशाही विरुद्ध त्यांनीं प्रजेच्या अंत:करणांत असंतोष पसारविला. कपटनीतीच्या क्लुप्तीनें त्या शहाजीच्या दिवट्या मुलानं खानासारख्या रणशूराचा खून केल्यापासून मात्र आतां जो तो त्या धनाशीं निमकहराम होणाऱ्या शिवाजीचे पोवाडे गाऊं लागला आहे. शिवाजी हा कोणी तरी आहे असं आतां वाटायला लागलं व यामुळं सध्यां त्या शिवाजीला आणि त्याच्या रानवट रांगड्या मावळ्यांना स्वर्ग दोन बोटं उरल्यानं आम्हां राजभक्तांवर आतां फारच मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. शिवाजी! याद राख. गांठ इतर कोणाशीं नसून या मानाजीरावाशीं आहे. हा मानाजी असा तसा नाहीं, माझा पहिला फांसा मी तुजवर टाकून तुला गडावर अडकविला आहे. आतां तुझे बारा वाजवून आम्हां राजभक्तांचा बाज पुन्हां बसविण्याला कितीसा वेळ! ( संपतराव प्रवेश करतात ) या, संपतराव, या, मी यावेळीं तुमचीच वाट पाहात होतों. मग आपण काय ठरवलं. आमच्या तारेसाठीं आपण—

**संपतराव:**—मानाजीराव, हा बोलण्याचा विषय नाहीं. कृतीनं करण्याची ही गोष्ट आहे. त्या पुंड शिवाजीला धरून आपल्या समोर उभा करीन, मगच आपल्या कन्येला मागणी घालीन.

**मानाजी:** यंव रे जांवई! जांवई असावा तो असाच रड्या नि नेभळट जांवई काय कामाचा?

**संपतराव:**—आपल्या कन्येच्या लालचीनं नव्हे पण शिवाजी बरोबरच्या गांवगुंडानं केलेल्या अपमानाचा सूड मला घेतलाच पाहिजे.

**मानाजी:**—असा त्यांनीं आपला काय अपमान केला?

**संपतराव:**—अपमान! नुसता अपमानच नाहीं पण त्यांनीं आमचा भयंकर गुन्हा केला आहे. नाहीं, नाहीं तसले, अपशब्द त्यांनीं उच्चारून आम्हां राजभक्तांची नालस्ती केली. धर्माचा आणि देशाचा उद्धार करायला निघालेल्या या दिवट्यांना

यावेळीं आपण हात दाखविला नाहीं तर दिवसा ढवळ्या हे लोक आपलीं घरं जाळतील. धर्माच्या व देशाच्या नांवाखालीं यांनीं बंड उभारलं आहे. या कृत्याचा सूड आम्ही राजभक्तांनं घेतला नाहीं तर कुणी घ्यायचा ? आपल्या युक्तीनं सध्या त्या रानातल्या पुंडाला पन्हाळगडावर अडकाविलं आहेच. आतां पाहूं काय गमजा करतात ते ?

**मानाजी:**–या शिवाजीला इतकं भिण्याचं कांहींच कारण नाहीं. चिलटा सारखा याला केव्हांच चिरडून टाकूं. बरं त्या जहागिरीच काय झालं ?

**संपतराव:**–मानाजीराव ! त्या विषयीं काळजी करण्याचं मुळींच कारण नाहीं. आपल्या कन्येच्या विवाह प्रसंगीं आदिलशाहीच्या दरबारांतून आपणाला आणखी चार गांव जहागीर मिळतील. व ती दरबारची देणगी ह्मणून !

**मानाजी:**–मीं सांगितलं तर आपणाला राग तर नाहींना येणार ?

**संपतराव:**–आपल्या सारख्यावर रागावण्याची कोणा तरुणांत ताकद आहे ? आपल्या तारेच्या प्रभावानं, आपल्या महालांत पाय ठेवतांच रागा ऐवजी प्रेमाच्या कल्पना लहरी तरुणांच्या अंतःकरणांत उद्भवतात. मानाजीराव ! बोला ! अगदीं स्पष्ट बोला.

**मानाजी:** मोठं जिवावर येतंय ! पण आज नाहीं उद्यां सांगितलंच पाहिजे. तेव्हां आतांच सांगणं बरं ! संपतराव ! माझी तारा आपल्या घरीं सुखांत पडेल याची मला पूर्ण खातरी आहे–पण–

**संपतराव:**–मग आतां घोडं पेंड कुठं खातंय ? चार गांवच्या जहागिरीनं अडलेलं घोडं पुढं सरकत नसेल तर हिरे मोत्याची पिंडाळीं त्याच्या गळ्यांत घालूं ?

**मानाजी:**–संपतराव तसं मुळींच नाहीं. फाजलखानाचा निरोप आला आहे कीं आह्मी आपली कन्या खानसाहेब ह्मणतील त्याला दिली पाहिजे.

**संपतराव:**–फाजलखानाला या प्रकरणांत पडण्याचं कारण ? आपल्या मुलीचं वाटेल त्याच्या बरोबर लग्न लावण्याचा मुलीच्या बापाला पूर्ण अधिकार आहे. मला तारा देण्याचं आपण कबूल केलेलंच आहे. मग खानाचा त्यांत काय संबंध ? खानाना स्पष्ट कळवा.

**मानाजीः**—खानांना मी कसं कळवूं ? खान म्हणजे आदिलशाहीचा आज आधारस्तंभ. खान करील ती पूर्व. खानांच्या मर्जीविरुद्ध माझी तारा मी तुम्हाला दिली तर आदीलशाहीच्या हद्दींत देखील मला राहतां येणार नाहीं. संपतराव ! प्रसंग फार कठीण आहे.

**संपतरावः**—खान झाले म्हणून काय झालं. दरबारांत ते आमचे वरिष्ठ. त्यांचं लग्नांत काय काम ? उद्यां माझ्या बहिणीला एखाद्या महमदखानाला द्या म्हणतील, पण मी तें साफ ऐकणार नाहीं

**मानाजीः** न ऐकून कसं चालेल ? आज खानाचा शब्द मोडला, तर जहागिरी जप्त होतील. माझ्या जहागिरी मी जप्त कशा होऊं देऊं ?

**संपतरावः**—आमच्या दुर्बलतेमुळें आदिलशाहीच्या छत्राखालीं राहणं जरी आम्हाला इष्ट असलं व राजभक्त म्हणून शिवाजीसारख्या पुंडाचा पाडाव करण्याचा जरी आम्ही प्रयत्न करतों तरी आमच्या धर्माचा आम्हाला पूर्ण अभिमान आहे. जहागिरीच्या लालचीनं मुसलमानांना कन्या देणाऱ्या पित्याला मी कवडीची किंमत देत नाहीं. मानाजीराव ! माफ करा. एक हिंदू म्हणून तुम्हांला सांगतों कीं खान सांगतील त्याला मी तुम्हाला तुमची कन्या देऊं देणार नाहीं. अबला स्त्रीचं रक्षण करणं हा हिंदूचा धर्म आहे. जहागिरीच्या लालचीनं पोटची पोर हिंदूला किंवा मुसलमानाला विकणाच्या कसाबाच्या हातून तारेचं रक्षण मी करीन ! आणि मानाजीराव ! आपल्या कन्येचं ज्या शूर राणोजीनं मुसलमानांच्या अत्याचारा पासून रक्षण केलं त्या राणोजीबरोबर आपल्या कन्येचा मी विवाह लावून देईन. आपली तारा मला प्रिय असली तरी तिच्यांशीं यापुढें माझं भगिनीचं नातं राहील !

**मानाजीः**—शिवाजीच्या जुलमाहून हा जुलूम जास्त आहे.

**संपतरावः**—तें कांहींही म्हणा. तारा राणाजीलाच दिली पाहिजे.

**मानाजीः** खान सांगतील त्यालाच मी तारा देणार !

**संपतरावः**—घोडा मैदान जवळ आहे.

**मानाजीः**—या काळ सर्पाला मोकळा ठेवला तर सर्व फिसकटून जाईल (शिळ फुंकतो ४—५ शिपायी येतात. संपतरावास धरतात व घेऊन जाऊं लागतात ) संपतराव ! हिंदू धर्माचा अभिमान पाहूं किती आहे तो व धर्म तुमचं कसं रक्षण करील तेंही पाहूं ?

**संपतराव:**-कोणत्याही परिस्थितींत मनाचा समतोलपणा हिंदूधर्मच कायम राखूं शकतो; व धर्मच माझं कसं रक्षण करील तेंही दिसेलच !

**मानाजी:**-हॅः ! हॅः ! ! हॅ ! ( सर्व जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

### स्थळः-पन्हाळगडावरील जंगलाचा भाग

( तानाजी व बाजीप्रभू )

**तानाजी:**-बाजी ! आजच्या महाराजांच्या राजनीतीची प्रशंसा करावी तेवढी थोडीच.

**बाजी:**-शिद्दी जोहारासारख्याला महाराजांनीं हां हां ह्मणतां फसविण्याचा घाट घातला.

**तानाजी:**-राजकारणांत सरळपणानं वागून यावेळीं तरी निभाव लागणं शक्य दिसत नव्हतं ह्मणूनच महाराजांनीं या कपट नीतीचा अवलंब केला.

**बाजी:**-तानाजी ! तुम्हीं काय किंवा मी काय. महाराजांच्या तैनातींत आपण ज्या उद्देशानं राहिलों. तो एवढाच कीं या भरत भूमीची उज्वल परंपरा कायम राहून तिला स्वातंत्र्य पुन्हां प्राप्त व्हावं. भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठीं आपण करणार नाहीं अशी एकही गोष्ट नाहीं. बरं पण जिथून आपल्याला आज निघून जायचं तें स्थळ अजून किती दूर आहे ?

**तानाजी:**-त्या पलिकडच्या टेकडीजवळ लहानसा खोरा आहे. त्या खोऱ्यांतुन आपणाला आतां बाहेर पडतां येणें शक्य आहे कारण या तहाच्या वाटाघाटीनं शत्रूचा बंदोबस्त थोडा ढिला झाला आहे.

**बाजी:**-तशीच वेळ आल्यास तिथं लढाई देऊन भवानी मातेच्या जयजयकारांत बाहेर पडूं !

**तानाजी:**-तें मग महाराजांना विचारून ठरवूं. स्वातंत्र्यासाठीं नाइलाज ह्मणून प्रसंग आला तरच महाराजांची लढाई करण्याची प्रवृत्ति आहे. लढाई करण्याचं ते शक्यतोंवर टाळीत असतात.

**बाजी**:-निदान हिंदू संस्कृतीला तरी रक्तपाताचं ध्येय प्रिय नाहीं. रक्तपात केव्हांही वाईटच. पण आपद्धर्म म्हणून फक्त प्रसंग विशेषीच त्याची महति असते !

**तानाजी**:-स्वातंत्र्यासाठीं लढण्याची जरुरीच असल्यामुळें, देवी स्वतंत्रतेच्या उपासनेंत रक्तपाताला आतां पावेतों प्राधान्य मिळालं तरी तो शक्य तितका कमी करण्याकडं महाराजांची प्रवृत्ति हाच हिंदू संस्कृतीचा विशेष आहे. असो आतां आपण आपला मार्ग पाहून उद्यांच्या कार्याला लागूं. ( दोघेही जातात. )

( सुभानराव व गणोजी भुयारांतून बाहेर पडतात. )

**सुभान**:-दादा, बाबांनीं या भुयाराची आपल्याला माहिती दिली नसती तर गडावर येणं या घटकेला शक्य तरी होतं काय ?

**गणोजी**:-वेळ यावा लागतो. वेळ आला म्हणजे सर्व अडचणी आपोआप नाहींशा होतात हें अगदीं खरं.

**सुभान**:-आतां आपलं अर्धं काम तर झालं. पण महाराज आपल्यावर विश्वास ठेऊन या मार्गानं बाहेर पडतील का ?

**गणोजी**:-तें कसं सांगतां येईल ! आपलं काम, आपण काय करूं शकूं तें सांगण्याचं आहे आपली सेवा त्यांनीं स्वीकारावी कीं नाहीं हा महाराजांच्या मर्जीचा प्रश्न आहे.

**सुभान**:-पण दादा. यावेळीं ते पलिकडच्या झाडाच्या बाजूला दोन मुसलमान कसे ?

**गणोजी**:-याच गुप्त मार्गानं तर ते नाहींना आत आले ?

**सुभान**:-कुठून का येईनात, आधीं त्यांना आपण पकडलं पाहिजे. हीच आपल्या परिक्षेची वेळ आहे. या मुसलमानांना पकडून आपण महाराजांच्या समोर उभे केल्यावर महाराजांचा आपल्यावर भरंवसा बसण्याचा संभव आहे.

**गणोजी**: पण दादा, ते देखील इकडेच येत आहेत.

( तानाजी व बाजी मुसलमानी वेषांत प्रवेश करतात )

**सुभान**:-खबरदार ! एक पाऊल पुढें टाकाल तर जिवाला मुकाल. ( त्यांच्या जवळ जाऊन ) यावेळीं या गडावर तुम्ही कसें ? बोला खरं काय तें सांगा, इंथ येण्यांत तुमचा उद्देश चांगला दिसत नाहीं. बोला लौकर बोला.

**गणोजीः**–गडावर येण्याचं धाडस तुम्हीं केलं हें बरं केलं नाहीं. बोला तुम्ही कोण ? इथें कां आलांत !

**तानाजीः**–तुमच्यासारख्या रानवटांच्या प्रश्नाला उत्तर देण्याचें कारण नाहीं. तुम्हीच इथें कां आलांत तें सांगा ? नाहीं तर आम्हीच तुमचा जीव चुटकीसरसा घेऊन टाकूं ?

**बाजीप्रभूः**–आम्ही कोण कशासाठीं इथें आलों हें विचारण्याचा अधिकार कुणालाच पोंचत नाहीं. आम्ही सत्ताधिकारी वर्गाच्या जातीचे लोक. या प्रांतांत आज आमचीच सत्ता आहे. आम्ही वाटेल तेव्हां वाटेल तिथं जाऊं. आम्हाला विचारणार तुम्ही कोण ? बऱ्या बोलानं तुम्ही कोण आहांत हें सांगा, नाहीं तर इथें तुमचेंच तुकडे पडतील.

**गणोजीः** तुकडे आमचे पडतील कीं तुमचे पडतील हा पुढचा प्रश्न आहे. तुमच्या बऱ्यासाठींच मी पुन्हां सांगतों आमच्या प्रश्नाचं उत्तर द्या.

**सुभानः**–यांतच तुमचं कल्याण आहे.

**तानाजीः**–पण तुह्मी कोण ? हें कां सांगत नाहीं.

**सुभानः**–आमच्या घरांत आह्मीं कोण ? हें तुह्मीं विचारणार ? खासा न्याय !

**गणोजीः**–लढाईच शिंग फुंकून ज्यांनीं मराठ्यांच्या वृत्ति हालवून सोडल्या त्या शिवाजी महाराजांचे आह्मी सेवक. आतां सांगा पाहूं तुह्मी कोण ते ! ( तानाजी व बाजीप्रभु कांहींच बोलत नाहींत )

**सुभानः**-हरामखोरांनो ! घरांत कुणी पुरुष नसतात हें पाहून हिंदू स्त्रियांच्या अब्रूवर तुम्ही भ्याडासारखे गदा आणतां त्या तुम्हांला तुमच्या कर्मांचं प्रायश्चित देण्याला परमेश्वरानं मला चांगली संधी दिली.

**तानाजीः**–उगीच वटवट कशाला ! तुह्मां दोघांत कांहीं पाणी असेल तर दाखवाना ? नाहींतर !

( गणोजी तानाजीच्या अंगावर धावतो व सुभानराव बाजीप्रभूच्या अंगावर धावतो. झटपट होते. सुभानरावाला व गणोजीला बाजी व तानाजी आपल्या पगडीनें बांधतात )

**तानाजीः**-हरामखोरांनों ऐका. 'आम्ही फाजलखानाचे सरदार आहोंत' आतां या वेळीं तुम्हाला जिवंत ठेवणं किंवा यमपुरीला पाठवीणं हा आमच्या मर्जीचा

प्रश्न आहे. तुम्हाला जगावं असं वाटत असेल तर तुह्मीं मुसलमान झालं पाहिजे. महंमदी धर्माची दिक्षा घेतल्यानंतर दरबारांत मी तुह्मांला नोकरी देईन इतकंच नाहीं तर मी तुह्माला जहागिरी देखील देववीन. शिवाजीला पकडून दिलंत तर तुमचं जन्माचं कोट कल्याण होइल अशी मी तजवीज करीन.

**सुभानः**–नोकरीच्या लालचीनं किंवा जहागिरीच्या आमिषानं इतकंच नव्हे पण प्राणावर गदा आली तरी एकही मराठा महंमदी धर्माची दिक्षा घेणार नाहीं. तसाच आमचा जन्म दारिद्र्यांत आणि हालअपेष्टांत गेला तरी देखील शिवरायाला पकडून देणारा एकही इसम निदान महाराष्ट्रांत तरी खास तुह्मांला मिळणार नाहीं.

**बाजीः**–या बाता ऐकण्याला आम्हाला वेळ नाहीं. शिवाजीला पकडून देण्याचं कबूल करीत असाल तर ठीक. नाहींतर इथल्याइथंच तुमचीं डोकीं धडापासून वेगळीं होतील.

**गणोजीः**–स्वतःचा जीव वाचवावा ह्मणून महाराष्ट्राचा कलिजा तुमच्या स्वाधीन करण्यारा अधम सध्यां आमच्या देशांत नाहीं याचा आम्हांला अभिमान आहे. खुशाल ऊडवा आमचीं डोकीं.

**सुभानः**–तुम्ही मुसलमान आम्ही मराठे. या वेळीं आम्हीं तुमच्या हातांत सांपडलों. तेव्हां आम्हाला देहांत प्रायश्चित देण्यांतच तुमचं कल्याण आहे. आम्हीं जिवंत राहिलों, यदाकदाचित तुमच्या हातून निसटलों तर तुम्हाला भारी पडूं ?

**तानाजीः**–तुम्हीं कुणाचे कोण हें आतां तरी सांगाल कां ?

**सुभानः**–आम्ही कोणीही असलों तरी तुम्हाला त्याचं काय ? यावेळीं भीक मागणाऱ्यानं मी जहागीरदाराचा नातू हें सांगणं जसं हास्यास्पद तसंच मी अमक्याचा अमका हें आम्हीं सांगणं लज्जास्पद.

**बाजीः**–शिवाजीच्या पदरीं असे जिवावर उदार झालेले तरुण आहेत या बद्दल आम्ही मुसलमान असलों तरी आम्हाला आनंद आहे. आमचं एवढंच म्हणणं आहे कीं, शिवाजीच्या ठिकाणीं असलेली ही भक्ति आदिलशाहीच्या चरणीं वाहून तुम्ही राजभक्त बना. शिवाजीची सेवा हा गुन्हा आहे. आदिलशाहीची सेवा करण्याला तयार व्हा म्हणजे तुम्हीं सुखांत लोळाल.

**सुभानः**–त्याचं उत्तर पूर्वीच दिलं आहे.

तांबा, पितळ, जर्मनसिल्व्हर व चांदीच्या
भांड्यांत निरनिराळे सुबक घाट पॉलीश
व टिकाऊपणा वगैरे मध्यें उत्क्रांति
घडवून आणणारे

जुने कारखानदार,

# बी. ए. तारकर

यांची

ॐ, छापा चीं भांडीं

वापरा.

आमच्या कारखान्यांत राजापूर, पुणें, नाशिक, सांगली, चिनाई, कोल्हापूर वगैरे लहान मोठ्या घाटांचीं टिकाऊ भांडीं उत्तम आवाजाचे काशाचे घडीव टाळ, झांजा, तास, देवालयांत बांधणें करितां लहान मोठ्या घंटा, समया वगैरे माल तयार होऊन आमच्या खालील दुकानीं किफायत भावानें विकत मिळेल. व ऑर्डरी प्रमाणें बनऊन देऊं.

व्यापाऱ्यांस विशेष सवलत. १ आण्याचें तिकीट पाठवून क्यॅटलाग मागवा.
शाखा-नं. (१) लालबाग परेल मुंबई नं. १२. नं. (२) गिरगांव रामचंद्र बिल्डिंग मु. नं. ४. नं. (३) बी. बी. दादर स्टेशन समोर मुं. नं. १४

**हेड ऑफिस:-५२० कासार चाळ**

टेलिफोन नं. २३८९८ मुंबई नं. २

**वि. सू.**—आमचा कोणताही माल खरेदी करण्यापूर्वी ॐ छाप ट्रेडमार्क पाहून घेणें. कारण नकली ओतीव बनावटी माल निघूं लागला आहे.

# विलंब ह्मणजे त्रास, व दुःख.

आपणांस यापुढें मूळव्याधीचें दुःख नेहमीं सोसण्याची जरूरी नाहीं. आपण




# हाडेन्सा

## ( मूळव्याधीवर खात्रीचें औषध )

या औषधाची एक टयूब विकत घ्या. तें सर्व प्रकारचीं मूळव्याध कायमची दूर करील.

हान्डेसा जर्मनींत बनाविलें गेलें असून जगातील मोठमोठीं हॉस्पिटलें, सैनिक व आरामखातें यांतून याचाच उपयोग केला जातो. हजारों डॉक्टरांनीं याची शिफारस केली आहे. कारण याच्या साह्यानें त्यांनीं लाखों मूळव्याधग्रस्तांना रोगमुक्त केलें आहे.

वापरण्याची रीत सोबत असते. ब्बल टयूब किंमत रु. १॥ टपाल खर्च निराळा.

सोल एजंटः—

**ए. एम. ठक्कर,** दवावाला फीदाबील्डींग,

६ प्रिन्सेसस्ट्रीट मुंबई नं. २

**एजंट नसलेल्या गांवीं भरपूर कमिशनरवर एजंट पाहिजेत.**

**तानाजीः**–नीट विचार करा!

**गणोजीः**–मातृभूमीसाठीं प्राणार्पण करणं हा आमचा धर्म आहे.

(राघोवल्लाळ मुसलमानी वेषांत प्रवेश करतो)

**राघोः** (आश्चर्यानें) तुम्ही गडाखालच्या जिवाजीच्या घरचेना?

**सुभानः**–आम्ही कुठलेही असोत, तुम्हाला काय?

**राघोः**–जिवाजीची तबियत ठीक आहे ना? त्याचा भाऊ सध्या काय करतो? पार्वतीबाई आज गडावर बरेच दिवस आली नाहीं?

**गणोजीः**–आपण कोण?

**राघोः**–तुला त्याचं काय करायचं आहे?

**सुभानः**–आदिलशाहीची सेवा पवित्र मानणाऱ्या सत्ताधिकारी गुलामाच्या प्रश्नाला आम्ही उत्तर देत नसतों.

**राघोः**–या गडावर आदिलशाहीचे कोणीच सरदार नाहींत.

**सुभानः**–प्रत्यक्ष दोघे हरामखोर समोर असतांना नाहीं कसं म्हणतां? आणि तुम्ही तरी मुसलमानाचे मिंधे नाहीं असं आम्ही कसं मानावं?

**राघोः**–(स्वगत) हा परधर्मीयांच्या पोषाखाचा प्रभाव! (उघड) आम्हीं मुसलमानाकडचे नाहीं अशी खात्री पटल्यावर तरी तुम्ही तुमची खरी हकीकत सांगाल ना?

**सुभानः**-मग सांगण्याला मुळींच हरकत नाहीं. पण ती आम्ही शिवाजी महाराजांसमक्ष सांगूं. कारण आमच्या माहितीचा त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणीही उपयोग करणं शक्य नाहीं.

**राघोः**–मी तुम्हाला महाराजाकडेस नेतो. मग तर झालं ना? माझ्यावर तुमचा विश्वास बसावा म्हणून तुम्हाला आताच सांगतों कीं हे दोघे आदिलशाहीचे सरदार नसून, आबासाहेबांचें डावे उजवे हात बाजीप्रभू आणि तानाजी आहेत.

**गणोजी व सुभानः**-ऑं. तानाजी, बाजीप्रभू? (पडदा पडतो.)

---

## प्रवेश ४ था

( स्थळ:–मानाजीरावाच्या घराजवळील रस्ता, खुशालराव )

**खुशालराव**:–त्या दिवशीच्या प्रकारापासून, माझ्या अंतःकरणाला सारखी हुरहुर लागली आहे कधीं त्या राणोजीची भेट घेईन असं मला झालं आहे. तारेबरोबर माझं लग्न व्हावं या इच्छेनं तारेच्या बापाला–त्या मानाजीरावाला–मी झुलवीत आहे. मानाजीराव म्हणजे आदिलशाहीचा एक राजभक्त सेवक. फाजलखानाच्या हुकमापुढं त्याला धर्माचीसुद्धां परवा नाहीं इतकी त्याची राजभक्ति शंभर नंबरी आहे. राणोजीनं जर शिवाजीचा पक्ष सोडला व तो आम्हा राजभक्त सरदारांना मिळाला, तर मानाजीरावाची मी मनधरणी करुन तारेचा राणोजीबरोबर विवाह लावून देईन. राणोजी शिपायी गडी असला व आह्मासारखा सरदार नसला तरी तो शूर आहे. व असा शूर आह्मांला मिळाल्याशिवाय आतां आम्हां राजभक्तांची अब्रू टिकणं शक्य नाहीं. तारेच्या विवाहाच्या क्लुप्तीनं शिवाजीच्या गोटांतून राणोजीला सहज फोडतां येईल. या बाबतींत मानाजीरावांच्या पत्नीची गांठ घेऊनच मला पुढची तजवीज केली पाहिजे. ( जातो. )

( स्थळ:–मानाजीरावाचें घर. सावित्री )

**सावित्री**:–देवा! हा काय प्रसंग आणलास? मुलीच्या लग्नाचा हा खेळ खंडोबा कधा बंद होणार? ज्यांच्याजवळ बोलावं असं जवळ कुणीच नाहीं. परवां संपतरावांचं नि त्यांचं बोलतां बोलतां भांडण होऊन त्यांनीं संपतरावांची कुठं रवानगी केली तें सुद्धां कळत नाहीं. संपतरावांनीं धर्मासाठीं मनाचा केवढा मोठेपणा दाखविला. संपतरावांची मला भेट घेतां येईल काय? ( रामा प्रवेश करतो )

**रामा**:- खुशालराव आपल्या भेटीसाठीं आले आहेत.

**सावित्री**: दे त्यांना आंत पाठवून. ( रामा जातो ) खुशालरावांचा मला भेटण्यांत काय बरं उद्देश असेल! कांहीं कां असेना! ( खुशालराव प्रवेश करतो. ) खुशालराव या, इतक्यांतच बाहेर जाणं झालंय? आपलं काय काम आहे?

**खुशालराव**:-माझं? माझं एक अत्यंत महत्वाचं काम आहे. आपण मला त्यांत मदत कराल का?

**सावित्री:**-शक्य असेल तर ?

**खुशालराव:**-आपल्या कन्येचं माझ्याबरोबर लग्न व्हावं म्हणून मानाजी-रावांबरोबर माझं बोलणं चाललं आहे. या बोलण्यांत माझा हेतू निराळा आहे. आपल्या लोकांत एकाच वेळीं पुष्कळ स्त्रिया करण्याची जरी चाल असली तरी ती मला पसंत नाहीं; तेव्हां माझ्या इच्छित हेतूच्या सिद्धीसाठीं आपली मुलगी आपण राणोजीला द्याल काय ? राणोजी गरीब असला तरी, मी त्याला श्रीमंत करीन व सरदारही बनवीन कारण आम्ही राजभक्ता विरुद्ध शिवाजींनं आज पुंडाई माज-विली असल्यानं राणोजीसारखा शूर गडी आमच्या पक्षांत येण्याला त्याला तसंच आमीष असलं पाहिजे ?

**सावित्री:**-तारेचा विवाह कोणाबरोबर व्हावा हें ठरविण्याचा अधिकार त्यांचा आहे. आम्ही बायकांनीं या बाबतींत मन न घालणं बरं. तिकडे आपली विचार सरणी कितपत पटेल हें कुणी सांगावं ? आपण या बाबतींत त्यांची संमति घेतली कीं आपलं काम झालंच पाहिजे ! 'पत्नीच्या इच्छेला पुरुषांनीं मान दिलाच पाहिजे' असं थोडंच तेव्हां— .

**खुशाल:**-पण माझ्या म्हणण्याला आपली अनुमति आहे ना ?

**सावित्री:**-माझी अनुमति असली काय नि नसली काय सारखंच !

**खुशाल:**-पण त्याला आपला विरोध तर होणार नाहीं ना ?

**सावित्री:**-असला तरी त्याचा काय उपयोग ?

**खुशाल:**-म्हणजे ? हें पहा ! आपल्या इच्छेविरुद्ध मानाजीरावांनीं आपल्या कन्येचा एखाद्या मुसलमानाबरोबर विवाह लावला तरी देखील आपण स्वस्थ बसाल असंच ना ?

**सावित्री:**-न बसून काय करावं ! असं मजजवळ कोणतं साधन आहे कीं त्या योगानं मला स्वतःच्या पायावर उभं राहातां येईल !

**खुशाल:**-आपली संमति असल्यास बाकीची सर्व व्यवस्था मी करीन !

**सावित्री:**-( स्वगत ) ही वेळ बरी आहे. ( उघड ) मी असं ऐकलं कीं संपतरावांचा व इकडचा कडाक्याचा वाद होऊन संपतरावांना कुठं तरी कोंडून ठेव-

ण्यांत आलं. संपतरावांचंही म्हणणं असंच होतं की तारा राणोजीला द्यावी. आपण विचारतां म्हणून मी सांगतें, तारा राणोजीला द्यायला माझी कांहींच हरकत नाहीं. आपण तिकडं विचारा. पण राणोजी शिवरायाचा पक्ष सोडून आदिलशाहीचा गुलाम होत असलीं तर माझी तारा मी त्याला देणार नाहीं. आदिलशाहीच्या कोणत्याही राजभक्ताला मी माझी तारा न देण्याचं ठरविलं आहे.

**खुशाल**:–पण आदिलशाहीचा पक्ष धरण्यांत, आज जनतेचं कल्याण आहे. आदिलशाहीच्या राजशासन पद्धतीनंच आपणाला आज सुखांत राहातां येतं. राजसत्तेशीं द्रोह करण्यांत काय शहाणपणा आहे ?

**सावित्री**:–परकीय राजसत्तेचे गुलाम राहून, सुखांत झोंपण्यापेक्षां शिवरायाचे सैनिक होऊन धर्मासाठीं व स्वातंत्र्यासाठीं झगडण्यांत जास्त थोरपणा आहे–असं आपणाला वाटत नाहीं काय ? सोनेरी पिंजऱ्या पेक्षां रानावनांतील स्वतंत्रतेच्या वातावरणांत कमी सुख आहे असं आपणाला वाटतं काय ? आपणा सारख्या राजभक्त सरदारांनीं केवळ स्वतःचा बडजाव कायम रहावा याच एका भावनेनं शिवरायाचा पाडाव करण्याचा विडा उचललेला दिसतो. शिवरायाचा पाडाव करण्याच्या राक्षसी महत्वाकांक्षे ऐवजीं गोमातेच्या व हिंदूधर्माच्या रक्षणांसाठीं पुकारलेल्या स्वातंत्र्याच्या युद्धांत आपण शिवरायाला मदत केली तर–

**खुशाल**:-सावित्रीबाई ! शिवाजीला काळ वेळ मुळींच समजत नाहीं. असलीं धुंडाई करुन आदिलशाहीची एक रति इतकी देखील सत्ता कमी होणार नाहीं. जें शक्य नाहीं त्याच्यासाठीं उगीच जोखमींत कां पडां ?

**सावित्री**:–मला यांत काय कळतं. पण आपल्यासारख्या आदिलशाहीच्या राजभक्तां पेक्षां शिवरायाला काळवेळ जास्त चांगला कळतो. गोमाता आणि धर्म यांवर गदा आली असतां ज्यांना स्वतःच्या सुखासाठीं आदिलशाहीचा आश्रय इष्ट वाटतो त्याच्या हातून काय होणार आहे ? ही भानगड किंवा या गोष्टी आम्हां स्त्रियांना नकोत. आपण पुरुष आहांत. काय वाटेल तें करा ! पण शिवराय करीत आहेत तेंच बरोबर आहे असं जिजाबाई मासाहेबांना वाटतं. तुम्हां पुरुषांना तें कां पटत नाहीं तें तुमचं तुम्हालाच ठाऊक ! पण इतकं मात्र मी आपणाला स्पष्ट सांगतें कीं आदिलशाहीच्या राजभक्ताला मी आपली मुलगी देऊं देणार नाहीं !

**खुशालराव**:-मी प्रथमतः संपतरावाचा शोध करतों व मग काय करायचं तें ठरवतों इतकं मात्र सांगतों कीं आम्ही राजभक्त असलों तरी धर्मासाठीं आह्मी आमच्या सर्वस्वावर तिलांजलि देऊं.

**सावित्री**:-देवी मातेनं आपल्याला अशीच सुबुद्धी द्यावी.

**खुशाल**:-मी लवकरच आपल्या व मानाजीरावांच्या भेटीला येईन. (जातो.)

**सावित्री**:-संपतराव किंवा खुशालराव या दोघांपैकीं एकाचीही तारेबरोबर विवाह करण्याची इच्छा नाहीं व दोघांनाही तिचा राणोजीबरोबरच विवाह व्हावा असं वाटतंय हें एक सुचिन्हच म्हणायचं. परमेश्वराच्या मनांत असेल तसं होईल. (जाते.)

---

## प्रवेश ५ वा.

( विशाळगडाजवळील पांढऱ्या पाण्याजवळचा टापू )

( शिवाजी, तानाजी, बाजीप्रभू, राघोबल्लाळ, सुभानराव, गणोजी आणखी इतर सरदार व शिपायी यांसह )

**शिवाजी**:-तानाजी, आपण गडावरून निघाल्याची चाहूल शत्रूला लागली वाटतं. ती पहा त्याची फौज! या ठिकाणीं त्यानां अडविलं तरच आपणाला गडावर जातां येईल.

**तानाजी**:-आपण व बाजीप्रभू यांनीं गडावर जावं! मी इथं राहून शत्रूला अडवितों.

**बाजी**:-तानाजी! यावेळीं महाराजांपाशीं तुम्ही असणं इष्ट आहे. कारण वेळ फार आणीबाणीची आहे. महाराज गडावर पोंचण्याचे अगोदर शत्रूकडील एकाही इसमाचं या खिंडींतून पुढं पाऊल पडणार नाहीं.

**तानाजी**:-बाजीप्रभू! महाराजांजवळ माझ्यापेक्षां तुमचा जास्त उपयोग होईल. पण हा वेळ वादाचा नाहीं. आपली इच्छा इथं लढण्याची असली तर मी जातों महाराजा बरोबर.

**बाजीः**-शत्रूबरोबर पहिल्यानं दोन हात मी करीन. मी त्यांना जेरीस आणीन. मला यश नाहीं मिळालं तर तुम्हीं नि महाराज आहांतच.

**शिवाजीः**-बाजीप्रभू ! आम्हीं मोठ्या आनंदानं आज शत्रूला थोपवून धरण्याचं काम तुम्हांवर सोंपवितों. तुमच्या मदतीला थोडे लोक आहेतच. शिवाय हीं तरुण भावंडंही ठेवतों. आम्ही आमच्याबरोबरच्या लोकांसह गडावर पोंहोंचलों कीं पांच तोफा उडवूं. तों पावेतों शत्रू इकडे येऊं शकणार नाहीं अशा तऱ्हेनं त्याच्या सैन्याशीं तोंड द्यावं.

**बाजीः**-महाराजांनीं माझ्यावर विश्वासून सोंपविलेली कामगिरी मी मोठ्या आनंदानं पार पाडीन. शत्रूचं सैन्य कितीही असलं तरी त्याच्याशीं अशा पद्धतीनं तोंड देईन कीं आपण गडावर पोहोंचे पावेतों शत्रूचा या बाजूला शिरकाव होणं शक्य होणार नाहीं. महाराज या देहांत प्राण असे पावेतों शत्रू खिंडींतून या बाजूनं वर येणं शक्य होणार नाहीं याची आपण खात्री ठेवावी. शिवाय या बंधूंची मदत असल्यावर,तर मला मुळींच काळजी वाटत नाहीं.

**सुभानः**-महाराज आधीं आमचे प्राण जतील. मगच शत्रू इकडे शिरेल !

**बाजीः**-महाराज, तानाजी, आपण निघावें आतां. ( शिवाजी, तानाजी व कांहीं सैनिक जातात. )

**बाजीः**-सुभानराव ! गणोजी ! महाराजांनीं आपल्यावर सोंपविलेलं काम चोख रीतीनं बजावलं जावं ह्मणून आपण सर्वांनीं विशेष काळजी ठेवली पाहिजे. तो पहा शत्रूच्या तोफेचा आवाज. ( शिपायांना उद्देशून ) माझ्या प्रिय सैनिकांनो ! ही वेळ तुह्मां आह्मां सर्वांच्या परीक्षेची आहे. महाराज गडावर पोहोंचण्याचे पूर्वीच जर शत्रू आंत शिरला तर आतां पावेतों बांधलेला स्वातंत्र्याचा स्तंभ ढांसळून पडेल ! गुलामगिरीच्या जाचांतून मुक्त होण्याला महाराजांनीं गडावर पोहोंचलंच पाहिजे. महाराज गडावर पोहोंचले कीं मग असे छत्तीस फाजलखान आणि पन्नास सिद्धीजोहार आले तरी त्यांना आह्मी पुरुन उरूं. यावेळीं तुमच्या खऱ्या मर्दुमकीची कसोटी आहे.

**सर्वजणः**-काकासाहेब ! आमच्या कुडींत प्राण असे पावेतों शत्रूंला आम्ही इथून पुढं सरूं देणार नाहीं. ( शत्रूंचे लोक अंगावर तुटून पडतात )

( हरहर महादेव ! भवानी माता कीं जय ह्मणून पहिला हल्ला परतावितात )

**बाजी**:-शाबास ! सैनिकानों ! शाबास ! असेंच हुषारीनें लढा. महाराजांना गडावर पोहोंचण्याला अजून थोडा अवधि आहे.


( शत्रूचा दुसरा हल्ला. शत्रूंचे लोक अंगांवर तुटून पडतात. हरहर महादेव भवानी माताकी जय ह्मणून दुसरा हल्ला परतवितात )

**बाजी**:-सैनिकानों शाबास ! मर्दानों शाबास !

**फाजलखान**: मेरे भाइयों ! हिंमत से लढो ! चलो ! जोरसे चलो ! बढो ! आगे बढो ! बोलो दीन ! दीन ! ( शत्रूचा पुनः हल्ला )

**बाजी**:-सैनिकानों सांभाळा ! हीच आणीबाणीची वेळ आहे ( स्वतः हल्ला परतविण्यास जातों. बंदुकीची गोळी व तरवारीचा घांव लागून पडतो. ) देवा ! अजून तोफांचा आवाज नाहीं ना ! महाराजांनीं माझ्यावर विश्वास ठेवून मला इथं ठेवलं आणि मी माझं काम चोख नाहीं ना बजावलं ? मरणाच्या वेळींसुद्धां मला शांति नसावी ना ? स्वातंत्र्याचा खांब आतां-( ५ तोफांचा आवाज झालं. माझं काम पार पडलं ! आतां मी सुखानें मरेन-रा—आ—म. ( इतरांची लढाई चालू असतांना सुभानराव व गणोजी बाजीप्रभूला उचलून नेतात. )

## अंक दुसरा समाप्त.



# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

[ स्थळ—मानाजीरावाचें घर–तारेचा दिवाणखाना–तारा ]

**ताराः**–( विचार करीत ) मी आतां इतकी कां लहान आहें कीं माझं लग्न बाबांनीं वाटेल त्याच्याशीं ठरवावं नि मी बाबा सांगतील त्याच्या गळ्यांत माळ घालावी. वडीलधारी माणसं करतात तें आमच्या कल्याणासाठीं हें मला कंबूल; पण या वयांत–माझं मला समजायला लागलं अशा वयांत–बाबांनीं आईच्या मार्फत माझं म्हणणं नको का ऐकायला! प्रत्येक कुमारिकेला आपण सरदाराच्या घरीं पडावं असं मानण्याचा एक काल होता; पण सरदारापेक्षां शिवाजी महाराजांच्या एखाद्या शिपायाची अर्धांगी होण्यांत. आतां तरुण कुमारिकांना जास्त भूषण वाटत आहे. कारण तरुणांनीं स्त्रियांच्या पातिव्रत्यावर गदा आणणाऱ्यांना देहांत प्रायश्चित देण्याचा विडा उचलला आहे परस्त्रीकडे वाकड्या नजरेनं पाहणाऱ्यांना स्वर्ग दाखविणाऱ्या तरुण वीरांना सोडून, केवळ धनाच्या ढिगाऱ्यांत लोळत पडणाऱ्या परावलंबी सरदारांना वरण्यांत तरुणींना कसंसंच वाटणं सहाजीक नाहीं का? या लग्नाच्या भानगडींनं मी मात्र कैचींत सांपडल्यासारखी झालें. ज्यांनीं मला प्राण संकटांतून वाचविलं त्या प्रेमळ आणि उदार अंतःकरणाच्या वीरा शिवाय दुसऱ्या कोणाच्याही गळ्यांत मी माळ घालणं शक्य नाहीं ज्यांनीं माझ्यासाठीं स्वतःचा प्राण धोक्यांत घातला, त्यांना हा प्राण नाहीं अर्पण करायचा, तर मग करायचा तरी कुणाला? त्यांचा स्वभाव किती गोड, मन किती मोठं व वागणूक किती सभ्यतेची! एकांतांत उपकार बद्ध तरुणीबरोबर इतक्या उदारपणाचं वर्तन किती तरुण ठेऊं शकतील याची मला शंकाच आहे? शिवाय भीति हा तर त्यांना ठाऊकच नाहीं. अशा सुंदर व सर्वोत्तम नर वीराचा मी अव्हेर करणं शक्य तरी आहे काय? पण बाबांना मी हें कसं सांगू? आईनं सांगितलं. पण त्यांचं सर्व लक्ष त्या जहागिरीकडे असल्यानं खानाच्या मर्जीविरुद्ध

वागायचं नाहीं असं त्यांनीं ठरविलं असं आई म्हणाली. देवा! जन्मदात्या माता-पितरांचा थोडा देखील अवमान न होतां माझ्या मनांसारखं करण्याचं जर कुणांत सामर्थ्य असेल तर तें तुझ्यांत आहे! संकटाच्या वेळीं नारायणा! तुझ्या वांचून मी कुणाला बरं आळवावं! बरं, पण त्यांनीं आज यायचं कबूल केलं आहे तेव्हां बाबांना आगाऊ सांगितलेलं बरं. रामा! अरे रामा! ( गडी येतो ) रामा! बाबा काय करताहेत पाहून ये बघूं? ( गडी जातो ) पण मी बाबांना जाऊन काय सांगू? कीं माझं त्याच्या बरोबर लग्न ठरवा! पण, असं मी कसं सांगू? मी असं सांगितलं तर बाबा मला काय म्हणतील? माझ्याविषयीं त्यांना काय वाटेल? ( रामा येतो )

**रामा**:-बाबासाब हकडच येत्याती. ( जातो )

**तारा**:-आतां तर मोठाच बिकट प्रसंग आला म्हणायचा! पण असा धीर सोडून कसं चालेल! कर्तव्याला जागलंच पाहिजे. ( मानाजीराव प्रवेश करतो ) बाबा! मी आपल्याकडेसच येणार होतें पण आपणंच इकडे आलांत. मला वाटलं आपल्याशीं बोलावं. आपणाला वाटलं मजबरोबर बोलावं बाबा! आपल्याकडे पाहिलं कीं कसंसंच वाटतं, या वर्ष दोन वर्षांपासून आपलं मन पहिल्यासारखं सुप्रसन्न दिसत नाहीं. अशी कोणती काळजी आहे कीं ती आपणाला रात्रंदिवस सुखानं झोंप येऊं देत नाहीं? विचारीन, विचारीन म्हणून किती तरी दिवस ठरवलं पण—

**मानाजी**:-बाळ संसारी माणसांना हजार तऱ्हेच्या हजार चिंता वहाव्या लागतात. त्यांतून आम्हां सरदारांची गोष्ट तर विचारायलाच नको! घराच्या बाहेर पडलों व सहज कोणाच्या घरीं जरी आम्ही गेलों तरी त्या आमच्या जाण्याला राजकारणाचं स्वरुप ताबडतोब येतंच. आमचं बसणं, आमचं बोलणं, आमचं चालणं इतकंच नाहीं तर आम्ही रात्रीं लौकर निजलों, तर असं करण्यांत आमचा कांहीं तरी हेतु असला पाहिजे अशी चर्चा सुरू व्हायचीच. एकंदरींत आम्हा सरदारांचा सारा जन्म चिंतेंत जातो. मनाला स्वस्थता म्हणून कधीं मिळायचीच नाहीं. त्यांत घरांतलीं माणसं जर पुन्हां मनासारखी नसली तर मग त्या

सरदाराचं नशीबच फिरलं म्हणायचं. मला आतांशा दोनच काळज्या आहेत. पण तुला सांगून तुझं तरी मन कशाला काळजींत पाडूं ? इतके दिवस गेले तसें हेही जातील !

**तारा**:–बाबा ! “ माझ्या लग्नाच्या काळजीनं आपली प्रकृति सध्यां बरी राहात नाहीं, ” असं परवां आई म्हणाली. बाबा ! सध्यां आपण माझ्या लग्नाच्या भानगडींत पडूंच नका ! आपली प्रकृति बरी झाल्यावर मग पाहातां येईल, बाबा ! मी म्हणते ! लग्न सोहाळे सुखासाठीं करायचे नां ? ज्यापासून आपल्याला त्रास व चिंता ती गोष्ट कशाला करायची ?

**मानाजी**:-तसं नाहीं. ज्या गोष्टी करायच्या असतात त्या केल्याच पाहिजेत !

**तारा**:–मला याबाबतींत काय कळतं पण बाबा—( सावित्री प्रवेश करिते. )

**सावित्री**:–ऐकलीत का सकाळची हकीकत ?

**मानाजी**:–कसली !

**सावित्री**:–राणोजीरावांच्या घरांत एक वेडापीर शिरला आणि राणोजीराव समजून त्यानें निजलेल्या राणोजीरावांच्या बापावर वार केला ! म्हाताऱ्याचं आयुष्य बळकट म्हणून वार तितका खोल गेला नाहीं !

**मानाजी**:–अरेरे !. फार वाईट झालं !

**तारा**:–पण आई ! तो खुनी माणूस सांपडला का ?

**सावित्री**:–तो खुनी माणूस तेथून पळाला,

**मानाजी**:–( स्वगत ) माझी आज लाज राखली गेली म्हणायची ! नाहींतर सर्वंच अंगाशीं आलं असतं. ( उघड ) पण तो कोण असावा याची कांहीं माहिती तुला कळली का ?

**सावित्री**:–कोणी म्हणतात तो हिंदु होता पण कोणी सांगतात तो दाढीवाला होता. बहुधा मुसलमान असावा असं लोक सांगतात. परवां राणोजीरावांनीं आपल्या तारेला सोडवलं त्याचा सूड म्हणून कोणातरी अविंधाचंच हें कृत्य असावं असा पुष्कळांचा समज आहे.

**मानाजी**:–मलासुद्धां तसंच वाटतं !

**सावित्रीः**-तारे ! स्वयंपाक घरांतून थोडं फराळाचं आण नि पाण्याचा तांब्या पण घेऊन ये. ( तारा जाते ) हें पहा ! आतां फराळ झाल्यावर आपल्याला राणोजी रावांच्याघरीं गेलं पाहिजे !

**मानाजीः**-गेलं पाहिजे हें खरं. पण—

**सावित्रीः**-इथं देखील तुमचं पण ? हें पण नि परंतु केव्हां संपतील कोणाला ठाऊक ? अशावेळीं जर आपण राणोजीरावांच्या वडिलांच्या समाचाराला गेलों नाहींत तर लोक काय म्हणतील ?

**मानाजीः**-लोकांना काय ! एकदा एका गोष्टीला बरं म्हणायचं नि त्याच गोष्टीला कांहीं वेळानं नांव ठेवायची. दुनिया नुसती दुतोंडीच नाहीं पण. कांहीं म्हणतात ती दुरंगी आहे. पण मी म्हणतों ती पंचरंगी आहे एकवेळ तापलेल्या कढईंत टाकलेले चणे फुटण्याचे थांबतील पण या जनतेची तोंडं बंद होणार नाहींत. दुनीयेंत वाटेल त्याला, वाटेल त्यानं, वाटेल तेव्हां, वाटेल तसं बोलावं. त्यांच्याकडे जाणं इष्ट आहे. अगदीं कबूल! पण कसं जावं ?आपण पडलों सरदार नि राणोजी पडला शिपायी व तोही त्या पुंड शिवाजीचा. राजद्रोही माणसाच्या शिपायाच्या घरीं आमच्यासारख्या सरदारानं जाणं ह्मणजे राजसत्तेचा जाणून बुजून अपमान ! राजसत्तेचा अपमान मी प्राणांतीं देखील करणार नाहीं !

**सावित्रीः**-जी राजसत्ता आपल्याला रोजच्या व्यवहारांत नाडते ती राजसत्ता कसली ? व अशा राजसत्तेचे सरदार राहण्यांत भूषण कसलं ? असल्या सरदारीपेक्षां रानावनांत उपाशी राहणं बरं ?

**मानाजीः**-या बाबतींत तुझं माझं केव्हांच पटणार नाहीं. मी राजभक्त तर तूं राजसत्तेच्या विरोधकांची री ओढणारी ! तुझ्या या अशा पद्धतीनं माझं जन्माचं वाटोळं व्हायचं !

**सावित्रीः**-नि झालं ह्मणून काय झालं ! मी साफ सांगतें आपण आज राणोजीरावांकडे आलंच पाहिजे. मीसुद्धा आपल्याबरोबर येईन व तारेलासुद्धां घेईन.

**मानाजीः** मी येणार नाहीं. राणोजीची भेट घेणं यालाच मी राजद्रोह समजतो. राजद्रोहाचं पातक मी कधींही करणार नाहीं.

**सावित्रीः**-आपण येत नसला तर मी जाईन व तारेलाही घेऊन जाईन.

**मानाजी:**–माझ्या घरात मी राजद्रोह चालूं देणार नाहीं. आदिलशाहीच्या अन्नावर आपलं आयुष्य अवलंबून आहे. तें अन्न मी लाथाडणार नाहीं व तुलाही लाथाडूं देणार नाहीं. ( तारा फराळाचें ताट घेऊन येते)

**तारा:**–बाबा! थोडं खायचना?

**मानाजी:**–अन्नासाठींच तर ही सर्व धडपड आहे. मी खाईन; पण त्याच्या अगोदर मला तुला एक गोष्ट विचारायची आहे. तूं सरळ उत्तर देशील ना?

**तारा:** पित्याला वेडं वांकडं उत्तर आर्य कुमारिका कधींतरी देतील का? बाबा! तुम्हांला अशी शंका कां बरं आली? आई! माझ्याविषयीं बाबांना अशी शंका कां?

**सावित्री:**–तारे! तुझे बाबा सरदार आहेत, तुझे बाबा राजभक्त आहेत. तुझे बाबा! राजकारणांत गुंतले असल्यानं शंका येणं साहाजिक आहे ऐकलंत कां! मुलीला काय विचारायचं तें खुशाल विचारा!

**मानाजी:**–आज राणोजीच्या घरीं जावं असं इचं म्हणणं आहे. बाळ! तुला काय वाटतं हें मी सहज सांगूं शकतों. पण तिथं गेल्यानं आपली जहागीर जाईल व तुला सर्व जन्म दारिद्र्यांत व दुःखांत काढावा लागेल. एक वेळं राणोजीच्या घरीं गेल्यानं जर आपणां सर्वांचं जन्माचं वाटोळं होतंय, तर थोडा शहाणपणा व मुत्सद्दीपणा वापरून न जाणं बरं असं मी ठरवलं आहे. बाळ! तुला कसं वाटतं?

**तारा:**–बाबा! आपणाला पसंत पडेल असंच उत्तर मी देईन, पण आपण प्रथम थोडा फराळ करा.

**मानाजी:**–आधीं सांग मग—

**तारा:**–बाबा! ज्यांनीं माझे प्राण वाचविले, त्यांच्या जिवासाठीं माझा सर्व जन्म कष्टांत काढावा लागला तरी मला त्याची दिक्कत नाहीं. तें दिव्य मी मोठ्या आनंदानं करीन, पण त्याबरोबरच माझ्या जन्मदात्या पित्याची आज्ञा मी केव्हांही मोडणार नाहीं. जी गोष्ट मला प्राणाहून प्रिय आहे तिचा विरह मी तुमच्यासाठीं सहन करीन! बाबा मग करतांना फराळ?

**मानाजी:**–या घराला कीड लागली आहे, मुली, तुझी पोपटपंची जशी गोड आहे तशीच ती स्पष्ट ही आहे मला आतां या घरांत अन्न घेता येणार नाहीं.

**सावित्री**:-मुलगी तोंड भरून फराळ करा म्हणते, नाहीं म्हणणं बरं नाहीं. तारे ! आण तें ताट ! ( तारा ताट आणते. सावित्री ताट घेऊन जवळ जाते ) मग करायचा ना फराळ ?

**मानाजी**:-या घरांत मला सर्व ठिकाणीं राजद्रोहाचा वास येत आहे. या अन्नांत देखील तेंच विष नसेल कशावरून ? या घरांतील अन्न सेवन केल्यानं राजद्रोहाच्या विषानं मी जळून जाईन तारे ! उचल तें ताट. हें अन्न माझ्या समोर नको !

**तारा**:-बाबा ! आम्हावर एवढा राग कां ? बाबा ! अन्नाला पाठ देऊं नये असं तुम्हीच सांगितलं ना ?

**मानाजी**:-पोरीला पढवून खूप तयार केलीस ! ( थोडा वेळ थांबून ) या विषारी अन्नाच्या वासानं देखील माझ्या शरीरांत राजद्रोहाचं विष भिनेल. तारे ! अजून नाहीं ना उचलीत ताट ? ( तारा ताट उचलावयास जाते. ताट उचलते व जाऊं लागते ) तारे ! थांब हें विषारी अन्न परत केल्यानं, त्याच्या वासानं सर्व घर विषारी होईल; म्हणून त्याला ( ताटांतील अन्न पाडून त्यावर नाचतो ) असं तुडवलं पाहिजे. ( पडदा पडतो )

---

## प्रवेश २ रा.

( स्थळ-विशाळ गडावरील शिवाजीचा वाडा )

( शिवाजी व तानाजी )

**शिवाजी**:-गोमातेचं रक्षण, हिंदूंचा त्रास दूर करणं व मातृभूमीला पारतंत्र्यांतून सोडवणं ही महत्कार्यं पार पाडण्याची ज्यांच्या जिवावर मी प्रतिज्ञा केली ते माझे शूर शिपाई, ते माझे शूर सरदार हळूहळू मला असेंच सोडून जाणार ना ? तानाजी ! अशीच स्थिति चालू राहिली तर हें शिरावर घेतलेलं कार्य कसं यशस्वी होईल ? बाजीप्रभूंनीं आम्हां सर्वांना शोक सागरांत टाकून

स्वतः मातृभूमीच्या सेवेनं आपला देह पुनीत केला. स्वदेशाच्या सेवेसाठीं काय करावं लागतं याचं उदात्त उदाहरण त्यांनीं आमच्या पुढं ठेवलं आपल्या बंधूंना मातृभूमीच्या सेवेसाठीं जिवंत राहातां यावं ह्मणून मोठ्या धैर्यानं शत्रूच्या सेना सागराची पर्वा न करतां आपला स्वतःचा प्राण धोक्यांत घालून शत्रूला अडवून धरलं. तानाजी ! अशा शूर व मातृभक्त बाजीप्रभूची जागा आतां कशी भरणार ? बाजीनं आपलं नांव अमर करुन ठेवलं !

**तानाजीः**–आबासाहेब ! मी आपल्याला सांगावं असं थोडंच आहे. बाजी सारखा निधड्या छातीचा वीर कामाला आला ह्या आघात सहन करण्याचं आपण-या वेळीं धैर्य दाखवलं नाहीं तर मग आपली स्थिति किती कठीण होईल याचा याचवेळीं आपण विचार करावा. मी नेताजी आणि बाजीप्रभू या आम्हा तिघांचीं शरीरं मात्र भिन्न पण मन एक. महाराज ! बाजीप्रभूचा देह धारा· तीर्थी पडला नाहीं पण आज सबंध महाराष्ट्राचा कलिजा त्या कठोर काळानं नेला. ज्या हरामखोरांनीं बाजीचा प्राण घेतला त्या अविंधांच्या दास्यांतून या भूमातेला आह्मीं सोडवलं तरच आमच्या बाजीप्रभूचा स्वराज्यासाठीं तळमळणारा आत्मा शांत होईल महाराज ! आपणच आतां आम्हाला पुढचा मार्ग दाखवावा.

**शिवाजीः**-तानाजी ! माझ्या देशबांधवांचें इतके अमोलिक प्राण खर्ची घालून शेवटीं तरी मातृभूमि स्वतंत्र होईल किंवा नाहीं हें कुणी सांगावं ? तेव्हां—

**तानाजीः**–महाराज ! समर्थांचा उपदेश आपणच आम्हांला सांगतांना ? " रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें " मग आतां अशी भाषा कां ? ज्या मातेनं आह्मांला जन्म दिला तिची सेवा करीत असतांना जर प्राणार्पण करण्याचा प्रसंग आला, तर त्यांत वावगं असं काय आहे ?

**शिवाजीः**-तानाजी ! तसं नाहीं " आधीं केलं मग सांगितलं " असं झालं पाहिजे, पण त्याप्रमाणं यावेळीं झालं नाहीं. बाजीच्या अगोदर आम्ही आमचा प्राण खर्ची घातला पाहिजे होता. बाजीनं, आघाडी मारली. बाजीच्या उदा-हरणानं हजारों तरुणाच्या मनांत स्वदेशाविषयीं प्रेम उत्पन्न होईल; पण त्याबरो-बरच या शिवाजीकडं—

**तानाजीः**–महाराज ! ही भलतीच कल्पना आपण मनांत सुद्धा आणूं नका. आम्हा मराठ्यांपैकीं एकूण एक जीव रणीं पडून शेवटीं आपण एकटे जिवंत राहि-

लांत तरी देखील त्यांत महाराष्ट्राचं कल्याण आहे. आजपर्यंत महाराष्ट्रांत शूर पुरुष थोडे का झाले? पण मातृभूमीला स्वातंत्र्य प्राप्त झालं पाहिजे अशी भावनाच कुणाला नव्हती. आपण सरदार व्हावं, सत्ता उपभोगावी व चैन करावी हेंच त्या शूरांचं ध्येय! आपण जी नवीन दिशा दाखविली, त्या आपल्या कल्पनेला मूर्त स्वरुप येण्यासाठीं तरी आम्ही महाराष्ट्रीयांनीं महाराज! स्वतःच्या प्राणांवर तिलांजलि देऊन, महाराजांच्या प्राणाचं रक्षण केलं पाहिजे. मी नेताजी, येसाजी, राघोबल्लाळ इतकंच नाहीं पण महाराष्ट्रांतला एकूण एक शिपाई कामाला आल्याशिवाय आपणाला आपला प्राण धोक्यांत घालण्याची, महाराज! आम्ही संधी देणार नाहीं. बाजीप्रभूंनीं आम्हाला आज आदर्श मार्ग दाखविला; आणि आमच्या देहांत प्राण असे पावेतों आम्ही देखील तोच मार्ग आक्रमणार!

**शिवाजीः**—आपण सर्वांनीं मातृसेवेसाठीं आपले प्राण आमच्या स्वाधीन केले आहेत हें आपलें मातृप्रेम पाहून आम्हाला प्रेमाचं भरतं येतं व त्याबरोबरच आम्ही शिरावर घेतलेल्या अवाढव्य जबाबदारीच्या जाणीवेनं आमचं मन कचरतं आपल्या स्वदेश भक्तीला जगदंबा मातेनं लवकर यश द्यावं एवढीच इच्छा करण्या पलिकडे यावेळीं आम्ही तरी कांहीं करूं शकत नाहीं!

**तानाजीः**—महाराज! भवानी मातेला आपली सर्व काळजी आहे. आपल्या आज्ञेप्रमाणं पहाऱ्याचा करडा बंदोबस्त केला आहे. ज्यांनीं पन्हाळ गडावरून गुप्त मार्गानं आपल्याला बाहेर आणलं, ज्यांनीं बाजीप्रभूंच्या खांद्याला खांदा भिडवून शेवटपर्यंत शत्रूला अडवलं व बाजीप्रभू पडल्यानंतर ज्यांनीं संकटाची पर्वा न करतां आपणाला बाजीप्रभूंच्या शवाचं दर्शन करवलं त्या बहादूर बंधुद्वयाकडे मुख्य पहाऱ्याचं काम सोंपविलं आहे. तेव्हां आपण थोडी विश्रांति घ्यावी. यावेळीं आपणाला विश्रांतीची जरुरी आहे.

**शिवाजीः**—तानाजी! मला विश्रांति नको आहे असं नाहीं; पण आज हजारों सैनिक रात्रंदिवस डोळ्याला डोळा न लावतां लढत असतांना मी कसा झोंपूं? मला विश्रांति पाहिजे नि त्यांना ती नको असं थोडंच आहे. ज्या दिवशीं माझ्या प्रिय सैनिकांना विश्रांति मिळेल, त्याच दिवशीं मी विश्रांति घेईन. मला वाटतं आपण थोड्या वेळानं स्वतःच पहाऱ्यावर जाऊं!

**तानाजीः**—जशी आपली आज्ञा. पण अति परिश्रमाचा शरीरावर परिणाम होईल ! आबासाहेब ! असं करणं बरं नाहीं.

( सेवक प्रवेश करतो. शिवाजीला मुजरा करून पत्र देतो. मुजरा करून जातो. शिवाजी पत्र उघडून वाचतो व चिंताक्रांत होतो. )

**तानाजीः**-महाराज ! असं त्या पत्रांत काय आहे कीं ज्यामुळं आपलं चित्त चिंतेनं व्यग्र व्हावं ?

**शिवाजीः**-दुसरं तिसरं कांहीं नाहीं. आपल्या किल्लेदाराचं हें पत्र आहे. दरवाजावर गणोजीचा पहारा होता. त्यावेळीं तिथं गणोजी नसून सुभानराव होता. पण तोही निजलेला. किल्लेदारानं आपल्या हुकमाप्रमाणं दोघांच्याही हातांत बिड्या ठोकून, त्यांना तुरुंगांत पाठविलं व आपल्या फर्मानाप्रमाणं त्यांना देहांत शासन होणार ! तानाजी ! मानवी शरीरानं जितके कष्ट सहन करणं शक्य आहे त्याच्याहीपेक्षां जास्त कष्ट त्या दोघांनीं केले आहेत व ते केवळ मातृभूमीच्या उद्धारासाठीं. इतके श्रम केल्यावर सुभानरावाचा डोळा लागला असला तर त्याचा काय बरं दोष ! आमच्या शासनाप्रमाणं शिस्त पाळली गेली नाहीं म्हणून किल्लेदारानं त्यांना तुरुंगांत पाठवून देहांत प्रायश्चित्ताची मंजुरी मागितली यांत किल्लेदाराचाही दोष नाहीं. तानाजी ! दोष नसतांना अशा उज्वल मातृसेवकांची अहेतुक आज्ञाभंगाच्या अपराधाबद्दल हत्या झालेली मी कशी बरं पाहूं शकेन ?

**तानाजीः**-महाराज ! किल्लेदाराचीच कांहींतरी चूक झाली असेल. आपणाला बाहेर पडायचंच आहे तेव्हां या बाबतींत आपण प्रथम चौकशी करूं म्हणजे सर्व खरी हकीकत कळेल. ( जातात. )

---

## प्रवेश ३ रा

( स्थळ:—अंधार कोठडी. संपतराव )

**संपतरावः**—या अंधार कोठडीची मला मुळींच भीति वाटत नाहीं. या स्थितींत जरी माझा प्राण गेला तरी देखील मला त्याची पर्वा नाहीं ! मला वाईट इतकंच वाटतं कीं त्या देशद्रोही मानाजीरावाला जहागिरी पुढं आपल्या मुलीची

# आमच्या घरांत हाच चहा वापरतों

## मे० रामचंद्र आणि अबदुल करीम

**चहाची जंगी वखार** **१७० कांदेवाडी मुंबई नं. ४.**

यांचा चहा खात्री करून घेण्यासाठीं एक वेळ वापरून पहा. घाऊक व किरकोळ मिळतो. गुलाबी मिक्श्चर, ऑरेंजपेको, सिलोना टी यांचा एक वेळ अनुभव घ्या. हा चहा थेट मळ्यांतून मागवीत असतों. खात्रीचा व माफक दर यासाठीं आमच्या दुकानीं आपण अवश्य या !

सर्व ठिकाणीं एजंट पाहिजेत. एक आण्याच्या तिकीटासह वरील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

# श्री नरेन्द्र फार्मसीचीं नामांकित औषधें

**नरेंद्र एम्ब्रोकेशन**—हें औषध सर्व प्रकाचे वात, अर्धांगवायु, कंबरेंत, पाठींत छातींत दुखणें व इतर ठिकाणीं मार लागणें वगैरे शारिरीक दुखापतींवर अप्रतिम गुणकारी आहे. वा. किं. १ रु.

**नरेंद्र एग्युमिक्श्चर**—या औषधानें सर्व प्रकारचे ताप, मलेरिया, डेंगु, व इतर दोषी ताप साफ बरे होतात. वा. किं. १२ आणे.


**नरेंद्र दिव्तपापडा तेल**—या तेलापासून पित्तविकार वाढणें, डोकें दुखणें. झोंप न येणें वगैरे मेंदूचे विकार साफ बरे होतात. किं. १२ आणे.

**नरेंद्र गजकर्ण मलम**—या मलमानें त्वचेवरील सर्व रोग, गजकर्ण, खरूज, नायटे, इसब वगैरे खात्रीनें बरे होतात. वा. किं .४ आणे.

**नरेंद्र काळी टुथ पावडर**—रोज वापरल्यानें दांतासंबंधी सर्व विकार साफ बरे होतात वा. किं. ४ आणे. शिवाय इतर औषधें मिळतील कॅटलॉग मागवा. व्यापारी व कॅनव्हासर यांस भरपूर कमिशन. ट. ख. नि.

**खोकल्याचर वाकेरी आसव**—रक्तशुद्धिकारक, धातुवर्धक, शक्तिदायक व दमा, खोकला, कफ यांवर अप्रतीम गुणकारी,वा.किं.१६.ट ख.नि.

सोल एजंट—**श्री हनुमान एजन्सी**, पोयबावडी, मुंबई १२.




# रबरी शिक्के

बनविणार

# मानकामे ब्रदर्स

विशेषत:—पितळी तांब्याच्या पाट्या व दरेक

धातू वरील कोरीव कामें

काळबादेवी—मुंबई, नं. २

तशीच आपल्या धर्माची देखील किंमत वाटत नाहीं. जहागीर म्हणजे सर्वस्व व त्या जहागिरीसाठीं वाटेल तें करायला त्याला लाज वाटत नाहीं. " दाम करी काम नि बिबी करी सलाम " हें म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. जहागिरदार म्हणजे श्रीमंत, पैशाची लयलूट. पैसा मुबलक असला म्हणजे देशाची अथवा धर्माची पर्वा कशाला? पण धनानं धुंद झालेल्या, देशद्रोहाच्या पातकानं पापी बनलेल्या, जहागिरीच्या लालचीनं भुरळून गेलेल्या या विलासी वेड्यांना असं कळत नाहीं कीं हें आपण काय करतों ? या फाजिल राजभक्तांना ताळ्यावर आणण्याचा फक्त एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे त्यानां वाळींत टाकलं पाहिजे. त्याचं हुक्कापाणी बंद केलं पाहिजे. इतकंच नाहीं तर अशा राजभक्ताबरोबर आपण व्यवहार करणं सोडून दिलं पाहिजे.( तळघराचे पाहाऱ्यावरील शिपायी हुषार म्हणून ओरडतो—१२ चे ठोके ) बारा वाजले. असंच पडावं झालं. पण त्या तारेच्या लग्नाचं काय बरं झालं असावं ! देवा ! यावेळीं तिचं शुभ इच्छिण्यापलीकडे मी काय करूं शकणार ! हें तळघर इतकं मजबूत आहे कीं इथून निसटण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला यश येणं जवळ जवळ अशक्य दिसतय ! तरीदेखील प्रयत्न हा केलाच पाहिजे. ( भिंतीच्या विटेला वाटीनें खरडतो. बाहेर शिपायी पहारा करीत फिरतो इतक्यांत राणोजी व खुशालराव येतात. )

**शिपाई:**–कौन हय !

**राणोजी:**–शिवाजीचा शिपायी !

**शिपायी:**–शि—वा—जी—तो—तो –बा—बा —

**राणोजी:**–अरे असा भितो कां ! खुशालराव ! या गरीबाला कशाला मारा. पण याला असा मोकाट सोडतांही उपयोगी नाहीं. शिपायी ?

**शिपायी:**–( कांपत कांपत ) आ —आ—आ — शि–वा–जी–म.—

**राणोजी:**-चल ! तळघराचं कुलूप काढ व दार उघड ! ( शिपायी कांपत कांपत उभा राहतो ) काढतोस कीं नाहीं कुलूप ? ( शिपायी कुलूप काढतो व दार उघडतो. )

**राणोजी:**–चल ! तूहीं आंत चल. ( शिपायी चालूं लागतो ) खुशालराव ! आतां काळजी करण्याचं मुळींच कारण नाहीं. आपल्या मित्राची सुटका होण्याला आतां क्षणाचाही विलंब लागणार नाहीं. ( आंत जातात )

**संपतराव**:-आजच्या प्रयत्नाला पुष्कळच यश आलं म्हणायचं. असंच चार दिवस झालं तर पांचवे दिवशीं सहज बाहेर पडतां येईल. (चाहूल ऐकतांच) हे कोण ? ( जेथली वीट खरडतो तेथें पाठ लाऊन बसतो. खुशालराव, राणोजीराव, शिपाई प्रवेश करतात. )

**खुशालराव**:-संपतराव ?

**संपतराव**:-कोण, खुशालराव ?

**खुशालराव**:-होय, मीच तो-माझ्याबरोबरचे गृहस्थ राणोजीराव. यांच्या प्रयत्नानं मला तुमचा तपास लागला.

**राणोजी**:-ही बोलण्याची वेळ नाहीं. या ठिकाणीं जास्त वेळ राहाणं धोक्याचं आहे. संपतराव आपल्या अंगावरचे कपडे काढा ( संपतराव कपडे काढतो ) शिपाई घाल ते कपडे तुझ्या अंगावर व बैस इथं.

**शिपायी**:-मी—इ—थं—

**राणोजी**:-बसतोस कीं नाहीं ?

**शिपायी**:-हो बसतो. पण—

**राणोजी**:-किल्ली आण. ( शिपायी किल्ली देतो )

**शिपायी**:- महाराज, मला इथं यांच्या जागीं ठेवण्यापेक्षां मलाही बरोबर न्या. शिवाजी महाराजांना शूर माणसांची कदर आहे. इथं राहून मी इतका नामर्द बनलों आहे कीं आपल्या दटावणीला मी सध्या भीत आहे. पण जर शिवाजी महाराजांच्या पदरीं ठेवाल तर मी १० जवानांना भारी होईन.

**राणोजी**:-याच तळघरांत सध्या तुला राहिलं पाहिजे. शिवाजी महाराजांची सेवा करणं सोपं नाहीं. तुझ्या प्राणावर गदा आली तर शिवाजी महाराजांचं स्मरण कर म्हणजे तुझं संकट टळेल. सध्या तूं इथं रहा. तुझ्याही मदतीची आम्हाला जरुरी आहे व त्यावेळीं आम्ही जरुर तुला बरोबर घेऊं.

**खुशालराव**:-चला ! संपतराव ! आतां लौकर चला. ( सर्वजण जातात, राणोजी कुलूप न लावतांच जातो. ) ( मानाजीराव प्रवेश करतो. )

**मानाजी**:-धर्माची तळी उचलणाऱ्या संपतरावा ! या तळघरांत धर्म आतां तुझं कसं रक्षण करणार तें पाहाण्यासाठींच मी आलो आहे. संकटाच्या वेळीं देव

मदत करतो, झूट! देव, धर्म! सब झूट! पैसा हाच देव व पैसा हाच धर्म. पैसा नाहीं म्हणजे कांहीं नाहीं. एकाद्या वेळीं पैसा मिळत असला, जहागीर मिळत असली, व कोणाचा गुलाम होण्याचा प्रसंग आला तरी बहेत्तर पण पैसा मिळवावा. त्यासाठीं देशाशीं द्रोह करण्याचा प्रसंग आला तरी चालेल पण पैसा सोडतां उपयोगी नाहीं. खुळ्या संपतरावा! आमच्या पंथाचा तूं पण तुझ्या डोक्यांत हें धर्माचं वेड, कसं शिरलं? या अंधार कोठडीच्या सहवासानं तुझं डोकं आतां शांत झालं असलं पाहिजे. मला खात्री आहे कीं आमच्या कळपांतून फुटलेला तूं प्राणी आतां आमच्या कळपांत खचित परत येऊन मिळशील. ( दारावर पहारेकरी नाहीं हें पाहून ) काय? इथं आज पहारेकरी देखील नाहीं. अशा तऱ्हेनं जर पहाऱ्याचा बंदोबस्त होत असला तर मग हे पहारेकरी पाहिजेत कशाला? या हरामखोराला आतांच्या आतां काढून टाकलं पाहिजे. ( दरवाज्या जवळ जाऊन ) अँ? हें कुलूप उघडं कसं? पहारेकरी नाहीं! कुलूप उघडं! ही भानगड तरी काय आहे? सावधगिरीनंच वागलं पाहिजे. ( पिस्तूल काढतो ) हें प्राण संरक्षक हत्यार बरोबर असलं म्हणजे आम्हाला कशाचीही पर्वा नाहीं. ( तळघरांत जातो. )

**शिपायी:** या शिवाजीच्या नांवात काय जादू आहे कळत नाहीं. मी इतका मर्द पण शिवाजीचं नांव ऐकतांच माझी बोबडी वळली. शिपायीगिरीच करायची तर ती निदान मर्दाची तरी करावी. त्या मर्दाचा मी शिपायी केव्हां होईन असं मला झालं आहे. मी आतांच्या आतांच शिवाजी महाराजांकडे जातो. ( उठतो. इतक्यांत मानाजी प्रवेश करतो. )

**मानाजी:**—संपतराव! मी आलों म्हणून माझ्या स्वागतासाठीं आपण उठण्याचे श्रम घेऊं नका. आपला व माझा संबंध इतका जिव्हाळ्याचा आणि निकटचा आहे कीं आपणाला या तळघरांत ठेवण्याचं माझ्या अगदीं जिवावर येत आहे. व आपल्या पूर्वीच्या सलोख्यामुळं आपणाला यापुढं या तळघरांत जास्त दिवस ठेवणं कससंच वाटतं. आपली हरकत नसली तर याच घटकेला मी आपली सुटका करतों. संपतराव—

**शिपायी:**—( स्वगत ) हा मला संपतराव समजतो आपणही सध्यां कांहींच बोलूं नये.

**मानाजीः**-कां ! आमच्याबरोबर बोलण्याचीसुद्धां तुमची इच्छा नाहीं. वाटल्यास बोला अथवा नका बोलूं. मित्र ह्मणून तुमची मला दया येत आहे व एकाच अटीवर मी इथून तुमची सुटका करीन. मग आहे कां कबूल ! ( शिपायी न बोलतांना मानेनें होय ह्मणतो. )

**मानाजीः**-आतां कसे शुद्धीवर आलांत ! वेळ आला ह्मणजे सर्व कांहीं होतं. आपण यापुढें राजकारणांतून आपलं आंग काढून घेतलं पाहिजे इतकंच नाहीं पण मी सांगेन तोंपर्यंत आपण आपल्या महालाच्या बाहेरसुद्धां पडणार नाहीं अशी कबुली दिली तरच आपली सुटका होईल, आहे कां कबूल ? ( शिपायी मानेनें होय ह्मणतो. ) मग चला मजबरोबर. ( शिपायी चालतो ) संपतराव ! पहा वचनभंग करून जर राजकारणांत पडलांत अथवा आपल्या महालांतून बाहेर पडलांत व आमचा हुकूम अमान्य केलांत तर गांठ इतर कोणाशीं नसून या मानाजीरावांशी आहे. समजलांत !

**शिपायीः**-पण मी संपतराव नाहीं !

**मानाजीः**-मग तूं कोण ?

**शिपायीः**-मी तुमचा शिपायी !

**मानाजीः**-हरामजाद्या ! त्या संपतरावांजवळून लांचलुचपत खाऊन त्याला सोडून दिलंस ! थांब तुझी आतां चाबडीच काढतो !

**शिपायीः**-गरीबाची चामडी कुणीही काढील सरकार ! मी त्यांना सोडलं नाहीं.

**मानाजीः**-त्वां नाहीं सोडलं तर कुणी सोडलं ?

**शिपायीः**-त्या शिवाजी महाराजांच्या—

**मानाजीः**-काय ? ( कांपत ) शि--वा-जी--च्या. त्या दिवट्यांनीं. त्यांची आतां खोडकी जिरवतो. ( दोघेही जातात. )

---

## प्रवेश ४ था.

( स्थळः-तुरुंग, गणोजी व सुभानराव )

**गणोजीः**-सुभान्या ! माझ्यासाठीं तुझ्यावर शिक्षा भोगण्याचा प्रसंग यावा ना ?

**सुभानः**-दादा ! हा प्रसंग आला याचं मला कांहींच वाटत नाहीं. मला वाईट वाटतं त्याचं कारण निराळं आहे. ज्या हेतूनं आपण घरांतून बाहेर पडलों

त्या कार्याच्या सिद्धीसाठीं आपले प्राण गेले असते तर त्यांत मला आनंद झाला असता पण तसं न होतां, माझ्या भरंवशावर हजारों माणसांचें जीव असतांना मला घोर निद्रेनं पछाडून मी कर्तव्य पराङ्मुख झालों याचं मला वाईट वाटतं. दादा ! शत्रूंबरोबर लढाया देतं असतांना बाजीप्रभूप्रमाणं मला मरण यावं अशी परमेश्वराची मी प्रार्थना करीत असतांना मला कमीपणा आणणारं कृत्य माझ्या हातून घडून त्यामुळं मला मरण यावं याचं मला वाईट वाटतं !

**गणोजीः**–पण मरण टाळायला कांहीं उपाय नाहीं का ?

**सुभानः**–दादा ! अपराधाला शिक्षा हीं पाहिजेच. आणि अपराध्यानं ती धैर्यानं भोगण्यांतच रहस्य आहे. दादा ! पूर्व जन्मांत माझ्या हातून कांहींतरी भयंकर पाप झालं असलं पाहिजे. म्हणूनच मला निद्रेनं घेरलं व मी माझ्या कर्तव्यापासून च्युत झालों.

**गणोजीः**–पण यावेळीं या तुरुंगांत हे दोन इसम कशासाठीं ?

( वेशांतर केलेले शिवाजी व तानाजी प्रवेश करतात )

**सुभानः**–आपण कोण ? आपलं यावेळीं काय काम आहे ?

**शिवाजीः**–सुभानराव ! गणोजी ! तुह्मीं दोघांनीं आतांपावेतों जी कामगिरी केली ती लक्षांत घेतां तुमचा गुन्हा नसतांना तुह्मांला शिक्षा देण्यांत चूक झाली आहे असं मला वाटलं. तेव्हां किल्लेदाराची मी भेट घेतली व तुम्हाला भेटावयची परवानगी मिळविली. तुमच्या सुटकेचा प्रयत्न करण्याची माझी इच्छा आहे. माझा व तुमचा परिचय नसला तरी स्वदेशसेवा करणाऱ्यांच्या प्राणावर विनाकारण गदा येऊं नये या इच्छेनें माझ्या मित्रासह मी इकडे आलों आहे

**सुभानः**- आपला हेतु फार. उदात्त आहे. पण आपल्याला माझ्या बाबतींत कांहीं देखील करतां येणं शक्य नाहीं. दादाचा पहारा असतांना वरिष्ठाच्या परवानगीशिवाय दादाला विश्रांति मिळावी म्हणून मी काम घेतलं हा एक गुन्हा, शिवाय मी स्वतः पहारा न करितां झोंपलो हा दुसरा गुन्हा. गुन्हा केल्यावर शिक्षा होऊं नये म्हणून अळंटळं करून कांहीं तरी सबबीपुढें आणण्यांत अर्थ कोणता ?

**तानाजीः**–रोज इतके श्रम केल्यानंतर झोंप येणं हा शरीर धर्म आहे, गुन्हा नाहीं. आणि असलाच तरी त्याला देहांत प्रायःश्चित्त एवढी जबर शिक्षा असणं योग्य नाहीं.

**सुभानः**–जोखमीचं काम अंगावर घेण्यापूर्वीच याचा विचार करण्याचं माझं काम होतें. तें मीं केलं नाहीं, मी श्रमानं थकलों आहे, मला एक दिवस विश्रांति पाहिजे, असं मी किल्लेदारांना प्रथम कळविलं असतं तर त्यांनीं निराळी व्यवस्था केली असती. गुन्ह्यांच्या प्रमाणांत शिक्षा आहे किंवा नाहीं हा शिक्षा देणाऱ्याच्या मर्जीचा प्रश्न आहे. गुन्हेगारानं त्या बाबतींत तक्रार करणें व्यर्थ आहे.

**शिवाजीः**–सुभानराव ! आमच्यानं लढाईचं विशेषसं काम होणं शक्य नाहीं. तुमची तशी स्थिति नाहीं. शिवाय महाराजांजवळ तुमचं थोडंबहुत वजन आहे. तेव्हां तुह्मी याबद्दल तक्रार कां करीत नाहीं ?

**सुभानः**–चूक माझी आणि शिक्षा होऊं नये ह्मणून महाराजांना मी कोडं घालूं ? शिस्त आणि कायदा सर्वांनीच पाळायचा असतो.

**गणोजीः**–आपण आमच्याविषयीं एवढी सहानभूती दाखवितां याबद्दल आह्मी आपले आभारी आहोंत.

**तानाजीः**–मग आपल्या सुटकेविषयीं आह्मीं कसा प्रयत्न करावा ?

**सुभानः**–आपण या बाबतींत मुळींच कांहीं करूं नये. असं आपण केल्यास मला आनंद होईल.

**शिवाजीः**–इतका कां या देहाचा तुम्हांला कंटाळा आला आहे ? कीं त्याची तुम्ही परवा देखील करीत नाहीं ?

**सुभानः**–जीव नको आहे असं थोडंच आहे. पण जगण्यासाठीं याचना करण्याचा प्रसंग नको ! स्वतःच्या कर्तबगारीवर व हिंमतीवर जगण्यांत भूषण आहे. "मला जगवा" अशी याचना करून जगण्यांत अधःपात आहे.

**तानाजीः**–सुभानराव; तुमची कल्पना कितीही उदात्त असली तरी व्यवहाराला ती चुकीची आहे. तुम्हीं जिवंत राहिला तर कितीतरी कार्य तुमच्या हातून होतील. समजा थोडी याचना, अपमान व लोकापवाद सहन करण्याला तुम्ही कचरलांत तर मातेची आणखी थोडी सेवा करण्याची मिळणारी संधी तुम्ही गमावली असं नाहीं का होणार ?

**गणोजी:**-जी गोष्ट मुळांतच चुकीची आहे ती व्यवहाराच्या नांवाखालीं चांगली आहे असं भासविणं ही हातचलाखी आहे.

**सुभान:**-जो मातृभूमीच्या कार्यांत आज कर्तव्याला चुकला, तो मातृभूमीच्या सेवेसाठीं पुढेंतरी कसा पात्र होणार ?

**शिवाजी:** मनुष्य मात्र चुकीला पात्र आहे ह्मणून सहज घडलेल्या अपराधाबद्दल प्रसंगोपात ' अपमान ' सोसून देखील देशसेवेसाठीं जिवंत राहिलं पाहिजे.

**सुभान:**-" बूँदोसे गयी वो हौदोसे नहीं आती " प्रथम अपराध करावा, केवळ देशसेवा करतां यावी ह्मणून जिवंत राहण्यासाठीं अपमान सोसावा, क्षमेची याचना करावी, ही विचारसरणी सर्वांनाच पटण्यासारखी नाहीं. क्षमेची याचना केल्या नंतर मला नाहीं वाटत मी कार्य करूं शकेन. माझ्या वर्तनाकडे माझ्या मित्रांचं आणि खेड्यांतील इतर तरुणांचं लक्ष आहे देशसेवेला आणि मातृभूमी साठीं प्राणार्पण करण्यास तयार असलेल्या तरुणांपुढं मला स्वत:च्या वर्तनानं-कलंकरहितच ध्येय ठेवायचं आहे. बोलांत आणि कृतींत साम्य नसलं तर कार्याला यश येणं शक्य तरी आहे काय ? कृपा करून या बाबतींत आतां आपण आग्रह करूं नका ! अपराधाबद्दल शिक्षा भोगण्याचा आमचा संकल्प आहे.

**शिवाजी:**-मनुष्याला जगांत पुष्कळ कर्तव्यं करावीं लागतात. सर्वांस स्वत:च्या कुटुंबासाठीं कराव्या लागणाऱ्या कर्तव्याला अग्रस्थान आहे. तुमच्या आईसाठीं तसंच तुमच्या वडिलांसाठीं व त्याचबरोबर तुमच्या स्त्री-पुत्रासाठीं जें तुम्हीं करायला पाहिजे, तुमच्यावर जें करण्याची धर्मानं जबाबदारी टाकली आहे तें कर्तव्य करण्यासाठीं तरी तुम्हीं जिवंत राहिलं पाहिजे. तुम्हीं स्वत: मरणाला तयार असाल; पण तुमच्या करणीला त्यांची समंती नको काय ? समजा तुम्हाला थोडा अपमान सहन करावा लागला तरी पुढील आयुष्यांत तुम्हीं जें करून दाखवाल त्यानं तुमच्या समजुतीप्रमाणं लागलेला कलंक धुतला जाणार नाहीं असं तुम्हांला वाटतं काय ?

**गणोजी:**-आम्ही करतों तें योग्यच करीत आहोंत अशीं आमची वडिल माणसं म्हणतील.

**सुभान**:-आम्ही कर्तव्य पराङ्मुख झालों व क्षमेची याचना करून जिवंत राहण्याची आमची इच्छा आहे ही नुसती कल्पना देखील त्यांना सहन होणं शक्य नाहीं !

**शिवाजी**: तसं असलं तर निराळं. पण तुमच्यावर प्राणसंकट आलं आहे ही बातमी त्यांना मिळाली व तुमच्या मताप्रमाणं त्याचं मत नसलं तर त्यांच्या समजुतीप्रमाणं तुमच्या सुटकेविषयीं त्याचं कर्तव्य त्यांना करण्याला संधी देणं हें तुमचं कर्तव्य नाहीं काय ?

**गणोजी**:-त्यांना आमची स्थिति सांगण्यांत कोणतीच हरकत नाहीं. आमच्या विषयीं आपण एवढी सहानुभूती दाखविली तेव्हां आमच्या घरीं आपण खुशाल निरोप पोहोंचवा.

**सुभान**:-मृत्यूची वार्ता अप्रिय खरी, पण आम्हीं कर्तव्याची जाणीव ठेऊनच मृत्यूला आलिंगन देत आहोंत हें एकून त्यांना समाधान वाटेल माझ्या वडिलांना ही हकीकत कळवा, पण कृपा करून काकी समक्ष सांगूं नका !

**शिवाजी**:-तुम्हीं सांगतां तसंच करूं ( जाऊं लागतात )

**सुभान**:-हें पहा मला आपणाला थोडं सुचावायचं आहे !

**शिवाजी**:-( परत येऊन ) खुशाल सुचवा !

**सुभान**:-आपण कृपा करून सध्यांतरी आमच्या घरीं ही हकीकत कळवूं नका. आम्हा दोघांना देहांत प्रायश्चित मिळाल्यानंतर ही हकीकत घरीं कळेल असं करा आधीं कळविल्यास कांहीं अनर्थ ओढवेल असं नाहीं, पण पुत्रमोह मोठा कठीण असतो. त्याला आमची वडीलमंडळी चुकून बळी पडली तर ते शिवाजी महाराजांना संकटांत घालतील. महाराज दयाळू आहेत त्यांना संकटांत घालण्याची आमची इच्छा नाहीं. महाराजांनीं यावेळीं दया दाखविली तर सैन्यांतील शिस्त नाहींशी होईल व शिस्त नाहींशीं झाली तर यश कुठचं ! स्वातंत्र्यासाठीं पुकारलेल्या रणयज्ञांत शिस्तीसाठीं आम्ही प्राणार्पण केलंच पाहिजे; कारण शिस्त ही यशाची किल्ली आहे; म्हणून म्हणतों कृपा करा व आमच्या वडिलांना ही गोष्ट मग कळवा !

**शिवाजी**:-नश्वर देहावर ज्यानं मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं तिलांजलि दिली आहे त्यांच्या रक्षणाची काळजी त्या परमात्म्याला असते. मनुष्य कोणाला मारूंही शकत नाहीं व जगवूंही शकत नाहीं! तुम्हां बंधुद्वयाच्या नशीबीं काय लिहिलं असेल कुणी सांगावं ?

**तानाजी**:-जिच्या प्रेरणेनं शिवाजी महाराजांनीं स्वराज्य स्थापनेची सुरवात केली ती जगदंबा माता मला वाटतं तुमचं रक्षण करील.

( शिवाजी व तानाजी जातात. पडदा पडतो. )

---

## प्रवेश ५ वा.

( स्थळ—मानाजीरावाचे घरांतील दिवाणखाना. तारा. )

**तारा**:-बाबांची राणोजीरावाविषयींची कल्पना किती विलक्षण ! शिवरायाच्या पक्षांतले लोक म्हणजे राजद्रोही ही त्यांची समजूत इतकी दृढ झाली आहे कीं, ती फक्त एक परमेश्वरच फिरवूं शकेल या त्यांच्या पूर्वदूषित ग्रहामुळं माझं कार्य फार कठीण झालं आहे. मला महाराजांचं दर्शन घ्यायचं आहे, इतकेंच नाहीं पण वेळ पडल्यास हिंदू कुमारिका काय करूं शकतात हेंही बाबांच्या प्रत्ययास आणून द्यायचं आहे. त्यादिवशीं राणोजीरावांनीं यायचं कबूल केलं; पण योगायोग निराळाच होता. 'आज येईन' असा आज त्यांचा निरोप आईला आला आहे असं कळतं पण ते केव्हां येणार हें आईला विचारण्याचं मला त्यावेळीं कसं बरं सुचलं नाहीं. माझी काळजी वाहतां वाहतां त्या माउलीची प्रकृतिसुद्धां नीट राहत नाहीं. परमेश्वरा ! माझ्या मातेची मी कशी बरं उतराई होऊं ? स्वधर्म प्रेम आणि स्वाभिमान याचं बाळकडू माझ्या मातेसारख्या महाराष्ट्रांतील सर्व माता, आपापल्या बाल बालीकांना पाजतील तर विधर्मियांच्या दास्यांतून आधीं महाराष्ट्राची व मग सर्व भारताची मुक्तता करायला वेळ तरी किती लागणार ? आईचें नांव काढायचाच उशीर कीं ती आलीच. याचं नांव प्रेम ! हीच प्रेमाची खूण किंवा हाच प्रेमाचा साक्षात्कार ! जगांतल्या सर्व प्रेमांतलं अत्युच्च प्रेम म्हणजेच मातृप्रेम ! या मातृप्रेमाचा मला असाच सदैव लाभ मिळेल का ? ( सावित्री प्रवेश करते ) आई ! तुला पाहिल्याबरोबर मनांतल्या सर्व चिंता नाहींशा होतात व माझं मन आनंद-सागरांत पोहूं लागतं, आई ! तुझं मजवरचं प्रेम असंच जन्मभर राहील ना ?

**सावित्री**:-बाळ ! अशी शंका कां ? आईच्या प्रेमाविषयीं मुलीला शंका कां बरं यावी ?

**तारा**:-आई ! तसं नाहीं, मला आज असं वाटतंय कीं--

**सावित्री**:-सांग, खुशाल सांग !

**तारा**:-तूं मजवर रागावणार आहेस; आई ! खरं सांग ! तूं रागावणार कां ? मी काय बरं केलं कीं, तूं मजवर रागवावं ? बाबांची इच्छा मी मान्य करूं नये हें स्वार्थासाठीं पटलं तरी--

**सावित्री**:-बाळ ! माझा तुजवर राग असणंच शक्य नाहीं. आज मी निराळ्याच कामासाठीं आलें आहे. आज परमेश्वराच्या मनांतून आपणा दोघींची परिक्षाच पाहायची आहे.

**तारा**:-आई ! तुला असं कां वाटलं, कीं मी त्या परिक्षेत उतरणार नाहीं ? आम्ही हिंदु कुमारिका, आम्हाला कोणतेंही दिव्य करायला सांगा. आम्हीच तें करूं ! धर्मासाठीं तसंच शीलासाठीं दिव्य करण्याचा महामंत्र पुरातन कालापासून हिंदु कुमारिकांनीं जपलेला आहे. व तोच महामंत्र-तोच त्यागाचा महामंत्रच-मी जपणार नाहीं असं कसं होईल ?

**सावित्री**:-बाळ ! तसं मला मुळींच वाटत नाहीं, उलट तुझ्यासारखी दिव्य करण्याला तयार असलेली कन्या परमेश्वरानं मला दिल्याबद्दल मला अभिमान वाटत आहे ! बाळ ! या लग्नाच्या भानगडींनं मला आतां इतकं संकटांत घातलं आहे कीं त्यांतून बाहेर कसं पडावं हेंच मला कळत नाहीं !

**तारा**:-आई ! ही भानगड कायमची मिटवायची असली तर एक उपाय आहे !

**सावित्री**:-कोणता तो ?

**तारा**:-ज्या माझ्यामुळं ही सर्व भानगड उपस्थित झाली आहे, त्या मलाच नाहीस केलं म्हणजे झालं !

**सावित्री**:-म्हणजे ?

**तारा**:-अगदीं सरळ आहे ! मी नाहींशी झालें, म्हणजे सगळ्या भानगडी मिटतील. आई ! शीलसंरक्षणार्थी प्राणाची पर्वा न ठेवतां परमेश्वराच्या दरबारांत लवकरच जातां यावं अशा तऱ्हेचीं साधनं आम्ही कुमारिका, आमच्याजवळ नेहमीं ठेवीत असतो ! आई ! मी काय म्हणतें तें आतां दाखवितें. ( जाते )

**सावित्री**:-मला जें कांहीं वाटतं तें मी मुलीला कसं सांगू ? स्वामिभक्तीसाठीं आपल्या मुलाचा प्राण पन्नादाईनं दिला, धर्मासाठीं तारेचा बळी मी कां बरं देऊं नये ? तारा शहाणी आहे. पण स्वतःच्या प्राणावर बेतलं म्हणजे सर्व शहाणपण नाहींसं होतं ! तारा माझं ऐकेल का ?

**तारा**:-( प्रवेश करून व हातातली शिशी दाखवून ) आई ! हें तें साधन आहे. शील संरक्षणाची खरी सोमतीण या शिशींत आहे. दीनाच्या दुःखाला काय-मचं परिमार्जन करण्याची शक्ति या शिशींतल्या दिव्य वनस्पतीच्या रसांत आहे. हा रस चवेला कितीही कटु असला तरी त्याचा परिणाम मधुर आहे. आई ! अशा या अनुपमनीय वल्लीच्या रसाचा एक थेंब माझ्या पोटांत गेला कीं, तुला जन्मभर माझी काळजी राहणार नाहीं. असं हे दिव्य औषध आहे !

**सावित्री**:-पण बाळ ! अशा या अमृताचा स्वाद घेऊन स्वतःचा प्राणघात करणं केव्हांही इष्ट नाहीं. संकटं आलीं असतां, त्यांना तोंड देऊनच त्यांतून बाहेर पडलं पाहिजे संकटाला कंटाळून प्राणनाश करणं हें भित्रेपणाचं लक्षण आहे. परिस्थितीशीं झगडतांना मृत्यु येणं निराळं, आणि स्वतः विष प्राशन करून मृत्यूला आमंत्रण देणं निराळं !

**तारा**:-पूर्ण विचार करून शील रक्षणासाठीं यमराजाला बोलावलं तर त्यांत आत्महत्येचा दोष नाहीं. आई ! ज्या प्रेमळ हातानं तूं मला खेळवलंस त्याच तुझ्या प्रेमळ हातानं या शिशींतील पांच थेंब मनांत कसलीही शंका न आणतां मला पाज. तुझ्या प्रेमांत इतकी जादु आहे कीं, माझ्या कुडींतून पंचप्राण निघून गेले तरी तुझी सेवा करण्याला ते सदैव तुजजवळच राहतील. आई ! कुलाची कीर्ति वाढ-वण्यासाठीं मुलींचा जन्म आहे. त्यांच्या जगण्यानं कुलाला कलंक लागत असला तर त्यांनीं कशाला जगावं ? आई !

**सावित्री**: बाळ ! आज तूं हें काय मांडलं आहेस ! ज्या मुलीला प्रेमानं दूध पाजून मी वाढविलं, त्या मुलीला या शिशींतलें मी थेंब कसें देऊं ? ज्या हाताच्या कुरवाळण्यानं तुझी चित्तवृत्ति तल्लीन होते त्याच हातानं तुझ्या घशांत हें औषध मी कसं ओतूं ?

**तारा**: आई ! प्रेमालाही कांहीं सीमा आहे. विवक्षित मर्यादेपर्यंतच प्रेम करणं शोभतं. यावेळीं अपत्यप्रेमाच्या सगळ्या भावना नाहींशा केल्या पाहिजेत. आई !

**सावित्री:**- बाळ ! ज्या देवीमातेनं तुझ्या अंतःकरणाची इतकी तयारी केली तीच मलाही सुबुद्धि देईल. बाळ ! आण ती शिशी ( तारा आईला शिशी देते. शिशी हातांत घेऊन ) जीवाला मुक्त करणाऱ्या दिव्य औषधा ! तारेच्या जीवाला तुझ्या स्वाधीन मी करणार नाहीं. प्राणावरील सर्व मोह तारेनं सोडला आहे. ज्यांना मोह उरला नाहीं त्यांना तुझी गरज कशाला ? बाळ ! ही औषधी तुला देण्यापूर्वीं, ती कशी आहे हें मी पाहतें व तुला गरज लागल्यास तूं स्वतःच घे ! माझा हात हें औषध तुला देण्याला धजत नाहीं.

**तारा:**—आई ! तुझा हात धजत नसला तर मीच तें घेतें. तुझ्या मृत्यूनं कुलाचा कलंक नाहींसा होणार नाहीं. या कुलाची कीर्ति राखायला मलाच भोग दिला पाहिजे. आण ती शिशी ! ( शिशी ओढून घेते व तोंडास लावणार तोंच राणोजीराव प्रवेश करतो. हातांतली शिशी पडते. )

**राणोजी:**—आईसाहेब ! हें काय ? ही शिशी कसली ? हें तर जालीम विष आहे ! इथं तें कशाला ?

**सावित्री:**—राणोजीराव ! सध्यांच्या परिस्थितींत आम्हीं स्त्रीयांनीं जिवंत राह-ण्यापेक्षां मृत्यूला वश होण्यांतच जास्त भूषण आहे !

**तारा:**—जिवंत राहून आदिलशाहीच्या देशद्रोही सरदाराची अर्धांगी होण्या-पेक्षां किंवा एखाद्या विधर्मीय सरदाराच्या जनानखान्यांत पडण्यापेक्षां मृत्यू काय वाईट ?

**राणोजी:**-मानाजीराव यावेळीं नाहींत अशी संधी पाहून मी मुद्दाम आलों आहें. व त्याचं कारण इतकंच कीं आपणा सर्वांना गडावर घेऊन जावं. ताराबाई ! आईसाहेब ! आपण मजबरोबर चला. तिथं गेल्यावर आपणाकडे वर डोळा करून पाहण्याची कोणाची ताकद आहे ? आपल्याकडे वांकडी नजर करून पाहणाऱ्यांचा डोळा तिथल्यातिथं फोडला जाईल !

**सावित्री:**—आपली सल्ला कितीही उत्तम असली तरी ती आम्हाला स्वीकारतां येत नाहीं.

**तारा:** कुमारिकांनीं पित्याच्या पश्चात दुसरीकडे जाण्यानं कुलाला कलंक लागतो.

**राणोजी:**-मला अशी बातमी लागली आहे कीं, मानाजीराव आपल्यासह विजापुराला जाणार आहेत. तेव्हां संकटांत पडल्यावर आपल्या सुटकेची तजवीज

करण्यापेक्षां त्याच्या अगोदरच आपणाला येथून सुरक्षित स्थळीं ठेवणं जास्त बरं नाहीं काय ?

**तारा**:-व्यवहारीला तें युक्त असेल, पण पित्याच्या पश्चात या घरांतून आह्मी कुठेंही जणार नाहीं. राणोजीराव ! आपला शब्द मोडणं माझ्या जिवावर येतं. पण त्याबरोबरच पित्याचा विश्वासघात मी कसा करूं ? आमचं कांहीं झालं तरी हरकत नाहीं पण बाबांचं मन मी दुखविणार नाहीं. माझ्या मनस्थितीची खरी जाणीव आपणास आहेच. आईला तसंच मला क्षमा करा. राणोजीराव ! यावेळीं इथं फार वेळ राहाण्यांत देखील धोका आहे. राणोजीराव ! आमच्याविषयीं ज्या आपलेपणानं आपण इथं आलांत त्याच आपलेपणाच्या जाणीवेनं आपण आतां इथून लवकर जा. आमचं काय व्हावयाचं असेल तें होईल.

**राणोजी**:-ताराबाई ! असं कसं म्हणतां ? गोमातेच्या रक्षणासाठीं जसं महाराजांनीं व्रत घेतलं आहे तसंच स्त्रियांचं रक्षण करण्याचं देखील त्यांनीं व्रत घेतलं आहे. जाणूनबुजून मी आपणाला संकटांत पडूं देणार नाहीं. मानाजीराव येई-पावेतों मी इथंच राहातों. व काय तो निकाल करून घेतों.

**सावित्री**:-राणोजीराव ! आपणाला कांहीं सांगावं असं नाहीं ! पण काळ कुणाला सांगून येत नाहीं. आपण यावेळीं इथून जाण्यांत आमचं कल्याण आहे. आपली आम्हाला मदत आहे या आशेवर आम्हीं महान संकटाला देखील तोंड देऊं. येथून निघण्याच्या वेळेची आपणाला मी माहिती देईन. मग तर झालं ना ?

**तारा**:-राणोजीराव ! आपणाला, इथून यावेळीं जा म्हणण्याशिवाय गत्यंतरच नाहीं. आपण आमचे आधार आहांत याची मला जाणीव आहे. यावेळीं बाबा इथं आले तर घरांत रक्तपात होईल. यावेळचा रक्तपात आपण माझ्यासाठीं थांबविणार नाहीं का ?

**राणोजी**:-रक्तपाताला मुद्दाम प्रोत्साहन देण्याची महाराजांची मनाई आहे, पण रक्तपाताच्या भीतीनं अंगिकारिलेलं कार्य सोडायचं नाहीं, ही देखील त्यांचीच आज्ञा आहे. आईसाहेब ! ताराबाई ! या स्थितींत आपणाला टाकून जाणं मला जड वाटतं; पण आपण निघतांच मला कळविण्याचं कबूल केलं असल्यानं मी आपली रजा घेतों. पण त्या पूर्वी माझी एक विनंती आहे.

**तारा**:-कोणती ती ?

**राणोजी**:-वाटेल तसा प्रसंग आला तरी परमेश्वरावर निष्ठा ठेवून आपण दोघींनींही आपल्या प्राणाचं बरं वाईट करून घेऊं नये.

**तारा**:-आपल्यासारखे शूर आमच्या सहायाला तयार असल्यावर आम्ही कसल्याही संकटाला भिणार नाहीं.

**राणोजी**:-आईसाहेब ! ताराबाई ! घेतों आपली रजा ! ( जातो )

**तारा**:-आई ! देवानं ऐकलं म्हणायचं ! मला आतां असंच वाटूं लागलं आहे कीं सर्व कांहीं आतां तुझ्या मनासारखं होईल !

**सावित्री**:-मला देखील तसंच वाटतं. ( मानाजीराव प्रवेश करतो. )

**मानाजी**:-तारे ! कुठं आहे तो राजद्रोही ! तो इथं आला असं कळताच मी त्याच्या मागोमाग आलों. सांग कुठं आहे तो पाजी !

**तारा**:-कोण ते !

**मानाजी**:-श्रमिष्ट कुठली ! जसं कांहीं तुला माहीतच नाहीं !

**सावित्री**:-पण नांव सांगितल्याशिवाय कोण तें कसं कळणार !

**मानाजी**:-तो तुमचा भावी जांवई ! ज्याची तुम्ही री ओढतां तो राजद्रोही कारटा राणोजी !

**तारा**:-राणोजीराव इथं आले होते पण ते आताच निघून गेले.

**मानाजी**:-काय ? इथं आले होते नि आतांच गेले ! कारटे ! त्या राजद्रोही माणसाला तूं घरांत कसं येऊं दिलंस ?

**सावित्री**:-पोरीला असं म्हटलेलं मला खपणार नाहीं—

**मानाजी**-माझ्या घरांत राजद्रोही माणसं आणून असा धिंगाणा तुम्ही घालणं हेंही मला खपणार नाहीं. बस्स ठरलं ! या गांवांत राहाणं आतां धोक्याचं आहे. हा गांव आतां राजद्रोही लोकांच्या ताब्यांत गेला आहे. राजभक्तांनीं अशा विषारी हवेंत राहाणं कामाचं नाहीं. आताच्या आतां विजापुराला जायला निघालं पाहिजे. या गांवांत पाणी पिण्यानं देखील माझ्या राजनिष्ठेला कलंक लागेल. चला ! आतांच्या आतां लागा तयारीला.

[ पडदा ड्राप ]

## अंक तिसरा समाप्त

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

( स्थळः—जंगल. राणोजी, संपतराव व खुशालराव. )

**संपतरावः**-राणोजीराव ! आपली मदत योग्य वेळीं मिळाली नसती तर मला स्वातंत्र्याच्या वातावरणांत प्रवेश करायला मिळाला नसता शिवाजी महाराजांचा व आमचा मार्ग भिन्न असूनसुद्धां आपण आपला प्राण संकटांत टाकून आमच्या सुटकेच्या प्रयत्नाला लागला हें विशेष आहे. आपल्या थोड्याशा परिचयानं आबासाहेबांविषयीं माझा गैरसमज दूर झाला आहे. आबासाहेबांची व माझी प्रत्यक्ष भेट झाल्यानंतर मला वाटतं माझं खचित परिवर्तन होईल !

**राणोजीः**-हा सर्व प्रताप आपले मित्र खुशालराव यांचा आहे. मला वाईट इतकंच वाटतं कीं, आपणासारख्या अनुभवी सरदारांच्या इच्छेला मान देऊन राजभक्तांच्या यादींत माझं नांव घालण्याचं मला आश्वासन देतां आलं नाहीं. प्रत्येकानं राजभक्त असणं हा धर्म आहे. पण आदिलशाहीचे दरबारी अधिकारी जेव्हां आपला धर्म विसरतात तेव्हां प्रजेनं आपला धर्म पाळला पाहिजे असं कसं संभवेल? अधिकारी वा राजा आणि प्रजा यांचं अ॑ नातं आहे असं आमचे महाराज सांगतात. महाराजासंबंधीं आपल्या अंतःकरणांतील गैरसमज दूर झाला याबद्दल आपल्या थोरपणाची जेवढी स्तुति करावी तेवढी थोडीच आहे.

**खुशालः**-खरं पाहिलं तर राजभक्त ह्मणविणाऱ्या आह्मा सरदारांना स्वातंत्र्य नको आहे असं थोडंच आहे. पण असलेल्या परिस्थितींतून कोणताही त्रास न होतां, तसंच स्वतःच्या मानमरातबांत काडीइतकी देखील दखल न होतां, जर स्वातंत्र्य मिळत असेल तर तें हवं. स्वातंत्र्यासाठीं आह्मा राजभक्तांना ! तुरुंगवास, रानावनांत भटकणं किंवा सत्ताधिकाऱ्यांच्या रोषाला पात्र होऊन स्वतःची मिळकत गमावणं नको आहे. या सरदारीच्या, मानाच्या, धनाच्या व विलासाच्या मोहापुढें

खऱ्या स्वातंत्र्याचं सुख काट्याकोऱ्याट्यांत असल्यानं आह्मी राजभक्त याच स्थितींत राहाण्यांत शहाणपणा मानतो. पण राणोजीराव! आबासाहेबांच्याकडे पाहाण्याचा तुमच्या परिचयानं आमचा दृष्टिकोन आतां फिरल्यानं स्वातंत्र्यसुखाची कल्पना आह्मांला येऊं लागली आहे. विलासाच्या साधनांनं भरलेल्या रंगमहलांत, दुसऱ्यांच्या जिवावर, पारतंत्र्यात चैन मारण्यापेक्षां, केवळ जहागिरीच्या लालचीनं पोटची पोर खान सांगतील त्याला देणाऱ्या मानाजीरावाला ताळ्यावर आणण्याच्या कार्यांत, स्वतंत्रपणं या जंगलांत पाळत ठेवण्यांत मिळणाऱ्या आनंदाची कल्पना अनुभवाशिवाय कुणाला देखील होणार नाहीं!

**राणोजीः**-ही पलीकडे दिसते तीच उताऱ्याची जागा. मानाजीरावांबरोबर फारच थोडे लोक आहेत व तेही मी सांगितले तसेच आहेत. ठरल्याप्रमाणं आतां तावडतोब कार्याला सुरवात केली पाहिजे. (जातात)

(स्थळः-जंगलातील उतारा-मानाजीराव, तारा, सावित्री)

**मानाजीः**-सुटलों एकदाचा त्या रानवट रांगड्यांच्या कचाट्यांतून! आतां या विजापूरच्या हद्दींत या मानाजीरावासमोर वर डोळा करून पहाण्याची कुणाची ताकद आहे! (सावित्रीकडे पाहून) हे पहा? तुला इतकं काहीं वाईट वाटायचं कारण नाहीं. खानसाहेबाचा व माझा इतका परिचय आहे कीं, आपण एकाएकीं त्यांच्याकडे गेल्यावर त्यांना फारच आनंद होईल!

**सावित्रीः**-मला नका सांगू त्या खानाची स्तुतिस्तोत्रं. परदास्यांत भूषण मानणाऱ्यानांच असं बोलणं शोभतं!

**मानाजीः**-तारे! आज काल तुझ्या आईचं डोकं थोडं फिरलं असं तुला नाहीं का वाटत?

**ताराः**-बाबा! मी काय सांगूं!

**मानाजीः**-मला वाटतं आईचा रोग मुलीलादेखील लागला-पण चिंता नाहीं. आतां आपण विजापूरच्या हद्दींत आहोंत. इथलं वातावरण तुह्मां दोघींचं डोकं तावडतोब ताळ्यावर आणील.

**सावित्रीः** देवाच्या मनांत असेल तसं होईल.

**मानाजीः**-खुळी कुठली? तो दगडाचा देव काय करतो? या पृथ्वीवरचे देव ह्मणजे आम्ही सरदार. आम्ही राजसत्तेचे आधारस्तंभ असल्यानं देवाला कल्पना

# जुन्या मोटारी--स्वस्त

व

# नव्या उधार--हप्त्यानें

मिळण्याचें एकच ठिकाण—

## भा. दी. गरवारे

मॅनेजर

डेक्कन मोटार एजन्सी
माधवाश्रमा समोर
मुंबई नं. ४

# रोल्डगोल्ड सोन्याचे काळे न होणारे दागिने

खमीस बटणें, रु. ३, चंद्रहार रु. ५, सरी रु. ५ ठुशी रु. ८, वज्रटीका रु. ५, नथ मोत्याची रु. ६, आंगठी रु. १, पाटल्या जोडी रु. २॥, गोट जोडी रु. २॥ सल्ले जोडी रु. २, कुडी मोत्यांची रु. ३ घड्याळाचा छडा रु. ३, रिस्टवॉचचा पट्टा रु. ४,,

**केस काळे करण्याचा साबण**

यानें केस काळे होऊन कायम रहातात, तीन वड्यांचें बॉक्स रु. १॥

**इमिटेशन मोतीं.**

ही मोती हुबेहुब खऱ्या प्रमाणें असून टिकाऊ व जड आहेत. नथींसाठीं ८५ मोत्यांचा सर रु. ३, कुड्यांसासाठीं १०० मोत्यांचा सर रु. ४.

पत्ता—**मगनलाल के. आणि कंपनी.**

अमृतवाडी गिरगांव, मुंबई, नं. ४

## भीखा कल्याणजीच्या कंपनीची

# जग प्रसिद्ध औषधें वापरा.

**इयरारक्षी**

डॉक्टर व सरजन यांच्या उपचारानें कानांतून वाहणारा पू बंद न झाल्यानें मुलांना फार दुःख होतें व शेवटीं ती बहिरीं होतात. दुःखी बालकांना बोलता येत नसल्यानें ती रडून रडून आकांत करितात अशाबालकांचें दुःख नाहींसें व्हावें व या रोगांतून आपाल्या बालकांचा बचाव व्हावा असें पालकांना वाटत असल्यास खालीं लिहीलेल्या औषधीचा त्यांनीं उपयोग करावा.

हें औषध वनस्पतीचें असून दोन तऱ्हेच्या भुकटया (पावडर) आहेत. औषधी बरोबर कान धुण्याची पिचकारीही असते. कान धुतल्यावर कानांत घालण्याला औषधाचा उपयोग करावा. औषध कसें वापरावें याची माहिती बाटलीवर लिहली आहे. **तिन्ही वस्तूंची किंमत दोन रुपये.**

**फायदा न झाल्यास पैसे परत.**

**भीखा कल्याणजीची कंपनी**-शेख मेमनस्ट्रीट—मुंबई नं. २

सुचणार नाहीं अशा गोष्टी देखील आम्ही सहज लिलेनं करूं शकतो. आम्हा सर-दारांची इच्छा, आह्मा अधिकाऱ्यांची लहर, हाच धर्म व हाच कायदा. आम्ही मनांत आणं तें करूं. बावळट कुठली! म्हणे देवाच्या मनांत असेल तसं होईल! त्या दगडाच्या देवाची इतकी स्तुति करतेस त्याच्याऐवजीं खानसाहेबाची, आम्हा सरदा-रांची थोडी जर तुह्मी मनधरणी केलीत तर स्वर्गाचं सुख देखील आम्ही सहज देऊं शकूं. आम्ही सरदार म्हणजेच राजे, इतकंच नाहीं पण स्वर्गातील देवाची बरोबरी करणारे पृथ्वीवरील देव.

**सावित्री**:-मला नको तें स्वर्ग सुख नि नको त्या अविंधाची स्तुति करणं. आपण करता आहांतच त्यांतच आनंद माना झालं !

**तारा**:-बाबा ! आतां बराच वेळ झाला, झोंपायचं नाहीं का ? आज किती तरी दिवस तुह्माला झोंप नाहीं. अशानं प्रकृति बरी रहाणार नाहीं.

**मानाजी**:-आज पावेतों मी त्या रानवटाच्या शिपायांच्या जाळ्यांत अडकलों होतों. आतां त्याच्या हद्दीबाहेर आल्यानं पुष्कळ हुशारा वाटूं लागली आहे. चला आपण सर्वच झोंपूं ( गडी धांवत येतो )

---

**मानाजी**:-अरे—आ—आ—आ काय ?

**रामा**:-सर—कार—चो—चो—र—र--शि-शि-शि-पायी-डा डा-का-

**मानाजी**:-काय ? चोर ! डाकेखोर. अरे एवढा घाबरतो कशाला ? आतां या मानाजीरावाकडे पाहाण्याची देखील कुणाची छातों नाहीं. ( संपतराव व खुशाल-राव मुसलमानी वेषांत येतात ) तुम कौन हय !

**संपतराव**:-हम् चोर हय. डाके खोर हय. आपकी धनदौलत हमकूं होना नहीं. वो दो औरतको हमारे सुपुर्त कर देंगे तो ठीक. नहीं ता जान खोयेगे.

**मानाजी**:-हरामखोरांनो ! मी कोण आहे हें विसरलांत वाटत. मी मानाजीराव आहे. खानसाहेबांचा मी जिगर दोस्त आहे. तुम्हाला जीव प्यारा असला तर आलांत तसं परत जा नाहींतर जन्मभर तुरुंगांत खितपत पडावं लागेल.

**खुशाल**:-बहोत बकबक नहीं करना ( तारा व सावित्री यांच्याकडे जाऊं लागतात. मानाजीरावाची व त्यांची झोंबा झोंबी होते. संपतराव तारेला धरा-यला जातो. खुशालराव मानाजीला धरून ठेवतो. इतक्यांत राणोजीराव कांहीं माव-ळ्यांसह हिंदू साधूच्या वेषांत येतो. संपतराव व खुशालराव यांना बांधतात )

**राणोजीः**—सरदार मानाजीराव ! या जंगलांतून पुढं जाणं फारच धोक्याचं आहे. जवळच आमची झोंपडी आहे तिथं आपण रहावं. उद्ईक जेवणखाण झाल्यावर आपणाला जायचं असेल तिकडं आम्ही कांहीं माणसं सोबत देऊन आपली रवानगी करूं ( साथीदारांना उद्देशून ) या चोरांना देखील घेऊन चला.

**मानाजीः** साधुमहाराज ! आपण वळेवर आलां नसतां तर प्रसंग कठीण होता. आदिलशाहीच्या हद्दींत आल्यावर आमच्यावर असा प्रसंग येईल अशी आम्हाला स्वप्नांत देखील कल्पना नव्हती. असो. आपला शब्द मोडणं शक्यच नाहीं पण, महाराज, आमच्यासारख्या संसारी लोकांच्या तापापासून आपण अलिप्त राहात असल्यानं आपल्याला त्रास देणं कससंच वाटतं !

**राणोजीः**—हा प्रसंग असा आहे कीं यावेळीं संसारी व साधू यांनीं एक झालं पाहिजे. बेकींत दोघांचंही अकल्याण आहे. सरदारसाहेब ! इथं लुटारूंचा इतका त्रास आहे कीं प्रत्येक क्षण धोक्याचा आहे. शिवाय आपणाजवळ माणसांची कुमक देखील नाहीं. ज्या खानसाहेबांच्या भरंवशावर आपण आहांत त्या खानसाहेबांना हे लुटारु कवडीची देखील किंमत देत नाहींत. लुटारु, केव्हांच कुणाची सत्ता मानीत नसतात. सरदारसाहेब ! आईसाहेब चला ! आतां. ( जातात )

---

## प्रवेश २ रा.

( स्थळः—जिवाजीची झोपडी. शिवाजी व तानाजी येतात. )

**शिवाजीः**—तानाजी ! तरुणांचं देशावर इतकं प्रेम असल्यावर व स्वार्थत्यागाची इतकी तयारी असल्यावर देशाला स्वातंत्र्याचे दिवस लवकरच लाभतील असं तुला वाटत नाहीं काय ?

**तानाजीः**—महाराज ! तरुणांच्या उज्वल मनोवृत्तीच्या अशा अनुकूल परिस्थितींत जर स्वातंत्र्यरवीचा उदय झाला नाहीं तर मग होणार तरी केव्हां ? ही उत्साही तरुण मंडळी आपल्या कार्याचे आधार स्थंभ आहेत. स्वातंत्र्यासाठीं त्यांना तळमळ लागली आहे. देशाला स्वातंत्र्य प्राप्त व्हावं, आपण आदिलशाहीच्या दास्यांतून मुक्त होऊन स्वतंत्र व्हावं असं या घटकेला प्रत्येक तरुण जीवाला वाटत आहे. स्वतंत्र होऊं या कल्पनेनं त्यांचं रक्त उसळत आहे. महाराज ! आपल्या सैन्याच्या शिस्तीसाठीं व आपणाला संकटांत घालूं नये म्हणून ज्या

तरुणांची प्राणार्पण करण्याची तयारी, त्यांच्या देशभक्तीची, त्यांच्या स्वामिसेवेची स्तुति करावी तेवढी थोडीच !

**शिवाजीः**–ज्यांनीं अशा शूरपुत्रांना जन्म दिला त्यांच्या दर्शनानं पवित्र होण्याचा आपणाला सुयोग येणार हें आपलं सद्भाग्यच म्हणायचं !

**तानाजीः**–ही दिसते तीच त्यांची झोपडी. ( झोपडीच्या दारावर थाप मारतो. जिवाजी दार उघडतो. )

**जिवाजीः**–कोण, तुम्ही ? इतक्या रात्रीं तुमचं काय काम आहे ?

**तानाजीः**–आम्हीं गडावरून आलों आहोंत. तुमच्या मुलाचा तुम्हाला निरोप कळवायचा आहे.

**जिवाजीः**–आपलं नांव कृपाकरून सांगाल का ? तुम्हाला यावेळीं घरांत घेण्यापूर्वी तुम्ही कोण कुठले याची चौकशी करणं मला भाग आहे.

**तानाजीः**–आम्ही शत्रूपक्षाकडचे नाहीं ही खात्री बाळगा. हें पहा ! गोंगाट होतां उपयोगी नाहीं. कारण पार्वतीबाईसमोर आम्ही कांहीं बोलूं नये असं सुभानरावाचं सांगणं आहे.

**जिवाजीः**–पार्वतीचं हृदय सुभान्याला कळलं नाहीं. आपण आंत यावं. मी आंधळा असल्यानं आपण काय सांगाल तें पार्वतीला मला कळविलंच पाहिजे; कारण, मी आंधळा असल्यानं आज इथलं सर्व काम तिलाच करावं लागतं. पार्वती ! ऊठ पाहूं ! हे दोन गृहस्थ आले आहेत.

**पार्वतीः**–( डोळे चोळीत उठते ) आपण कोण ?

**शिवाजीः**–आम्ही मराठे आहोंत. सुभानरावाचा निरोप सांगायचा आहे. पण तो जिवाजीनांच सांगायचा आहे.

**पार्वतीः**–आपली तशी इच्छा असल्यास तसं करावं. मला त्यांच्याकडून कळलाच पाहिजे. कारण निरोप कळल्यावर पुढं काय काय करायचं याची जोखीम देवानं आज मजवरच टाकली आहे. पाहिजे तर मी बाहेर जाते. आपण त्यांनाच सांगा.

**शिवाजीः**–( स्वगत ) परमेश्वरा ! धन्य आहे तुझ्या लीलेची. स्वतःच्या मातापितरांना अशा स्थितींत ठेवून केवळ जुलमाचा प्रतिकार व्हावा म्हणून मातृसेवा करण्याची ज्या तरुणाच्या मनांत तूं प्रेरणा करतोस त्या तरुणांचं हृदय वृद्ध

मातापित्यांचं कसं होईल या कल्पनेनं देखील दुबळं होत नाहीं. एवढा दृढ निश्चय असल्यावर आणखी काय पाहिजे ? आज महाराष्ट्रांत घरोघर असंच असेल काय ? आणि असं असलं तर या वृद्धांची मी आधीं सोय लावली पाहिजे. ( उघड. तानाजीला उद्देशून ) बाईचं म्हणणंही खरं आहे. तूं सांग निरोप.

**तानाजीः**-पहाऱ्यावर असतांना दोघेही पहारा न करतां झोंपल्यामुळं सध्या ते तुरुंगांत आहेत व पुढें त्यांना कडेलोटाची शिक्षा मिळणार आहे.

**पार्वतीः**-( डोक्यावर हात ठेवून विचारांत बसते. )

**जिवाजीः**-मग मुलांनीं आमच्याकडे तुह्मांला कशाला पाठवलं ?

**शिवाजीः**-ही बातमी कळविण्याठीं !

**पार्वतीः**-आणखी त्यांचा कांहीं निरोप आहे कां ?

**तानाजीः** आणखी ते काय सांगणार ! ते तुरुंगांत आहेत. आपल्या घरच्या माणसांना हकीकत कळली तर आपल्या सुटकेचा ते कांहीं तरी उपाय करतील याच हेतूनं संकटांत सांपडलेले तरुण आपल्या घरीं निरोप पाठवतात.

**पार्वतीः** जनरीत अशीच आहे. पण आमची स्थिति निराळी आहे. मला यांच्यासाठीं इथ राहिलं पाहिजे. मी कांहींच करूं शकणार नाहीं हें माझ्या गणूला व सुभान्याला माहीत आहे.

**शिवाजीः**-आपला कोणीसुद्धां ओळखीचा नाहीं कीं ज्याच्या मर्फत त्यांच्या सुटकेचा आपण प्रयत्न करूं शकाल ?

**जिवाजीः** आमच्या ओळखीचे पुष्कळ लोक आहेत. पण या बाबतींत आह्मांला कुणालाय भांड घालायाची नाहीं. पुत्रलोभामुळं मुलं जिवंत राहावी असं वाटणं साहजिक आह. पण हा लोभ मिथ्या आहे. ज्यांनीं स्वसंतोषानं मातृभूमीची सेवा करण्याचं काम शिरावर घेतलं, त्यांनीं पहारा न करतां झोंप घेणं हें कृत्य चांगलं, असं कोण ह्मणेल ?

**पार्वतीः**-देशाची सेवा करणाऱ्यांनीं काम करतांना कुचराई करून कसं चालेल ?

**शिवाजीः** आमच्या माहितीप्रमाणें ते श्रमानं थकले होते; तेव्हां झोंप येणं हा शरीर धर्म होता. त्यांत त्यांची चूक कसली ? व अशा चुकीला कडेलोटाची शिक्षा हा अन्याय आहे हें तुम्हीं महाराजांच्या नजरेस आणलंत तर महाराज त्याचा विचार करणार नाहींत असं तुह्मांला वाटतं काय ?

**जिवाजी:**-आम्हाला महाराजांना सांगून करायचं आहे काय ? ज्या दिवशीं आमच्या मुलांनीं घर सोडलं त्याच दिवशीं मी त्यांना आशीर्वाद दिला कीं तुम्ही विजयी होऊन या. ते त्यांच्या कर्तव्याला चुकले तेव्हां आम्हीं त्यांचं तोंड कसं पाहावं?

**शिवाजी:**-त्यांच्या जागीं कोणीही असतं तरी असंच झालं असतं. तुम्ही महाराजाना कळवा !

**पार्वती:**--कशासाठीं ! या काम चुकारूं पोरांनीं जिवंत राहावं म्हणून ! असलीं पोरं मेलेलीं काय वाईट ! जर पोरं काळवेळ जाणत नाहींत तर तीं जिवंत तरी कशाला हवींत ! जुलमी मुसलमानांचा चोहीबाजूनं गराडा पडला असतां, जुलमी मुसलमान याच पोरांच्या आयाबहीणीवर हात टाकीत असतांना व त्यांच्या जाचा-तून सुटण्याच्या प्रयत्नांत यांच्याकडे पाहाण्याचं काम असतांना यांना झोंप यावी ? हेंच सिद्ध करतं कीं यांना आपल्या बंधुभगिनींच्या अब्रूची किती किंमत आहे ? अशा वेळीं झोंपलेल्या सर्वांना सुळावर चढवलं पाहिजे. अशा झोंपणाऱ्या पोरांसाठीं महाराजांना आम्हीं विनवावं ? आणि काय सांगावं ? महाराज ! या कृतघ्न पोरांना जिवंत ठेवा !

**शिवाजी:**–हीं मुलं जिवंत राहिली तर झालेल्या चुकीची भरपाई करतील.

**जिवाजी:**–अशा झोंपाळूंच्या हातून काय होणार तें दिसतंच आहे !

**पार्वती:**–" पोराचे पाय पाळण्यांत " तें कांहीं खोटं नाहीं ते शिवाजी महा-राज कुठं झोंपतात ! यांना झोंपायचं होतं तर पहारा यांनीं कां घेतला ? काम घ्यावं नि मग तें करूं नये म्हणजे काय ?

**शिवाजी:**–मग आपला त्यांना काय निरोप आहे ?

**जिवाजी:**–आमचा त्यांना एवढाच निरोप आहे कीं, अशा काम चुकारु पोरां-साठीं महाराजांना आम्हीं विनंति करीत नाहीं चुकीचं प्रायश्चित्त आनंदानं घ्यावं !

**पार्वती:** म्हणजे पुढल्या जन्मांत तरी असले दोष घडणार नाहींत !

**रघू:**–( झोंपेंत ) आजी ! खून ! खून ! आईचा खून !

**शिवाजी:**–हा कोण ?

**पार्वती:**–हा सुभान्याचा मुलगा, याच्या आईचा त्या नीचांनीं खून केला.

**तानाजी:** जिवाजी आपले कोण ?

**पार्वती:**–ते माझे वडील दीर ! रघूच्या आईचा प्राण वाचविण्यासाठीं झालेल्या झटापटींत गणूच्या बापाचा मुसलमानांनीं खून केला. गणू माझा मुलगा, सुभान माझा पुतण्या.

**शिवाजीः**-पार्वतीबाई ! आपलं हृदय खरंच थोर आहे. अशावेळीं पोरा-बाळांच्यां मोहाला बळी न पडणारा विरळाच. आपल्या सारख्या माता महाराष्ट्रांत आहेत म्हणूनच आज शिवाजी महाराजाच्या प्रयत्नाला यश येत आहे.

**पार्वतीः**-हा त्या भवानी मातेचा प्रसाद आहे. ( रघू उठतो )

**रघूः**-आजी ! हे पाहुणे कोण !

**पार्वतीः**-तुझ्या बापाचा निरोप घेऊन गडावरून आले आहेत.

**रघूः**-मग मी जाऊं का त्यांच्याबरोबर बाबांच्या नि काकांच्या भेटीला !

**पार्वतीः**-तूं गेलास तरी बाबा नि काका तुझ्याशीं बोलणार नाहींत त्यांना रडक्या मुलाशीं बोलायचं नाहीं म्हणून तर ते येत नाहींत.

**रघूः** मी रडका ! आजी, मी रडका ! परवां कोण रडत होतं, मी कीं तूं ? मला रडका म्हणतेस, मी माझ्या बाबांची वाट पाहातों आहे. बाबा आले, कीं ज्यानं माझ्या आईचा खून केला त्याचा मी खून करीन.

**शिवाजीः**-पार्वतीबाई ! आम्ही आपल्यासारख्या थोर हृदयाच्या मातेला कांहीं सांगावं असं नाहीं. पण निदान या मुलासाठीं तरी तुम्ही महाराजाच्या दरबारांत यावं.

**पार्वतीः**-उगीच कशाला ! महाराजाच्या राज्यांत केव्हांही अन्याय होणार नाहीं याची आम्हाला खात्री आहे

**रघूः**-मग मला नेणार ना तुम्हीं गडावर !

**तानाजीः**-आजी बरोबर गडावर ये बरं बाळ !

**शिवाजीः** पार्वतीबाई ! या मुलासह आपण दरबारांत या. ही खूण दाखवा. म्हणजे आपणाला कोणीही अडविणार नाहीं. बाळ, येहो, म्हणजे तुझी व तुझ्या बाबांची भेट होइल ! ( जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

( स्थळः-आश्रम, मानाजीराव, सावित्री, तारा वगैरे निजलेले. )

**ताराः** ( उठते, डोळे चोळून ) हें काय ? ते चोर दिसत नाहींत, साधुमहाराज नाहींत व गडीही नाहींत ! रात्रीं सर्वजण इथं होते. हें काय बरं गौडबंगाल आहे ? कोणा भोंदूच्या जाळ्यांत तर नाहींना आह्मी सांपडलों ! इथं राहाणं बरंच धोक्याचं

दिसतय ! बाबांना उठवूं का ? नको ! त्यांना आज बरेच दिवसांत झोंप नाहीं. आईला उठवूं ? नको ! नको ! तिलाही विश्रांतीची जरुर आहे. पण कांहीं बरावाईट प्रसंग आला, तर इथं कोण आहे ? आतां इथं जास्त वळ राहाणंच धोक्याचं आहे. अशा परिस्थितींत बाबांच्या व आईच्या झोंपेचा मोड केल्याशिवाय गत्यं-तरच नाहीं ! पण तें उठून तरी काय करणार ? त्यांच्याजवळ असं कोणतं साधन आहे कीं लुटारुंपासून ते आपला बचाव करूं शकतील ! ज्या परमेश्वरानं आमचं आतांपर्यंत रक्षण केलं तोच पुढं देखील रक्षण करील. देवा ! आमच्यावर अशी आपदा आणण्यांत तुझा काय बरं हेतु असेल ? पण हें कोडं तुझ्याशिवाय कुणाला तरी उकलणं शक्य आहे काय ? पण त्या झाडापलीकडे ते दोघे कोण बरं असावेत ? आतां नाहींच मला राहवत ! केव्हां कसा प्रसंग येईल, कुणी सांगावं ? मी एवढी हिंमतीची पण मला या रानांत पाऊल टाकल्यापासून भीति वाटायला लागली. ते शिवाजी महाराज ! ते राणोजीराव ! ते तानाजीराव, ते सुभानराव यांना एकट जाण्यांत मोठी मौज वाटते आणि मी इथें बाबांच्या बरोबर आहे तरी मला भीति वाटते, आई ! बाबा ! अहो बाबा ! ( मानाजीराव व सावित्री उठतात. )

**मानाजी**:–तारे ! तूंच हांक मारलीसना ? भ्यालीस वाटतं ?

**सावित्री**:–स्वप्नांत कांहीं पाहिलंस वाटतं ?

**तारा**:–बाबा ! तसं कांहीं नाहीं ! इथं कुणीच नाहीं; ते साधुमहाराज देखील नाहींत. नि ते त्या झाडापाशीं दोघेजण गोष्टी करताहेत ! ते कोणी तरी लुटारु असावेत.

**मानाजी**:–तारे काळजी करण्याचं कारण नाहीं. तुह्मी स्वस्थ असा, मी जातों व चौकशी करतों.

**तारा**:–बाबा, मुद्दाम नका जाऊं तिकडे ! ते इकडे आले तर पाहूं !

**सावित्री**:–ते इकडेच येत आहेत !

**मानाजी**:–त्यांच्या पोषाखावरून ते लुटारू नसावेत असं दिसतं.

**तारा**:–पोषाखावरून माणसांची परिक्षा करायची झाली तर ती बरोबर असे-लच असं नाहीं. ( संपतराव व खुशालराव प्रवेश करतात. )

**संपतराव**:-मानाजीराव ! आपण इथं कसे ?

**मानाजी**: ( स्वगत ) वेळ कठीण खरा ! ज्याला मी तळघरांत घातलं तोच हा संपतराव ! पण याच्याशीं वर्दळ घालण्यांत आतां हांशील नाहीं. ( उघड ) मी

इकडे विजापुराला चाललों होतों. रस्त्यांत रात्रीं लुटारूंची गांठ पडली. या आश्रमाच्या महाराजांनीं योग्य वेळीं येऊन आमचे प्राण वांचविले. ते नुकतेच कुठं गेले आहेत. ते आल्यावर त्यांचा निरोप घेऊन जाऊं विजापुराला.

**खुशालराव**:–पण जहागीर गांव सोडून आपण विजापुराला कां जातां ? व आईसाहेबांना आणि ताराबाईंना नेण्याचा हेतु ?

**मानाजी**:–खुशालराव, घरांतल्या गोष्टींची माहिती कुणी कुणाला विचारूंही नये व सांगणाऱ्यांनीं सांगूंही नये !

**संपतराव**:–आपला हेतु माझ्या लक्षांत आलेला आहे. शिवाजी महाराज आपले शत्रू व आदिलशाहीचे खानसाहेब आपले हितकर्ते ही समजूत यांच्या मुळाशीं आहे. आपण, खुशालराव व मी एकाच पंथाचे आहोंत. पण आज आपल्यांत व माझ्यांत पुष्कळ अंतर आहे.

**मानाजी**:–पण आपण इकडे कोणीकडे ?

**खुशालराव**:–विजापुरच्या दरबारांत आपल्याला जाऊं देऊं नये म्हणून !

**मानाजी**: म्हणजे ?

**संपतराव**:–तें कांहीं समजा ! तुम्हीं, आईसाहेब व ताराबाई यांच्या समवेत निघालां हें कळतांच आम्हीं, तुम्हांला तिथं पोहचूं न देण्याचा विचार केला आहे.

**मानाजी**:–माझ्या खानगी कृत्यांत मी मुखत्यार आहे. या उठाठेवी तुम्हांला कशाला ?

**खुशालराव**:–तुमचं म्हणणं जरी खरं असलं तरी ज्या जातींत तुम्हीं जन्माला आलांत, ज्या समाजाचे तुम्हीं घटक आहांत त्या जातीला, त्या समाजाला तुमच्या वर्तनाला आळा घालण्याचा हक्क आहे.

**मानाजी**:–मला जातीची पर्वा नाहीं ! मला समाजाची पर्वा नाहीं !

**संपतराव**:–तुम्हाला नसेल. पण आम्हाला तुमची पर्वा आहे ना ?

**मानाजी**:–संपतराव ! खुशालराव ! आपणांला जिकडं जायचं असेल तिकडं जा; तुमचा मार्ग व माझा मार्ग भिन्न आहे.

**खुशालराव**: मानाजीराव ! बोलतो त्याचा राग मानूं नका ! आम्ही जे आपल्या पाळतीवर आहोंत त्याचं मुख्य कारण ताराबाईंचा विवाह. ताराबाईंचा आपण राणोजीरावाबरोबर विवाह लावून द्या. मग आपण विजापुराला जा किंवा काशी यात्रेला जा, आम्ही तुमच्या आड येणार नाहीं.

**मानाजी**:-लग्नाच्या बाबतींत मला तुमचा सल्ला नको आहे.

**संपत**:-प्रसंग असा आहे कीं ज्या संपतरावाला आपण तळघर दाखवलं त्या संपतरावाच्या इच्छेप्रमाणं तुम्हाला वागावं लागणार आहे. आपण आमच्या इच्छेला मान देऊन आम्हीं म्हणतो तसं केलं नाहीं, तर तुमच्या इच्छेविरुद्ध आम्हाला कांहीं गोष्टी कराव्या लागतील.

**मानाजी**:-मी तुमचं या बाबतींत मुळींच ऐकणार नाहीं. राजद्रोही राणोजी-बरोबर माझ्या मुलीचा विवाह कधींही शक्य नाहीं !

**खुशाल**:-अशक्य कोटींतल्या गोष्टी शक्यतच्या आटोक्यांत या काळांत येऊं शकतात. हा नवाकाळ आहे !

**संपत**:-शिवाजी महाराजांच्या सद्दीचा असा जोर आहे कीं मी मी म्हण-विणारे त्यांच्या पायाशीं लोटांगण घालतात. मानाजीराव झाला एवढा हट्ट; केली एवढी राजभक्ति बस्स झाली. आम्ही आपल्याला विनयानं सुचवितों कीं राणोजी रावाबरोबर ताराबाईचा विवाह लावून आपण शिवाजीमहाराजांच्या कृपेला पात्र व्हा !

**मानाजी**:-त्या लुटारू पुंडाला शरण जाऊन त्याची कृपा मागण्याऐवजीं मी मरण पत्करीन. पण आदिलशाहीशीं बेइमान होणार नाहीं.

**संपत**:-आईसाहेब ! ताराबाई ! माफ करा. धर्मसंकट टाळण्यासाठीं नाइलाज म्हणून कांहीं गोष्टी कराव्या लागतात. आपण आमच्या बरोबर चला. मानाजी-रावांना त्यांच्या इच्छे प्रमाणें वागूं द्या ! आईसाहेब ! ताराबाई माझी धाकटी बहीण आहे. तिचा भावी संसार सुखाचा कसा होईल याची मला काळजी घेतली पाहिजे !

**सावित्री**:-आपल्या थोरपणाबद्दल मी आपली कशी उतराई होऊं ? पण पतीला सोडून पत्नीनं राहणं याला आपण धर्म म्हणाल काय ?

**तारा**: बापाला संकटांत टाकून आपल्यासुखाची तजवीज करणं हा आर्य-कुमारिकांचा धर्म कसा असूं शकेल ? दादासाहेब ! मी पदर पसरते ! माझं कांहीं झालं तरी चालेल. पण बाबांना माझ्यासाठीं आपण दुखवूं नका !

**खुशाल**:-ताराबाई ! धर्मसंकट आलं असता, आई, बाप, बहीण, भाऊ हे संबंध सोडावे लागतात.

**मानाजी**:-धर्माच्या नांवाखालीं दुसऱ्यांवर जुलूम करणाऱ्या शिवाजीला मिळून आपण काय दिवे लावणार तें दिसतच आहे ! संपतराव ! खुशालराव ! माझ्य

देहांत प्राण असेपावेतों माझ्या मुलीचं लग्न मी खानसाहेबांच्या इच्छेप्रमाणं करीन. मी बिकट परिस्थितींत सापडलों तरी आपल्या निश्चयापासून रतिइतका देखील ढळणार नाहीं. माझी तारा खान सांगतील त्यालाच मी देणार. माझ्या राजनिष्ठेची खरी कसोटी याच वेळीं आहे !

**सावित्री**:–जळली तुमची राजनिष्ठा ! माझी तारा मी राणोजीलाच देईन !

**संपत**:–तारा राणोजीलाच दिली पाहिजे !

**तारा**:–आई ! दादासाहेब ! मी एकदा सांगितलं ना कीं बाबांना आपण दुखवूं नका ! [ पतीत पावन सीताराम ! जानकी जीवन राजाराम ! असा शब्द ऐकूं दतो]

**मानाजी**:–महाराज आले वाटतं !

**संपत**:–हे महाराज कोण ?

**मानाजी**:–काल ज्यांनीं आमचे प्राण वांचविले ते !

**खुशाल**: आपल्या मदतीला खान नाहीं आले ते ?

**मानाजी**:–खान देखील येतील !

**संपत**:–मला वाटतं ताराबाईच्या विवाहासंबंधींचा तंटा साधूमहाराजांनींच तोडावा. [ राणोजी साधू वेषात प्रवेश करतो, सर्वजण नमस्कार करतात - सीताराम ]

**राणोजी**:–मानाजीराव हे पाहुणे कोण ?

**मानाजी**:–आमच्याच गांवचे आहेत. पण संध्या त्यांनीं निराळा पंथ स्वीकारला आहे.

**राणोजी**:–म्हणजे ?

**संपत**:–महाराज ! मीच सांगतो. मानाजीराव, मी व खुशालराव आम्ही सर्वजण आदिलशाहीच ( राणोजी- सीताराम ) राजभक्त सरदार. आम्हा सर्वांचा उद्देश एकच कीं शिवाजी महाराजांने पाय मागें ओढावेत. ( राणोजी–सीताराम ! ) कारण शिवाजीमहाराजांच्या प्रभावापुढें आम्हा सरदारांचं तेज लोपूं लागलं. या उद्देशाच्या सिद्धीसाठीं शिवाजी महाराजांच्या रणशूर राणोजीरावाला ताराबाईच्या प्राप्तीची लालूच दाखवून शिवाजी महाराजांकडून फोडण्याचा आम्ही व्यूह रचला; पण त्यांत आम्हांला यश आलं नाहीं. उलट मी व खुशालराव महाराजांच्या पक्षांत सामील झालों. पण आमचे मानाजीराव शंभर नंबरी राजभक्त असल्यानं ते खानसाहेबांकडे जात आहत ( राणोजी-सीताराम ) इतकंच नाहीं पण खानसाहेब सांगतील त्याला आपली कन्या दणार आहत. ( राणोजी–सीताराम ) आईसाहेबांची व

आमची दोघांची त्याला हरकत आहे. राणोजीरावानं ताराबाईला अविंधाच्या अत्याचारापासून सोडविलं म्हणून ताराबाईचा राणोजीरावांबरोबर विवाह व्हावा, असं आमचं म्हणणं आहे. पण जहागीर जप्त होईल या भीतीनं मानाजीराव, शिवाजीमहाराजांच्या रणशूर शिपायाला आपली मुलगी देण्याला तयार नाहींत. जहागिरीपुढं त्यांना स्वतःच्या कीर्तीची, अब्रूची, मानापमानाची, देशाची, धर्माची कशाचीच किंमत नाहीं. ( राणोजी–सीताराम ! सीताराम ! ) वाटेल तें झालं तरी ताराबाईचा विवाह खानसाहेब सांगतील त्याच्याबरोबर आम्ही होऊं देणार नाहीं. मी म्हणतो यांत एक अक्षर खोटं असेल तर मानाजीरावांनीं सांगावं ? ( राणोजी सीताराम )

**राणोजी:**–" लग्न "–मानाजीरावांच्या मुलींच त्यांत तिऱ्हाइतांनीं पडूं नये !

**मानाजी:**–महाराज ! आपण अगदीं बरोबर सांगितलं ! सतपुरुषांची गोष्ट कांहीं निराळीच असते !

**खुशालराव:**–पण एखादा मुलीचा बाप धर्माची पर्वा न करता आपली मुलगी मुसलमानाला देऊं लागला तर मग आम्हीं स्वस्थ बसावं ?

**राणोजी:**–ज्याला स्वतःला आपलं घर संभाळतां येत नाहीं, त्यानं दुसऱ्याला उपदेश करणं हें धाडस नाहीं कां ?

**संपतराव:**–साधू महाराज ! मनुष्याला समजलं नाहीं व त्याच्या हातून त्यांच्या गैरसमजूतीनं कांहीं गुन्हा घडला तर क्षम्य आहे; पण जाणून बुजून गुन्हा करणं चांगलं असा कां आपल्या म्हणण्याचा अर्थ आहे ?

**राणोजी:**–जों पावेतों एखाद्याची समजूत आपणाला घालतां आली नाहीं तों पावेतों त्याला दोष देण्यापेक्षां आपल्या अंगीं जास्त योग्यता आणणं बरं! मानाजीराव, खानसाहेब सांगतील त्याला आपली मुलगी देणारा तयार आहेत, याचा संपतराव ! आपण असा सरळ अर्थ कां करीत नाहीं कीं हिंदूंना आपल्या जातींतील लोकांच्या सुरक्षितपणाची हमी देतां येत नाहीं. मानाजीराव खानसाहेबांची री ओढतात तें त्यांचं खानसाहेबांवर प्रेम आहे म्हणून खात्रीनं नाहीं. ज्या सत्तेचे खानसाहेब प्रतिनिधि आहेत तीच सत्ता यावेळीं त्यांचं रक्षण करण्यास समर्थ आहे असा त्यांचा दृढ विश्वास आहे म्हणून ?

**मानाजी:**–साधुमहाराज ! आपल्यासारख्या सत्पुरुषाला कळणार नाहीं अशी कोणती गोष्ट आहे ?

**संपतराव:**–पण महाराज ! स्वतःच्या सुखापेक्षां, धर्माची देशाची व कुलाच्या अब्रूची किंमत जास्त नाहीं का ?

**राणोजी**:-खात्रीनं आहे! पण धर्मासाठीं, वा देशासाठीं त्यागी बनलेल्या लोक नायकांना जर आपलीं तत्वं लोकांना पटवून तीं त्यांच्याकडून आचरणांत आणवितां आलीं नाहींत तर तो दोष जनतेचा नाहीं. त्या धर्मभक्तांचा किंवा देशभक्तांचा तो दोष आहे. " पांचामुखीं परमेश्वर " मला एकं गोष्ट चांगली वाटली व ती जनतेला मला पटवितां आली नाहीं तर तो दोष माझा! सत्य जनतेला जर पटलं नाहीं तर तें सत्य कसलं? हिरा तो हिराच! गारगोटीला सुंदर पैलूदार बनविली तरी हिरकणीची ती कधीं तरी सर करील काय?

**मानाजी**:-साधुसंताची वाणी अक्षुट म्हणतात हेंच खरं! महाराज! आम्हीं संसारी माणसांनीं आपणाला त्रास देऊं नये हें खरं असलं तरी आम्हां संसारी जनांचीं संकटं आपणासारखेंच संत महात्मे दूर करूं शकतात. ज्ञानसाहेबाची मी री कां ओढतों याची उपपत्ती आपण बरोबर लावलीत. या संकटांतून निघण्याला कांहीं मार्ग नाहीं का?

**राणोजी**:-" आंधळ्याची जन सारेची आंधळें " तशी भित्र्या लोकांची स्थिति झाली आहे. मेंढरांत राहिलेला वाघ संगतीनं जरी मेंढरासारखा वागत होता, तरी त्याला स्वतःची ओळख पटल्यावर तो खरा वाघ बनला ना? आपणांवर आलेलं संकट दुसरा कोणी येऊन दूर करील ही भावना म्हणजे दास्य. जे पारतंत्र्याच्या पंकांत आज लोळत आहेत ते सर्वजण कांहीं बंदिखान्यांत नाहींत. स्वतःच्या राजमहालांत, विलासांत आहेत. पण स्वतःचं रक्षण करण्याचं सामर्थ्य मात्र त्यांच्यांत नाहीं. मानाजीराव! आपल्या प्रश्नांचं उत्तर आपल्याजवळ आहे. मी स्वतंत्र आहे, मी सामर्थ्यवान् आहे असा विश्वास स्वतःच्या ठिकाणीं आपण ठेवला म्हणजे आपण आपल्या धर्माची, देशाची व कुळाची सर्वोत्तम सेवा सहज करूं शकाल.

**संपतराव**:-( स्वगत ) राणोजीराव जसा रणशूर तसाच बुद्धिवान् आणि चतुर देखील आहे. ( उघड ) पण, महाराज! आपण सांगतां तें सर्व आम्हांला समजलं! अगदीं बरोबर समजलं तरी देखील आम्ही त्याप्रमाणं वागत नाहीं, ही सूर्य प्रकाशाइतकी सत्य गोष्ट आहे.

**खुशालराव**: संपतरावाप्रमाणेंच माझाही अनुभव आहे. तेव्हां त्याला उपाय काय!

**मानाजीः**-माझी देखील तीच शंका आहे.

**राणोजीः**-मला अमकं समजलं असं जो ह्मणूं लागला कीं असं नक्की समजावं कीं त्याला कांहीं कळलं नाहीं. आपलं अज्ञान लोकांच्या नजरेला येऊं नये म्हणून तो सगळं समजलं असं जाहीर करण्यांतच धन्यता मानतो. पण स्थिति निराळी असते साखरेची गोडी कळल्यानंतर जसा दुसरा कोणताच पदार्थ गोड लागणं शक्य नाहीं, तसं मी स्वतंत्र आहे, मी सामर्थ्यवान् आहे, ही भावना पटल्या नंतर भीति, ही कल्पना देखील त्या शूराला शिवत नाहीं.

**मानाजीः**-आपल्या अल्प परिचयानं कितीतरी नवीन गोष्टी कळल्या !

**राणोजीः**-आणखी थोड्या वेळानं आपणाला कल्पना होणार नाहीं असं दृश्य दिसणार आहे. मी तत्ववेत्ता नाहीं, पंडीत नाहीं किंवा ज्योतिषीही नाहीं. या आमच्या आश्रमावर शिवाजीमहाराजांची कृपा आहे. आपण आमच्या झोंपडींत आलांत तेव्हां आपल्यासारख्या सरदारांचा सत्कार करायला महाराजासारखंच कुणीतरी असायला पाहिजे. आपण आला ही हकीकत महाराजांना सकाळींच आम्हीं कळविली महाराजांना अतिशय आनंद झाला आहे व आताच आपल्या भेटीला ते येणार आहेत असा मला त्यांचा संदेश देखील आला आहे.

**मानाजीः**-काय शिवाजीमहाराज येथें येणार ?

**संपतः**-हा योगायोग विलक्षण तर खराच !

**खुशालः**-लोकोत्तर माणसांचं सर्वच कांहीं विलक्षण असतं !

**मानाजीः**-पण महाराज ! शिवाजी महाराजासमोर यावेळीं-

**राणोजीः**-आपण कोणत्याही प्रकारचा संकोच ठेवूं नका. महाराजासंबंधीं आपल्या ज्या कांहीं कल्पना असतील त्या सर्व आदिलशाहीच्या सरदारांकडून कळलेल्या हकीकतीवरूनच आपण ठरविल्या आहेत हें मला ठाऊक आहे. गोमातेसाठीं, जनतेसाठीं, व मातृभूमीसाठीं प्राणार्पण करण्यास तयार असलेल्या मातृभक्तांना, स्वतःची सत्ता टिकावी म्हणून सत्ताधिकाऱ्याचें सरदार, पुंड म्हणून जनतेला भासवितात. तसं करण्यांत त्यांचा हेतू असतो, पण खरी स्थिति फारच निराळी असते !

**मानाजीः**-मग शिवाजीमहाराजाविषयीं अशीच स्थिती असेल तर ?

**संपतः**-असेल कशाला ? आहेच !

**खुशालः**-महाराज ! पण शिवाजीमहाराज केव्हां येणार ?

**राणोजीः**-ते पहा ! महाराज इकडेसच येत आहेत !

**सावित्री:**-पण महाराज ! ते तर एकटेच आहेत, त्यांच्याबरोबर त्यांचा लवाजमा वगैरे--

**राणोजी:**--लवाजमा किंवा इतमाम यांची जरुरी आमच्या शिवाजीमहाराजांना नाहीं स्वत:च्या सामर्थ्याचा त्यांना पूर्ण विश्वास आहे. म्हणूनच ते एकटे फिरतात.

**तारा:**-पण सरदार लोकांनी एकटं फिरणं बरं नहीं !

**राणोजी:**-महाराज स्वत:ला सरदार समजतच नाहींत. ते स्वत:ला जनतेचा सेवक म्हणून मानत त. आलेच ते. ( शिवाजी महाराज प्रवेश करतात. सर्व उठतात रामराम करतात ) महाराज ! हे सरदार मानाजीराव, हे संपतराव व हे खुशालराव ! या आईसाहेब व या ताराबाई !

**शिवाजी:**-आईसाहेब ! ताराबाई ! मुलीला माहेरची मंडळी भेटली म्हणजे जितका आनंद होतो त्यापेक्षांही जास्त आनंदानं माझं मन उचंबळून गेलं आहे. मानाजीराव ! संपतराव ! खुशालराव ! आपल्यासारख्या अनुभवी सरदारांची सल्ला न घेता आम्हीं तरुणांनीं स्वराज्य संस्थापनेचा लढा चालविला आहे. आम्हाला नेस्तनाबूत करण्याचा आदिलशाहीनं विडाच उचलला आहे व त्या सत्तेशी झुंज झुंजण्याला आमची तयारीही आहे; पण---

**संपत:**--महाराज ! आपणाला काय वाटेल तें स्पष्ट बोला !

**शिवाजी:**-पण, या झुंजीबरोबर आम्हा तरुणांना आपल्यासारख्या अनुभवी सरदारांची मदत नाहीं म्हणून आम्हाला थोडी हुरहुर वाटते. एक काल असा होता कीं, त्यावेळीं प्रत्यक्ष राजेसाहेबांनीं मला हा स्वराज्याचा लढा लढणं बरं नाहीं. असं सुचवलं होतं पण--

**मानाजी:**-महाराज ! पितृआज्ञेचं आपणाला उल्लंघन करावं लागलं म्हणून वाईट वाटणं सहाजिक आहे.

**शिवाजी:**-पण तो प्रसंग असा होता कीं त्यावेळीं कर्तव्य करणं भाग होतं. कर्तव्यापुढं कशाचीही मातबरी नसते. मानाजीराव ! राजेसाहेबांची जहागीर आधींच मोठी शिवाय आदिलशाहीचा सरदार म्हणून राहण्यास मी कबूल झालों असतों, तर आणखी देखील कितीतरी जहागीरी मला मिळाल्या असत्या. पण कर्तव्यापुढं त्या जहागिरीची किंमत ती काय ?

**मानाजी:**-पण महाराज, आपल्या कार्यांत आपल्याला अपयश आलं तर जनतेची दिशाभूल केल्याचं तसंच त्यांच्या सुखाच्या संसारांत माती कालवल्याचं पातक आपल्याला लागणार नाहीं का ?

**शिवाजीः**-खात्रीनं लागेल. पण गोमातेचा वध आयाबहीणींच्या अब्रूवर दिवसा ढवळया घाले, सत्ताधिकाऱ्याचा जुलूम व जनता अन्नावाचून उपाशीं याला आपण सुखाचा संसार म्हणाल काय ? समजा ! कीं आम्हांला अपयश आलं तर सध्यां असलेल्या परिस्थितिपेक्षां आणखी वाईट असं होणार तरी काय ?

**राणोजीः**-यावेळची महाराष्ट्राची स्थिति खरोखरीच अत्यंत लाजिरवाणी आहे !

**शिवाजीः**-या कष्टमय स्थितींतून आधीं महाराष्ट्राची व पर्यायानं भारतमातेची मुक्तता करण्याचा आमचा दृढ निश्चय आहे. बाजीप्रभूसारख्या तरुण वीरानं आदिलशाहीच्या कोणत्याही आमिषाला न भुलतां आमच्या कार्यासाठीं देह ठविला. तानाजी येसाजी, नेताजी, आमच्या खांद्याशीं खांदा लावून लढताहेत. सुभानराव, गणोजीराव, राणोजीराव, स्वतःच्या सुखाची पर्वा न करतां स्वकर्तव्य पालनांत सर्वस्वाचा संन्यास करीत आहेत. अशा रणशूर तरुणांचा पाठिंबा असल्यावर मानाजीराव, यश आमच्या मागं धावत येईल ! माझी आपणाला एकच विनंति आहे कीं, आम्हांला प्रत्यक्ष साहाय्य करण्याची आपली इच्छा असून देखील परिस्थितिमुळं तें शक्य नसलं तर निदान आम्हां तरुणांचें पाय मागं ओढून आपण आम्हांला ना उमेद तरी करुं नका ! इतकं आपण केलं तरी आपण मातृभूमीचं फारच मोठं काम केलं असं होईल.

**मानाजीः**-( स्वगत ) शिवाजीमहाराज एवढ्या थोर मनाचे, इतके लोकहितदक्ष, गरीबाची कळकळ बाळगणारे असतील याची मला स्वप्नांत देखील कल्पना नव्हती. ( उघड ) महाराज आम्हा सरदारापाशीं आपण खरोखर फारच थोडं मागितलं व तितकंसुद्धां जर यावेळीं आम्हीं देऊं शकलों नाहीं तर आमच्या सारखे भाग्यहीन दुसरे कोण असणार ? व अशा भाग्यहीनांनीं चांगले दिवस यावेत अशी अपेक्षा तरी कां करावी ?

**संपतः**-मानाजीराव ! विचार कसला चालला आहे ? मी आणि खुशालराव आम्ही दोघांनींही महाराजांना मिळण्याचं ठरविलं आहे. आपलं काय ठरलं ?

**मानाजीः**-माझं म्हणता ?

**शिवाजीः** मानाजीराव ! आमच्या पक्षांला आपण मिळावं अशी आम्हां तरुणांची फार इच्छा आहे तारुण्याच्या ताज्या दमांत एकादे वेळीं आम्ही भलतेंच करूं लागल्यास आपल्यासारख्या अनुभवी सरदारांच्या सल्यानं या स्वातंत्र्याच्या लढ्यांत देशाचा पुष्कळ फायदा होईल. मानाजीराव ! आम्हा तरुणांच्या पक्षांत आपण लाबडतोब येऊन मिळावं असं आम्हाला कितीही वाटत असलं तरी

आपण सरदार असून जहागिरदार आहांत. मागचापुढचा विचार करूनच कार्य तें ठरवा आह्माला आपण मिळाला नाहीं तरी हरकत नाहीं पण निदान स्वकीयां-विरुद्ध तरी आपण हत्यार उपसूं नका! आपली आह्मांला भीति वाटते म्हणून ही विनंति नाहीं मातृभूमीची सेवा करतांना निदान ज्यांना आम्ही स्वकीय समजतों त्यांच्यावर तरी आम्हाला हात उचलावा लागूं नये, पण दुर्दैवानं तसं करावं लागलं तर कर्तव्य म्हणून केलंच पाहिजे. असं गीताशास्त्र सांगत आहे.

**मानाजी**–( स्वगत ) ज्याला आम्हीं पुंड समजत होतों, त्या शिवाजीच्या अंगीं एवढा विनय, एवढं ज्ञान व मातृभूमीचा एवढा स्वाभिमान आहे असं मला कोणी सांगितलं असतं तर मी तें केव्हांही खरं मानलं नसतं!

**राणोजी**:–मानाजीराव! आपण संकटांत सांपडलांत, त्यांतून आपली सुटका आमच्या माणसांमुळं झाली व यावेळीं जरी सर्व मंडळी शिवाजी महाराजांच्या पक्षाची आहेत, तरी आपल्या मनाविरुद्ध आपण कांहीं करावं असं शिवाजी-महाराज केव्हांहीं सांगणार नाहींत. इथं देखील आपण स्वतंत्र आहांत.

**मानाजी**:–महाराज! शिवाजीमहाराजांना मला एकच शंका विचाराविशी वाटते व ती ही कीं राज्यकरण्याची पात्रता आपल्या अंगीं नाहीं!

**शिवाजी**: मानाजीराव! या शंकेंतच पारतंत्र्याचं मूळ आहे. पारतंत्र्यांत फार दिवस राहिल्यानंतर मनाला असंच वाटतं कीं ज्या सत्तेनं आपणाला पारतंत्र्यांत ठेवलं ती सत्ता सुखासमाधानानं निघून गेली तर आपलं कसं होईल? मोंगल साम्राज्य वा आदिलशाही यांची आज महाराष्ट्रावर सत्ता आहे. या सत्तचे हातपाय कोण! तुह्मी आम्हीच ना? दिल्लीहून हुकूम आला २५०० मोहरा पाठवा रयतेपासून ही रक्कम वसूल तुह्मी आह्मींच करतो ना? आदिलशाहीच्या सत्तेखालीं जर आह्मी सर्व कामें सुरळीत पार पाडूं शकतों व कोणत्याही तऱ्हेचा अपात्रतेचा दोष आह्मा-वर येऊं शकत नाहीं, तर तेच आम्हीं आमच्या स्वतःच्या स्वतंत्र्य राज्यांत अपात्र कसे ठरूं? उलट दास्यांतल्या कटु अनुभवानं पुष्कळ गोष्टी आम्हाला जास्त चांगल्या समजल्यानं आम्ही आमच्या राज्यांत जास्त चांगल्या तऱ्हेनं व्यवस्था ठेऊं शकूं? मानाजीराव! आपल्यासारख्या अनुभवी व वडील माणसां-पुढं इतकं आम्ही बोललों हेंच जास्त बोललों.

**मानाजी**:–महाराज! आतां जरी मला नक्की सांगतां येत नाहीं, तरी शिवाजी महाराजांसंबंधीं माझा बराचसा गैरसमज त्यांच्या प्रत्यक्ष भेटीनं दूर झाला आहे

# केसरीचीं गुणकारी औषधें

केसरीचें लोध्र, अमृत अर्क हीं केसरीचीं तीन रत्नें

म्हणून सुशिक्षित लोकांत प्रख्यात आहेत.

आबालवृद्धांसाठीं शिफारस केलेला

# केसरी कुटीरम्

याचा अवश्य एक वेळ अनुभव घ्या

## इंडियन केमिस्टस अँड ड्रगीस्टस

एग्मोर मद्रास, शाखा—बेंगलोर.

एजंट—सर्वत्र सोल डिस्ट्रिब्युटर्सः—

## एन. मगनलाल आणि कंपनी

वेस्ट एन्ड वॉच कंपनीचेवर, एस्प्लनेड रोड, फोर्ट.

पोष्ट बॉक्स नं. ६८ मुंबई.

## —जीवमृतम्— ( रजिस्टर्ड )

हें औषध ज्ञानतंतूंचें शैथिल्य, शारीरिक परिश्रम, स्मरणशक्तीचें मांद्य, डोक्याला होणारा त्रास, निर्बलता आणि ज्ञानतंतूंच्या सर्व तक्रारी दूर करून डोकें, ज्ञानतंतु आणि स्नायूंना शक्ति देऊन शरीराच्या प्रत्येक भागाला मजबूत बनवितें. एका बाटलीची किंमत रु. ३-४-०

सोल डिस्ट्रिब्यूटर्सः—

**एन्. मगनलाल ऍन्ड कम्पनी.**

जहांगीर वहाडीया बील्डींग, एस्प्लेनेड रोड, कोट, मुंबई.




मोठ्या प्रमाणांत, अगर एजन्सी करितां लिहाः—

# धी मांडवा केमिकल वर्क्स,

मांडवा—अलिबाग.

हे सांगायला मला आनंद वाटतो. आपल्या सरदारापैकीं कांहींची मी भेट घेऊन मग काय तें ठरवीन.

**शिवाजीः**–कोणाची भेट घ्यायची तें कळलं तर आम्ही त्यांना आनंदानं इथं पाठवूं किंवा आपली हरकत नसल्यास आपण, आईसाहेब व ताराबाई यांच्यासह गडावर चलावं.

**मानाजीः**–इथं सर्वांना बोलावण्यापेक्षां मीच गडावर येणं बरं. महाराज ! प्रथमतः माझा विचार राणोजींची भेट घ्यावी असा आहे. कारण प्रत्यक्ष भेटीचा परिणाम कांहीं निराळा असतो.

**संपतरावः**–अगदीं खरं आहे.

**खुशालः**–पण मानाजीराव ! राणोजीरावांच्या भेटीची आपल्याला प्रबल इच्छा–

**मानाजीः**–प्रबल इच्छा असल्याशिवायच का राणोजींचं नांव मी प्रथम सुचवलं !

**संपतरावः**–साधू महाराजांनीं मनांत आणलं तर क्षणार्धांत राणोजीच्या भेटीचा योग इथंसुद्धां येईल !

**मानाजीः**–काय म्हणतां ? क्षणार्धांत इथं योग येईल ?

**सावित्रीः**–मग महाराज ! शिवाजीमहाराजांच्या भेटीचा आपण जसा सहज योग जुळवून आणलांत तसा राणोजीरावांच्या भेटीचा योग जुळवून आणलांत तर या आश्रमाची आठवण आम्ही जन्मभर विसरणार नाहीं.

**शिवाजीः**–आईसाहेब ! ईश्वरी नियम असा आहे कीं प्रबल इच्छेंतच यशप्राप्तीचं मूळ आहे. महाराष्ट्रांतील प्रजाजनांना स्वराज्याची प्रबल इच्छा झाली तरच त्यांना स्वराज्य मिळणार आहे. आपली तसंच मानाजीरावांची यावेळीं राणोजीरावांच्या भेटीची प्रबल इच्छा आहे तेव्हां राणोजीरावांनंच इथं आलं पाहिजे.

**मानाजीः**–काय ! राणोजीराव इथं येणार आहेत.

**शिवाजीः**–येणार कशाला ! इथं आलेलें आहेत.

**सावित्रीः**–मग ते कोठें आहेत !

**शिवाजीः**–( राणोजीचा हात धरून ) हे ते राणोजीराव !

**मानाजीः**–काय ! साधू महाराज हेच राणोजीराव ! ( पडदा ड्राप )

## अंक चवथा समाप्त.

---

# अंक ५ वा.

## प्रवेश पहिला

[ स्थळ:-विशाळगडावरील राजवाडा, तारा. ]

**तारा:**-( तुळशीला प्रदक्षिणा घालीत आहे. प्रदक्षिणा संपल्यानंतर तुळशीला वंदन करून ) देवी माते ! भगवान श्रीकृष्णाला तूं आपल्या सेवेनं वश केलंस; तुझी सेवा करणाऱ्या बालिकांना देखील तूं सदानंदात ठेवतेस इतकंच नाहीं पण ज्या घरांत तुझा वास आहे तें घर म्हणजेच पृथ्वीवरील स्वर्ग ! तुझी वस्ती जिथं असेल तिथून मानवी जीवांना त्रस्थ करणाऱ्या रोगांनीं निघून गेलंच पाहिजे. तुझ्या पवित्र वातावरणांत राहिलेल्या कुमारिकांच्या इतकंच नाहीं पण गृहीणींच्या देखील अंतःकरणांत पवित्र भावनांचं साम्राज्य पसरलंच पाहिजे. तुझ्या सानिध्यांत जाणारा काल हा सदानंदाची व स्वर्ग सुखाची सत्य जाणीव करून देतो. माझी वेडीवाकडी सेवा—( मानाजीराव येतो व उभा राहतो ) तुला रुचली व बाबांच्या वृत्तींत पालट झाला. स्वतःच्या सुखासाठीं बाबांना दुखवायचं नाहीं हा माझा निश्चय तुझ्या सेवेमुळें फळास आला. माते ! ( सावित्री येते व उभी राहते ) ज्यांच्या सहवासात मी राहावं असं मला वाटलं त्यांचं तें गोड नांव बाबांना मी कसं सांगू ? पण आता असाच काल आला आहे कीं बाबाच मला तें गोड नांव सांगतील.

**मानाजी:**-बाळ ! ( दचकते )

**तारा:**-बाबा, तुम्हीं केव्हां आलात ?

**मानाजी:**-बराच वेळ झाला. तूं देवीच्या पूजेंत तल्लीन झाली होतीस तेव्हां तुझी पूजा मी कशाला मोडूं ?

**तारा:**-बाबांना तिष्ठत ठेवून मला देवांची पूजा नको आहे. बाबा ! मला क्षमा करा !

**मानाजी:**-आमच्या घरांतली तं देवी आहेस. तुझीच आम्ही क्षमा मागितली पाहिजे !

**तारा:**-असं भलतंच आपण म्हणूं नये ! मुलीनंच क्षमा मागितली पाहिजे. बाबा ! आई अजून कां बरं आली नाहीं !

**सावित्री:** बाळ ! ही मी इथंच आहे. तुला एक आनंदाची बातमी सांगण्यासाठीं आम्ही दोघही आज मुद्दाम आलों आहोंत.

**मानाजी:**-लग्नापासून आतां पावेतों सर्व आयुष्यांत दोघांचं एकमत झाल्याचा आनंदाचा आजचाच पहिला प्रसंग आहे.

**तारा:**-बाबा ! परमेश्वराची कृपा असल्यावर दुःखं हजार कोस दूर पळतात.

**सावित्रीः**-अगदीं खरं! बाळ! सांगूं कां तुला ती आनंदाची बातमी?

**ताराः**-आई! तूं काय सांगणार तें मला ठाऊक आहे. मातापित्याचं हृद्गत मुलीला कळणारच!

**मानाजीः**-मग तूंच सांग ना?

**ताराः**-आनंदाची बातमी गुप्त ठेवण्यातच आनंदाची वृद्धि असते!

**सावित्रीः**-तूं पण सांगूं नकोस व आह्मी पण सांगत नाहीं मग तर झालं ना?

**ताराः**-आई! असं नाहीं करायचं! मला काय वाटतं तें मी नाहींच सांगणार; पण तूं सांगितलंच पाहिजे; नाहींतर मी नाहींच तुझ्याशीं बोलणार.

**सावित्रीः**-आतां काळच असा येत आहे कीं आईबापा बरोबर बोलणं मुलीला आवडायचंच नाहीं. तारे! आमच्याशीं नाहीं बोललीस तरी चालेल बरं का? पण ज्यांच्याशीं तुझी जन्म गांठ बांधायची आहे त्यांच्या बरोबर मात्र अबोला नको धरूं बरं?

**ताराः**-बाबा! मुलीची का कुणी आईबाप थट्टा करतात!?

**मानाजीः**-तारे! ही थट्टा नाहीं, हें मातृपितृ प्रेम आहे. हा तुझ्या प्रेमळ जननी जनकाचा संदेश आहे, कीं पती बरोबर पत्नीनं अबोला धरूं नये! बाळ! राणोजीरावाबरोबर तुझं लग्न लावावं असं आह्माला वाटतं. तुझी त्याला संमति आहे ना? ( तारा लाजते )

**सावित्रीः**-मुली! अग खुळे पोरी! हा लाजण्याचा समय नाहीं. तुला तुझ्या सहचाऱ्याची अगाऊ माहिती देणं ही थट्टा नाहीं. हें आईबापाचं कर्तव्य आहे. ज्याच्या बरोबर सारा जन्म सुखदु:खानं काढायचा त्या भावी पतिदेवाची लग्नापूर्वी कुमारिकेला ओळख करून दिलीच पाहिजे! बाळ! तें राहूं दे आतां! राणोजी रावांचं ठिकाण आह्मा दोघांना अगदीं मनापासून आवडत असलं तरी तुझी त्याला अगाऊ संमति घेतलीच पाहिजे! तुला आतां सांगायचं नसलं तर मग कांहीं वेळांन सांग.

**ताराः**-आई! बाबा! मला यांत काय कळतं? आईबापांनीं ठरवलं तेंच स्थळ मला काय पण कोणाही हिंदू कुमारिकेला संमत झालंच पाहिजे! आपण मला या बाबतींत विचारणं हें देखील मला कससंच वाटतं. मुलीचं खरं कल्याण कशांत आहे याची जाणीव आईबापाशिवाय दुसऱ्या कुणाला असणार? आपण ठरवाल त्यांत माझं कल्याण असलंच पाहिजे.

**सावित्री:** बाळ! राणोजीरावांना आम्ही आज इथं मुद्दाम बोलावलं आहे आणि त्यांच्या स्वागताचं काम आम्ही तुजकडे ठरवलं आहे.

**तारा:**- आई! हें ग काय असं भलतंच? अशानं मी खोलींतून बाहेरच निघणार नाहीं ते आले म्हणजे मला कसं लाजल्यासारखं होतं हें तुला माहीत आहेना? वडिलांच्या आज्ञेप्रमाणं मी त्यांचं स्वागत करायचं ठरवलं व त्यांत मजकडून चूक झाली तर त्यांचा अपमान नाहीं का होणार? त्यांचा असा अपमान झाल्यावर, आई! त्यांना कसं वाटेल? स्वागत करण्याचा बाबा मला सराव नाहीं. तेव्हां कृपा करून--

**मानाजी:** त्यांचा अपमान झाला तरी चालेल. त्यांची समजूत मी घालीन. पण राणोजीरावांचं स्वागत तूंच केलं पाहिजेस!

**सावित्री:**-तसं तूं केलंस म्हणजेच राणोजीरावांना आनंद होईल.

**तारा:**- आईबापांच्या आज्ञा पालन करणं हाच आम्हा मुलींचा धर्म आहे. तेव्हां मा नाहीं म्हणणं शक्यच नाहीं.

**मानाजी:**-शाबास! मुलीच्या कर्तव्याची जाणीव जर तुला नसली तर मग ती असणार तरी कुणाला? राणोजीराव आले वाटते.

**सावित्री:**-मुली! लाजूं नको हो? (सावित्री व मानाजीराव जातात. राणोजी प्रवेश करतो.)

**राणोजी:**-काय? इथं कुणींच दिसत नाहींत ते! आईसाहेब नाहींत, मानाजीराव नाहींत, कुणीदेखील नाहीं! मला वाटतं मानाजीरावांना आठवण राहिली नसेल. पुन्हां यावं म्हणजे भेट होईल. (जाऊ लागतो)

**तारा:**-महाराज! अहो महाराज!

**राणोजी:**-इथंतर कुणीच नाहीं. नि मला बोलावतं कोण?

**तारा:**-महाराज? आपण आलांत व लागलींच परतलांत काय म्हणून? आपण येणार म्हणून बाबांनीं सांगितलं व आईनं देखील कळवलन्! आपण आतां याल म्हणून केव्हां पासून मी आपली वाट पाहात आहे. पण आपण आलांत नि परत जायला निघालांत?

**राणोजी:**-इथं कुणीच दिसलं नाहीं म्हणून निघालों परत. शिवाय आईसाहेब ही नाहींत व बाबासाहेबही नाहींत तरुणांनीं व तरुण कुमारिकांनीं एकांतांत बोलत बसणं बरं नाहीं!

**तारा:**-माझं देखील असंच मत आहे पण आतां त्याला काय करायचं? आईनं व बाबांनं आपलं स्वागत करायला मला सांगितलं नि, मी तें नाहीं

ह्मणत ह्मणत पत्करलं; तेव्हां आपण त्यांना भेटल्याशिवाय जाऊं नये. थोडं थाबाव. मी आत्तां त्यांना घेऊन येतें. मग जाऊं का त्यांना आणायला ?

**राणोजी:**–तारावाई ! आपल्यासारख्या सुंदरीबरोबर किती वेळ जरी बोलत राहिलों तरी थोडंच होणार आहे. बाबासाहेबांना व आईसाहेबांना आणा बोलावून. त्यांनी मला आज मुद्दाम कां बोलावलं आहे हें त्यांना मला विचारायचं आहे.

**तारा:**–तें कारण मला माहीत आहे. आपणाला वचनबद्ध करण्याचा त्यांचा विचार आहे.

**राणोजी:**–मला वचनबद्ध ! का ह्मणून ?

**तारा:**–आपण स्वतंत्र आहांत ह्मणून. जे पारतंत्र्यांत आहेत त्यांच्या वचनावर कोण विश्वास ठेवणार ? पण जे स्वतंत्र आहेत तेच आपलीं वचनं इच्छा असल्यास पाळूं शकतात. आत्तां आणतें हो मी बाबांना बोलावून ! ( थोडी दूर जाऊन ) बाबा ! अहो बाबा ! आई ! अग आई ! तुह्माला ते इकडंच बोलावताहेत ! ते आलेत ! ते इतक्यातच आलेत ! त्यांना लवकर जायचं आहे ! तुह्माला ते बोलावताहेत ! बाबा ! अहो बाबा ! या की लौकर ! त्यांना वेळ होतो बरं का ? आई अग आई ! माणसानं किती बरं तिष्ठत राहावं ? (परत येऊन) महाराज ! क्षमा करा. आई, बाबा, आत्तां येतील ! आपण आमच्यावर रागाऊं नका. ( मानाजीराव व सावित्री प्रवेश करतात. )

**मानाजी:**–तारे ! बोलावण्याची केवढी ओरड ! जसं कांहीं घरांत कोणी परका शिरला !

**तारा:**–बाबा ! ते ह्मणतात बोलायला वेळ नाहीं !

**मानाजी:**–राणाजीराव ! आपल्या उपकाराची अंशतः फेड करावी ह्मणून तसदी दिली आहे. उभयतांच्या संमतीनं तारा आपणाला द्यावी असं आम्हीं ठरविलं आहे. आपण तिचा स्वीकार करून आह्मांला कायमचं ऋणी करून ठेवा.

**राणोजी:** प्रश्न फार नाजुक व महत्वाचा आहे. आपल्या कन्येचं पाणिग्रहण करण्याचा बहुमान आपण मला देतां हेंच मला भूषण आहे. पण मानाजीराव ! मातृभूमीला परदास्यांतून मुक्त केल्याशिवाय गृहस्थाश्रम आम्ही तरुणांनीं कसा स्वीकारावा ? सबंध महाराष्ट्रांतील कुमारिकांच्या पावित्र्यावर अविंधांचे घाले येत असतांना, पारतंत्र्याच्या शृंखलांचा खणखणाट कानावर आदळत असतांना, गोमातेच्या हंबरड्यानं कानठाळीं बसत असतांना, आम्ही तरुणांनीं संसार सुखासाठीं लग्नकार्यांत पडून मातृसेवेला लागणारा काल संसार सुखांत घालविणं चांगलं असं का आप-

णाला वाटतं ? मानाजीराव ! शिवाजी महाराजांचे आम्ही सेवक आहोंत. मराठी सत्तेच्या सूत्रधाराचीं सर्व सूत्रें आज महाराजांच्या हातीं आम्ही तरुणांनीं दिलेलीं आहेत. संसार वा सुख या कल्पनांचा वारा सुद्धां आम्हाला लागूं नये म्हणून समर्थांच्या आश्रमांतून आम्ही तरुण राहात असतो. मातृसेवेच्या कार्याला आपण आम्हा तरुणांचे पाय मागे ओढूं नका ! कारण लग्नानं बद्ध झाल्यानंतर मला नाहीं वाटत माझ्या हातून काही कार्य होईल ! आईसाहेब ! मला माफ करा. ताराबाई ! तुम्ही इतक्या उच्च अहांत कीं लग्न झाल्यानंतर देखील माझ्या कार्याला तुमचं प्रोत्साहन मिळेल. पण मला माझ्या दुर्बलतेची जाणीव असल्यामुळं तुह्मीही मला क्षमा करा !

**मानाजी:**-शिवाजीमहाराजांनीं आपणाला सांगितलं तर—

**राणोजी:**-यावेळीं महाराज सांगतील असं मला वाटत नाहीं.

**सावित्री:**-पण समजा सांगितलं ! तर मग तरी हरकत येणार नाहीं ना ?

**राणोजी:**-आज या देहावर त्यांची सत्ता आहे. त्यांनीं या देहाचं वाटेल तें करावं.

**सावित्री:**-मी महाराजानां भेटून काय तें ठरवीन; राणोजीराव येते मी. ( तारा व सावित्री जातात. )

**मानाजी:**-राणोजीराव, तुमच्यासारखे तसेच सुभानराव, गणोजी, तानाजी, येसाजी, बाजीप्रभू यांच्यासारखे तरुण ज्या देशांत जन्माला येतात व ज्यांचं आधिपत्य शिवाजी महाराजांसारख्या तेजस्वी तरुणानं स्विकारलं आहे, त्या समर्थ सांप्रदायाच्या तरुणांनीं माझी खात्री आहे स्वराज्य संस्थापना केलीच पाहिजे !

**राणोजी:**-आपल्यासारख्या वडिलांच्या शुभ आशीर्वादांचंच तें पुण्य फल असं आम्हीं समजूं ?

**मानाजी:**-आज महाराजांनीं मला दरबारांत बोलावलं आहे. दरबारचा वेळ देखील होत आला आहे; तेव्हां आपण इथूनच जाऊं दरबारला. संपतराव व खुशालराव इथंच येणार होते. ( संपतराव व खुशालराव येतात. )

**संपत:** सरदार मानाजीराव ! चलायचना दरबारला ?

**मानाजी:**-मी तुमचीच वाट पाहात होतों.

**खुशाल**-आमची वाट पाहात होतां हें जरी खरं असलं तरी जावयाची संमति आपण मिळवीत होतां हें ही तितकंच खरं आहे.

**मानाजीः**-जांवयाच्या संमतिशिवाय का कुणी मुलीचं लग्न करीत असतो ?

**संपतः** ,सरदारांच्या मुलींचीं लग्नं जांवयाच्या संमतिपेक्षां सुभेदारांच्या संमतिनच होत असतात हें खोटं तर !

**मानाजीः**-एक वेळ नव्हे तर हजारदां खोटं आणि संपतराव माझी प्रतिज्ञा तुम्ही हाणून पाडलीत म्हणूनच मला अत्यानंद झाला आहे !

**खुशालः**-आपण महाराजांच्या पक्षांत मिळालात यानंच आम्हा सर्वांना आनंद झाला आहे व या आनंदाची परिसमाप्ति राणोजीरावांच्या व ताराबाईच्या विवाहांत होणार ही त्या आनंदाची परमवधि होय

**मानाजीः**-हा सर्व आपला पुण्यप्रभाव आहे ! चला दरबारची वेळ झाली !

( सर्वजण जातात. )

---

## प्रवेश २ रा.

( शिवाजीमहाराजांचा दरबार )

( शिवाजी, तानाजी, राघोबल्लाळ मानाजीराव, सावित्रीबाई, ताराबाई, राणोजीराव, संपतराव, खुशालराव, गोविंदराव, पार्वती, रघू, गणोजी, सुभानराव, वगैरे )

**तानाजीः**-आजच्या दरबारचा उद्देश सुभानराव व गणोजी यांच्या गुन्ह्याची चौकशी करून न्याय देण्याचा आहे. सुभानराव व गणोजी यांनीं आजपावेतों इथं हजर असलेल्या कोणाही सरदाराच्या बरोबरीची इतकंच नाहीं पण त्या सर्वांहूनही जास्त महाराजांची सेवा केलेली आहे. आह्मी पन्हाळगडावर असतांना तेथून महाराजांना सुरक्षित बाहेर आणण्याचं अत्यंत जोखमीचं काम त्यांनीं अंगावर घेऊन पार पाडलं. पांढऱ्या पाण्यावरच्या लढाईत बाजीप्रभूंच्या खांद्याशीं खांदा देऊन हेच दोघे भाऊ लढत होते. बाजींच्या देहाचं शेवटचं दर्शन यांनींच महाराजांना करवलं. इतकी यांची कामगिरी उज्वल आहे. गडावर गणोजीचा पहारा होता, गणोजी व सुभानराव दोघेही थकलेलें पण गणोजीला विश्रांति मिळावी म्हणून सुभानरावांनीं तें काम स्वतःच्या अंगावर घेतलं. दुर्दैवानं त्यानाही झोपेनं घेरलं. पहाऱ्यात हुकमाशिवाय बद्दल केल्याच्या व पहारा बरोबर न केल्याच्या आरोपावरून दोघांनाही बंदींत टाकण्यांत आलं व महाराजांच्या फर्मानाप्रमाणं कडेलोटाची शिक्षा मिळावी म्हणून किल्लेदारांनं यांना न्यायासनासमोर पाठविलं आहे.

**शिवाजीः**-गणोजी, ! सुभानराव ! या बाबतींत तुम्हाला कांहीं सांगायचं असल्यास खुशाल सांगावं.

८८ ५ 

नाटक

**गणोजी**:–माझ्या चुकीबद्दल सुभानचा विनाकारण बळी पडत आहे. याचा महाराजांनीं विचार करावा. मी शिक्षा भोगण्यास आनंदानं तयार आहे.

**सुभान**:–माझ्या दादाची कामगिरी मी स्वसंतोषानं माझ्या शिरावर घेतली तेव्हां सर्व अपराध माझा आहे. आमच्या पूर्व कामगिरीचा सुभेदार तानाजीनं आमच्या गुन्ह्याचं स्वरुप सौम्य करण्याकरितां उल्लेख केला. तसं करण्याचं कारण नव्हतं. लढाईच्या वेळीं पहाऱ्यासारखं जोखमाचं काम अंगावर घेऊन तें करण्याला मी चुकलो याबद्दल होणाऱ्या शिक्षेला मी पात्र आहे. मला माझा गुन्हा इतका मोठा वाटत आहे कीं माझ्यावर दया दाखविल्यास अनर्थ ओढवण्याचा संभव आहे. याचा विचार करून ठरलेली शिक्षा मला द्यावी अशी माझी विनंति आहे.

**तानाजी**:–महाराजांच्या सेवेला येण्यापूर्वी यांच्या घरांत मुसलमानांनीं शिरून सुभानरावाच्या पत्नीच्या पातिव्रत्यावर गदा आणण्याचा प्रयत्न केला त्यावेळीं गणोजीच्या बापानं तिथल्या तिथं एकाचा बळी घेतला पण त्या भानगडींत तो स्वतः मारला गेला. सुभानरावाच्या पत्नीचाही मुसलमानांनीं खून केला. घरांत सध्या सुभानरावाचे वडील जीवंत असून आंधळे आहेत व त्यांची भावजय–गणोजीची आई घरांतलं सर्व पाहाते, सुभानरावाची काकी व मुलगा हेही आज न्यायासनासमोर हजर आहेत. त्यांचंही म्हणणं ऐकून घ्यावं, पार्वतीबाई !

**पार्वती**:–मी माझ्या पुतण्याविषयीं व मुलाविषयीं दयेची याचना करण्यासाठीं आलेली नाहीं. अशा काम चुकार पोरांचीं तोंडं पाहाण्याचा महाराष्ट्रांतील कोणत्याही मातेला परमेश्वरानं प्रसंग आणूं नये या पोरांनीं धैर्यानं शिक्षा सहन करावी एवढंच सांगण्यासाठीं मी इथं आलें आहे.

**शिवाजी**: बाळ रघू ! तुला बाबाची भेट घ्यायची ना ?

**रघू**:–होय, मला माझ्या बाबाची व काकांची भेट घ्यावयाची आहे पण ती आतां नको ! माझे बाबा ! माझे काका ! यावेळीं कैदी आहेत. गुन्हेगार आहेत ! त्यांनीं शिक्षा भोगल्यानंतर मग मी त्यांना भेटेन.

**शिवाजी**:–शिक्षा भोगल्यानंतर त्यांची व तुझी भेट होणं शक्य नाहीं.

**रघू**:–नाहीं झाली तर नाहीं झाली. माझे आजोबा मला सांगतात गुन्हा करणाऱ्याच्या वाऱ्याला देखील उभं राहूं नये. बाबांनीं व काकांनीं गुन्हा केला आहे. ते स्वतः कबूल करतात. ते गुन्हेगार असे पावेतों मी त्यांच्याशीं कसा बोलूं ? आजोबांला तें आवडणार नाहीं !

**शिवाजी**:–त्यांनीं जगावं त्यांना माफी मिळावी असं तुला वाटत नाहीं काय ?

काटकसर आणि आराम मिळण्यासाठीं

प्रत्येक कुटुंबांत सिंव्ह छाप

# ॲल्युमिनियमचींच—भांडीं वापरतात.

तांब्यापितळेच्या भांड्यापेक्षां किंमतींत फारच स्वस्त पडून, स्वयंपाक फारच लवकर होतो, आणि वेळोवेळीं लागणारा कल्हईचा खर्च वाचतो. खास महाराष्ट्रीय व्यापाऱ्याकरितां मुंबईत भरंवसेलायक महाराष्ट्रिय अशी आमची **एकच फॅक्टरी आहे** घाट सुबक आणि भाव फारच किफायत.

**शोभिवंत घाट आणि उंची धातूचीं.**

**जर्मन सिल्व्हरची भांडीं-बनविण्याबद्दल** आमचा कारखाना फार वर्षांपासून प्रसिद्ध आहे.

भांड्यांखेरीज

**मुलांचे फ्यान्सी ड्रेस—जरीच्या आणि साध्या हलक्या भारी टोप्या**

**राजा रविवर्मा आणि इतर प्रसिद्ध प्रिंटर्सचे देशी आणि इंग्लीश पिक्चर्स आमचेकडे घाऊक आणि किरकोळ मिळतात. क्याटलाग मागवा.**

## अनंत शिवाजी देसाई टोपीवाले

**मोती बाजार, मुंबई नं. २**




५५ वर्षांचे

अनुभवी

पेंटर

# गुणानाथ

## जे. के. सी.

हेड ऑफिस—काळबादेवी रोड मुंबई नं. २

ब्रँच ऑफिस—गिरगांव मुंबई नं. ४.

नांवाच्या पाट्या लिहणार, एनग्रेव्ह करणार
आणि रबर स्टँप बनविणार.

क्याटलाग फुकट. पत्र पाठवा.